मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

फेब्रुवारी–मार्च १९६१

★

अंकातील लेखक व कवि

पु. य. देशपांडे
वसंत वरखेडकर
कृष्णा चौधरी
जगन वंजारी
सर्जेराव चौधरी
राम भोयर
राजा मुकुंदे

मूल्य ७५ नये पैसे

युगवाणी

पा द क : पु. य. दे श पां डे

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

युगवाणी

फेब्रुवारी-मार्च १९६१

★ ★ ★

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १५] [अंक १०-११

कला : जीवन : समीक्षा : संस्कृति

फेब्रुवारी–मार्च १९६१

मनुष्य अनुभवाने कधीहि शहाणा होत नसतो. कारण जे जे अनुभूत, ते ते गतार्थ, प्रेतवत्, चैतन्यशून्य, सत्यविपर्यासात्मक, भ्रमात्मक.

जे जे अनुभूत, ते ते स्मृतिबद्ध. जे जे स्मृतिबद्ध ते ते जीवनाला बद्ध करणारे, सत्य–साक्षात्काराच्या आड येणारे.

जे जे काल्पनिक, पूर्वकल्पनात्मक, पूर्वनिश्चित विचारात्मक, ते ते विक्षेपात्मक, भ्रमात्मक. प्रत्येक मानव हा अशा स्मृतिबद्ध विकल्पनांचा, तज्जन्य गतार्थ संस्कारांचा सुसंघटित असा एक परिपाक आहे. हीच पूर्वघटित बद्धता. बद्धताजन्य कल्पना–भावना–विचार यांच्यापासून संपूर्ण विमुक्तता प्राप्त झाल्याशिवाय सत्य–दर्शन अशक्य आहे. मनाला जेव्हा संपूर्ण स्तब्धता प्राप्त होते, तेव्हाच त्या स्मृतिशून्य, ज्ञातताशून्य, क्रियाशून्य निखळ पोकळीत सत्याला संचार करण्यास स्वातंत्र्य प्राप्त होते. अशा सहज, प्रयत्नशून्य स्वातंत्र्याशिवाय सत्य–साक्षात्कार अशक्य. सत्यसाक्षात्काराशिवाय सर्जनशील कृति अशक्य. सर्जनशील कृतीशिवाय मानवी, म्हणजेच जागतिक क्रांति अशक्य.

–(जे. कृष्णमूर्ति)

अनामिकाची चिंतनिका

एक वैचारिक आत्मकथा] [भाग ५ वा

१

माझ्या अनुभवांचा पसारा माझ्या समोर पडला आहे. त्याचे काय करावे, त्याची संगति कशी लावावी, त्यांतून कोणता निश्चित अर्थ काढावा– हे मला कळेनासे झालेले आहे.–

एकदा वाटते हा सर्व पसारा एकत्र करावा आणि त्याची होळी करून टाकावी. सर्व गत–घटना अशा तऱ्हेने विगत, अस्तित्वशून्य झाल्या तर, माझ्या-पुरता तरी, भूतकाल हा विगतार्थ होऊन जाईल. आज, आता, या क्षणापासून नवे विचार, नवे निर्णय, नवे जीवन मला सुरू करता येईल. आणि चैतन्यमय वर्तमानातून हवा तसा उज्ज्वल भविष्यकाल मला आकारास आणता येईल.–

या तऱ्हेने विचार करणारा किमान एक पुरुष तरी मला माहित आहे– श्री. जे. कृष्णमूर्ति. ते म्हणतात, मनुष्य अनुभवाने शहाणा होतो, ही समजूत भ्रममूलक आहे. मनुष्य अनुभवाने कधीहि शहाणा होत नसतो. हे मत मला मोठे सूचक व

● लेखक :– पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ●

सार्थ वाटू लागले आहे. कारण जे अनुभव आपल्याला येतात ते आपण घडविलेले नसतात. माणसाला येणारे अनुभव ज्या कारणांमुळे घडून येतात ती कारणे माणसाला सदैव अज्ञातच राहतात. अमुक घटना अमुक कारणांमुळे घडली, असे जे आपण मानतो, तो आपला केवळ भ्रमयुक्त अहंकार असतो. वस्तुत: घटनांना आकारास आणणारी कारणे असंख्य, अनंत असतात. ती कळून घ्यावयाची असतील, तर अनुभवाने आपण आता काही शिकलो आहोत, शहाणे झालो आहेत, हा भ्रम निश्चयाने बाजूस सारला पाहिजे. सर्व गत घटनांच्या मगरमिठीतून आपले मन विमुक्त केले पाहिजे. आपल्याला काहीहि कळलेले नाही, ही वस्तुस्थिति ओळखली पाहिजे. ही भूतकालनिरपेक्ष जाणीव अखंड जागती ठेवून, जिवंत वर्तमानातून

क्षणाक्षणाला काय निष्पन्न होते ते पूर्ण तटस्थ, पूर्वग्रहदोषरहित व अविवश वृत्तीने अवलोकिले पाहिजे. जे दिसते जे घडते, त्याच्या मागे मनाला धावू देता कामा नये. मनाला जे दिसले, जे घडले आणि म्हणून वस्तुतः जे नाहीसे झाले त्याच्या-मागे मनाला धावू दिल्यास आपण, होऊन गेलेल्या, गतार्थ झालेल्या, गतप्राण झालेल्या घटनांचा पाठलाग करीत बसू आणि त्यामुळे जिवंत वर्तमानाकडे आणि त्यातूनच उद्भूत होणाऱ्या भविष्याकडे पाठ फिरवून, त्यापासून दूर दूर जात राहू. जे क्षणाक्षणाला नवता धारण करते त्या लावण्याला, त्या जीवन सौंदर्याला, क्षण–अनंताच्या अखंड मीलनातून उदय पावणाऱ्या चिरंतन आनंदाला कायमचे पारखे होऊन बसू.–

आधुनिक मानव हा क्षणाक्षणाला नवता धारण करणाऱ्या चैतन्यपूर्ण वर्तमानाकडे पाठ करून भूताकडे, गतार्थाकडे धावत सुटला आहे. जे गतार्थ होऊन बसले आहे त्यातूनच जीवनाचा अर्थ शोधण्याचा तो खटाटोप करीत आहे. –सर्व आधुनिक ज्ञान–विज्ञान हे गतार्थातूनच निष्पन्न झालेले आहे. म्हणून ती एक भूतकालजन्य भुताटकी आहे. आभासावर, अध्यासावर रचण्यात आलेला तो एक मोहमयी डोलारा आहे. चैतन्यमय वर्तमानातून अवचितपणे, अनपेक्षितपणे आलेला एखादा लहानसा धक्का हा सर्व डोलारा एका क्षणात कोलमडून टाकतो. आणि मग हे काय ? हे कुठून आले, हे असे कसे घडले ?– अशा विस्मय–चकित वृत्तीने मानव त्या धक्क्याकडे पाहू लागतो. तिकडेच पाहत बसतो. त्याचाच पाठलाग करू लागतो. पुन्हा चैतन्यमय वर्तमानापासून दूर, दूर जातो. आणि मग चैतन्यमय वर्तमानातून अवचितपणे, अनपेक्षितपणे पुन्हा एखादा धक्का बसला की, पुन्हा कोलमडतो, गडबडतो, गोंधळून जातो, भयचकित होतो.– सारा मानवी इतिहास हा अशा रीतीने घडविला गेला आहे. मानव म्हणतो, 'इतिहास मी घडविला' आणि असे म्हणतो न म्हणतो तोच तो सारा इतिहास एखाद्या अनपेक्षित घटनेमुळे पार कोलमडून पडतो.–

● ● ●

आधुनिक मानव हा एक गतार्थजीवी प्राणी होऊन बसला आहे. म्हणूनच त्याच्या हाती अद्याप काहीहि लागलेले नाही. भूतकालीन गतार्थाचे भूत आपल्या मानगुटीवर बसवून त्याच्या भुताटकीला तो बिलगून बसला आहे. त्या भुताटकीलाच तो 'जीवन' मानू लागला आहे.– जीवन हे चैतन्यमय असते, क्षणाक्षणाला ते नवता धारण करीत असते, ते कधीच गतार्थ होत नाही, कधीच मरत नाही, हे सर्व तो विसरून गेला आहे. भूताच्या, गतार्थाच्या प्रेतांना कवटाळून योजनाबद्ध 'नवे जग' आकारास आणण्याच्या खटाटोपात तो गढून गेला आहे !–

आधुनिक मानवाची ओढ निश्चतार्थाकडे झुकलेली आहे. त्याला सर्व काही निश्चित व सुरक्षित असे हवे आहे. अनिश्चिताचे त्याला भय वाटू लागले आहे. त्याची सारी युक्ति, बुद्धि व शक्ति, जे जे अनिश्चित ते ते निश्चित व सुरक्षित करण्याकडे खर्ची पडू लागली आहे. अनिश्चिताचे सारे मार्ग पार बंद करून टाकण्यासाठी तो धडपडत आहे. निश्चिताच्या मजबूत किल्ल्यात आपले जीवन सुरक्षित करून ठेवण्यासाठी तो सारखा झटत आहे. आणि यात त्याला जितके यश मिळत आहे तितकी आपली 'प्रगति' होत आहे, असे तो मानू लागला आहे. पण ही 'प्रगति' नसून ती पुच्छ–प्रगति आहे, हे त्याच्या ध्यानात येईनासे झाले आहे. जे जे विगत, गतार्थ व गतप्राण होऊन जाते तेच त्याला निश्चित झाल्यासारखे भासते. सर्व जड वस्तु अगदी निश्चित स्वरूपाच्या भासतात, त्याचे कारण त्यातील चैतन्य गोठून गेलेले असते. प्रेतांची चीरफाड करून प्राण्यांच्या देहरचनेचे यथार्थ वर्णन शास्त्रज्ञांना करता येते. पण त्यामुळे त्या देहात एकेकाळी असलेल्या व त्याच्या सर्व व्यापारांचे संचालन करणाऱ्या चैतन्याचे यत्किंचित् ज्ञान होणे असंभवनीय आहे, हे आता हळूहळू काही शास्त्रज्ञांनादेखील कळून येऊ लागले आहे.–

शवच्छेदनातून आकारास आलेले सिद्धांत प्राण्यांच्या चैतन्यमय जीवनाला लावून, 'नवा समाज,' 'नवे जग' व 'नवे जीवन' आकारास आणण्याचा खटाटोप, म्हणजेच आजकालच्या गतार्थ–निष्णातांच्या नवनवीन योजना.–

निश्चितता व सुरक्षितता हे प्रगतीचे दोन फार मोठे शत्रु आहेत. मानवी जीवनात निश्चित असे जर काही असेल तर ते एकच– मरण. बाकी सारे अनिश्चित. म्हणून निश्चितासाठी होणारी सारी धडपड ही अखंड सळसळत्या चैतन्याला जिवंतपणीच मृत्युमय करून टाकते. निश्चित बोलणे, निश्चत चालणे, निश्चत वागणे, निश्चित कार्य करणे, आणि स्वतंत्र, निराळे, क्षणाक्षणाला नवनवे व म्हणूनच अनिश्चत असे जे काही मानवी जीवनात असेल त्याचे संपूर्ण उच्चाटण करून टाकणे, याचे नाव 'आधुनिक योजनाबद्ध समाज.' योजनाबद्ध समाज म्हणजे बंद समाज, बंद माणूस, साचेबंद मन व बंदिस्त जीवन.–

२

योजना करणारे आपण कोण ?–याचा कोणीच विचार करीत नाही. ही विशाल सृष्टि ज्या शक्तीने निर्माण केली, आणि ज्या शक्तीने आपल्याला सृष्टीतील या भूगोलावर आणून सोडले, त्या शक्तीचे यथार्थ दर्शन झाल्याशिवाय कोणत्याहि

मानवी योजनेला यथार्थता प्राप्त होणे मूलतःच असंभवनीय आहे. या सत्याची जाणीव झालेले आदि मानव म्हणजे वैदिक ऋषि. त्यांनी जगाकडे व जीवनाकडे सूक्ष्मतेने निरखून पाहिले आणि ते उद्गारले ! " ईशावास्यमिदं सर्वम् "–

या सृष्टीची उत्पत्ति, स्थिति आणि लय घडवून आणणाऱ्या शक्तीला 'ईश' असे नाव देऊन, हे सर्व काही 'ईशावास्यम्' आहे, ईश–शक्तीने व्यापिलेले आहे, असे उपनिषत्कारांना दिसून आले. म्हणून या ईश–शक्तीवरच आपले सारे लक्ष केंद्रित करून, त्यांनी जग आणि जीवन यांना अर्थ प्राप्त करून देणारे एक विशाल दर्शन आकारास आणले. हे 'दर्शन' जितके विशाल व भव्य आहे तितकेच ते सूक्ष्म व चिरंतन असे आहे.–

'ईशावास्य' हे एकच उपनिषद् मी अलीकडे अहर्निश गुणगुणत असतो. किती तरी दिवस, किती तरी महिने लोटून गेले तरी मला त्याचा कंटाळा आलेला नाही. ते 'गतार्थ' करण्याचा प्रयत्न करूनहि ते गतार्थ होऊ शकत नाही, असा माझा अलीकडचा अनुभव आहे. उलट, माझ्या अनुभवांच्या पसाऱ्याकडे पाहून त्यातून काही संगति, काही अर्थ काढण्याचा मी जो खटाटोप आरंभिला आहे, त्या खटाटोपाला देखील काही अर्थ प्राप्त करून दिला असेल, तर तो ईशावास्यानेच.

–काळ सदा जात असतो; पण तो गतार्थ कधीच होत नाही. कारण काळ म्हणजे केवळ भूतकाळ नव्हे. भूतकाळात कायमच्या गडप होऊन गेलेल्या घटनाच केवळ गतार्थ होत असतात. पण काळ जसा सदा जात असतो तसा तो सदा येतहि असतो. अखंड जात राहणे आणि अखंड येत राहणे ,हे ज्याचे लक्षण तो काळ. काय जाते ते आपल्याला कळते; पण काय येते, काय येऊ घातले आहे, ते मात्र आपल्याला कळत नाही. आणि म्हणून काळ हे कधीहि न सुटणारे असे एक कोडे होऊन बसले आहे.–

'ईशावास्य' हे मला काळासारखेच एक कोडे होऊन बसले आहे. ते मी म्हणू लागतो, गाऊ लागतो; आणि, केवळ अठरा श्लोकांचेच असल्यामुळे, ते संपते. पण त्यामुळे ते गतार्थ मात्र कधीच होत नाही. पुनः पुन्हा मी ते म्हणतो; पुनः पुन्हा माझे म्हणणे संपून जाते. कदाचित् ते गतार्थहि होत असेल. पण 'ईशावास्य' मात्र कधीच गतार्थ होत नाही. माझे गुणगुणणे संपुष्टात आले की ते जाते आणि पुन्हा गुणगुणावेसे वाटले की तितक्याच नव्या नवलाईने पुन्हा ते येते – काळाप्रमाणेच ते सदा जात राहते आणि सदा येत राहते. सदा जाणे आणि सदा येणे हे जर काळाचे लक्षण असेल तर 'ईशावास्य' हे मला काळासारखेच भासू लागते यात नवल काय ?– काळ इतर सर्व वस्तूंना गतार्थ करून टाकतो पण तो स्वतः मात्र कधीच गतार्थ होत नाही; तद्वत् 'ईशावास्य' गुणगुणणारे, त्यावर

भाष्य करणारे गतार्थ झालेले असले, तरी 'ईशावास्य' स्वतः मात्र अद्यापहि, हजारो वर्षे लोटून गेल्यानंतर–देखील गतार्थ झालेले नाही.–

काळाने देखील जे गतार्थ होत नाही तेच चिरंतन. 'ईशावास्य' हे एक चिरंतन आहे. ते शब्दरूप चिरंतन आहे. त्या शब्दांतून जो अर्थ ध्वनित होतो तो चिरंतन आहे. त्या अर्थांत अखंड सळसळणारे चैतन्य आहे. असंख्य भावना–कल्पना –विचारांचा कल्लोळ मानवी मनात उडवून देण्याचे सामर्थ्य त्यात आहे. भावना–कल्पना–विचार यांच्या अवगुंठनात त्याला पकडून धरण्याचे प्रयत्न अनेकांनी युगायुगात केले. पण ते कुठेच पकडले गेले नाही. आणि म्हणूनच ते गतार्थहि झालेले नाही.–

काळातीत असे जे काही आहे त्याचे दर्शन घडविण्यासाठीच 'ईशावास्य' आकारास आले असले पाहिजे. आणि हे 'दर्शन' ज्या शब्दांत ग्रथित झाले आहे त्या शब्दांत त्या काळातीताचा ताल–लयबद्ध ध्वनि स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला असला पाहिजे. आणि म्हणूनच 'ईशावास्या'ला चिरंतनत्व प्राप्त झाले असले पाहिजे.–

● ● ●

एकीकडे आधुनिक मानव या नात्याने मला आलेल्या अनुभवांचा पसारा आणि दुसरीकडे हजारो वर्षापूर्वीपासून चालत आलेले हे ईशावास्य. काही संबंध?– काळाच्या इतक्या अफाट अंतराने एकमेकापासून दूर असलेल्या या दोन गोष्टीत कोणत्या संबंधाची अपेक्षा करता येणार? माझे अनुभव वर्तमान काळातले–इसवी सनाच्या विसाव्या शतकातले. आणि ईशावास्य अतिपुरातन काळातले. त्याचा कर्ता हा माझ्यासारखाच एक माणूस असला पाहिजे, असे आधुनिक तर्कशास्त्रानुसार म्हणता येते. पण वैदिक तर्कशास्त्र म्हणते, वेद अपौरुषेय आहेत. म्हणजे ते मानव-कृत नसून 'ईशकृत' आहेत. ईशावास्याचा ऋषि, म्हणजे द्रष्टा, 'नारायण' या नावाचा होता, असे कोणी मानतात, तर कोणी 'दध्यङ् आथर्वण' या नावाचा तो होता, असे मानतात. वैदिकांचे म्हणणे असे आहे की, ऋषि हे 'मंत्रद्रष्टे' होते, ते मंत्रनिर्माण–कर्ते नव्हते, मंत्र 'पाहणारे' 'ऐकणारे' ते होते. 'आम्ही असे ऐकले आहे'– असेच सर्व वैदिक ऋषि आपापल्या मंत्रांबद्दल म्हणतात. म्हणून 'शाकुंतला'चा कर्ता कालिदास अथवा 'उत्तर राम चरिता'चा कर्ता भवभूति, असे जसे निश्चयाने म्हणता येते, तसे वेदोपनिषदातील महत्वाच्या मंत्रां-बद्दल, अमुक मनुष्य त्यांचा कर्ता, असे म्हणता येत नाही. कारण हा कर्ताच म्हणतो, 'इति शुश्रुम धीराणाम् ये नस्तद्विचचक्षिरे"–

–वैदिकांची ही भूमिका आधुनिकांना मान्य होण्यासारखी नाही हे, मी–देखील आधुनिक असल्यामुळे, मला स्पष्टपणे जाणवते. पण हा वादग्रस्त मुद्दा बाजूला सारला तरी ईशावास्याच्या चिरंतन महत्वाला त्यामुळे काही बाध येत नाही.–

तूर्त माझ्यासमोर जो प्रश्न आहे तो अगदी निराळा आहे. ईशावास्याचा कर्ता कोणी पुरुषच होता असे मानून देखील या अतिपुरातन उपनिषदाने माझे आधुनिक मन इतक्या उत्कटतेने आकृष्ट का करावे ? ईशावास्य हजारो वर्षांपूर्वी आकारास आले. त्याच्या कर्त्यात आणि माझ्यात हजारो वर्षांचे हे विशाल अंतर पसरलेले आहे. आणि तरीहि माझ्या आधुनिक अनुभवांच्या पसाऱ्याला काही संगति आहे का, काही अर्थ आहे का, हे जाणून घेण्यासाठी ईशावास्याचा आश्रय मी करू लागलो आहे !–

३

काही शब्दांत सार्थ चिरंतनत्व दडून बसत असले पाहिजे. शब्दाला न्याय-शास्त्रात ' पद ' असे म्हणतात. हे ' पद ' उच्चारताच त्यामुळे ज्या वस्तूचा बोध होतो, तो त्या पदाचा (शब्द समुच्चयाचा) अर्थ. म्हणून ' पदार्थ.' सारी सृष्टि, निदान मानवाच्या दृष्टीने, पदार्थरूप आहे. मानव वस्तु पाहतो व तिला नाव देतो. ते नाव अथवा ' नाम ' त्या वस्तूचा, म्हणजे त्या ' रूपा'चा त्याला बोध करून देते. म्हणून ही सारी सृष्टि नामरूपात्मक आहे, असे भारतीय तत्वज्ञानी मानतात. ज्या वस्तूंना रूप प्राप्त झालेले असते त्याचे आपण पाहू शकतो व त्यांनाच ' नावे ' देऊ शकतो. पण ज्यांना रूप नाही अशाहि वस्तूंचे आभास आपल्याला होत असतात. ' हा मनुष्य फार चांगला आहे,' अथवा तो मनुष्य फार वाईट आहे ' असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा ' चांगला ' व ' वाईट ' या पदांनी आपण कोणत्या रूपात्मक वस्तूचा बोध करून घेतो अथवा इतरांना बोध करून देत असतो ?

' चांगले–वाईट,' अथवा शिव–अशिव, सुंदर–असुंदर, सत्य–असत्य, या पदांनी जे अर्थ आपण ध्वनित करीत असतो, त्यांचे रूप काय ? त्यांना रूप अथवा अस्तित्व असलेच पाहिजे. पण ते डोळ्यांनी दिसू शकत नाही. इतरांना ते आपल्याला, इतर जड व स्थूल वस्तूप्रमाणे, दाखविता येत नाही. पण ते असते म्हणूनच आपण त्यांच्या नावांचा, पदांचा उच्चार करीत असतो. सत्य, शिव, सुंदर या पदांनी आपण काही तरी ' अर्थ ' म्हणजे, वस्तु सूचित करीत असतो. म्हणूनच सत्य, शिव, सुंदर हे ' पदार्थ ' होऊ शकतात. ज्या शब्दांनी वा पदांनी

कोणतीहि वस्तु वा अर्थ सूचित होत नाही, ते शब्द वा ती पदे म्हणजे व्यर्थ वडवड होय. तो शब्दात्मक वा पदात्मक उच्चार नसून तो केवळ आवाज, नाद वा ध्वनि होय. शब्द वा 'पद' या नावास पात्र होणारा उच्चार वा ध्वनि तोच की ज्याने निश्चित वस्तु वा अर्थ सूचित होतो.

व्याकरणात ज्यांना भाववाचक नामे म्हणून म्हणतात त्यांचे 'रूप' वा 'अर्थ' आपल्याला 'मन' या सहाव्या ज्ञानेंद्रियाने कळत असतो. सत्य–शिव–सुंदर यांनी ध्वनित वा सूचित केल्या जाणाऱ्या वस्तूंचा आपल्याला जो वोध होतो तो आपल्या मनाने होतो. पंचज्ञानेंद्रिये आणि मन, ही आपल्या बोधाची, ज्ञानाची साधने आहेत.–

पण ही सर्व ज्ञानेंद्रिये अतींद्रिय आहेत. आपल्याला डोळे दिसतात. पण दिसणारे डोळे हे चक्षुरिंद्रिय नव्हे. नुकत्याच मेलेल्या माणसालाहि डोळे असतात. ते आपल्याला दिसतातहि. पण त्यातील चक्षुरिंद्रिय नाहीसे झालेले असते. म्हणून डोळे, नाक, कान, जिव्हा व त्वचा हे त्या त्या इंद्रियाचे केवळ पार्थिव आधार होत. हे पार्थिव पदार्थ म्हणजे इंद्रिये नव्हत. म्हणून इंद्रिये ही वस्तुतः अतींद्रिय आहेत. त्यांचे अस्तित्व अनुमान प्रमाणानेच आपल्याला जाणून घ्यावे लागते.

अशा अनेक वस्तु आहेत, अनेक 'पदार्थ' आहेत की ज्यांचे अस्तित्व केवळ अनुमानप्रमाणानेच सिद्ध होते; त्यांच्या अस्तित्वाचा आपल्याला जो बोध होतो तो केवळ अनुमानप्रमाणानेच होतो. पण बहुतांश लोकांना याची जाणीव नसते. ते या बोधासाठी आप्तांच्या शब्दावरच विसंबून असतात. बहुतांश माणसांचे अतींद्रिय वस्तूंबद्दलचे ज्ञान हे शब्द प्रामाण्यात्मकच असते. 'बाबावाक्यं प्रमाणम्'– ही वृत्ति जुन्या लोकांनाच नव्हे, तर आधुनिकतम लोकांनाहि फार मोठ्या प्रमाणात अवलंबावीच लागते. समग्र प्रमाणशास्त्र हस्तगत करण्यासाठी, आत्मसात करण्यासाठी जे श्रम घ्यावे लागतात ते टाळण्याकडेच सर्वसामान्यांचा कल असतो. मग हे सामान्य जुन्या वळणाचे असोत, वा नव्या वळणाचे असोत. बौद्धिक आलस्य हा मानवाचा परंपरागत चालत आलेला दोष आहे. आपल्याला सुधारलेले व प्रगतिशील मानणारे आधुनिक मानव तर बौद्धिक आलस्याच्या बाबतीत सनातन्यावरहि ताण करणारे आहेत. एखाद्या नामवंत पाश्चात्य पंडिताने लिहिलेला ग्रंथ हाती पडताच हे आधुनिक स्वतःला ज्ञानवान् मानू लागतात. पाश्चात्य पंडितांची मते आपापल्या शैलीत लोकांना सांगत सुटणे, म्हणजेच बुद्धिवान, ज्ञानवान होणे, असे हे आधुनिक मानतात. वस्तुतः आधुनिक काय, अथवा सनातनी काय, हे दोन्ही केवळ शब्द प्रामाण्यवादी प्राणी आहेत. शब्दप्रामाण्य म्हणजे आप्तवाक्य–प्रामाण्य. फरक एवढाच की सनातन्यांचे आप्त निराळे व आधुनिकांचे आप्त निराळे.

आपण सुधारलेले आहोत, प्रगतिशील आहोत, आपल्या पूर्वजांपेक्षा, सनातन्यांपेक्षा श्रेष्ठ आहोत, असे जे अनेक आधुनिक मानतात, तो निव्वळ भ्रम होय.

४

माझ्या समोर पसरलेल्या या माझ्या गतानुभवांचे काय करावे ? कोणत्या सूत्रात ते ओवावे ? कोणता सुसंगत अर्थ त्यातून काढावा ?– हा माझा सांप्रतचा प्रश्न आहे.

एकीकडे माझा हा अनुभवांचा पसारा– आणि दुसरीकडे हे ईशावास्याचे, ...ा नव्यानेच वाटू लागलेले आकर्षण.–

अनुभव आणि स्मरण म्हणजे ज्ञान, असे न्यायशास्त्र सांगते. मला जे अनुभव आले आणि ज्यांचे आता मला स्मरण होत आहे ते माझे ज्ञान आहे, असे मला न्यायशास्त्रानुसार मानावे लागते. पण हे माझे 'ज्ञान' मला कसलेहि समाधान देण्यास अपुरे पडत आहे. या अनुभवांना, या स्मरण-अनुभवरूप ज्ञानाला काही अर्थ आहे का ? मी आजवर या अनुभवांचा वा ज्ञानाचा जो अर्थ केला तो मला आता व्यर्थ वाटू लागला आहे. मला अनेक अनुभव आले आणि त्या अनुभवांना काही अर्थ आहे असे वेळोवेळी मी मानले. त्या अर्थाच्या आधारावर मी एकदा एका विचार-प्रणालीची, समग्र जीवनदर्शनाची उभारणी केली. कालांतराने, काही नव्या अनुभवांच्या प्रभावामुळे, ती मला भ्रममूलक वाटू लागली. म्हणून मी दुसऱ्या विचार-प्रणालीचा अंगीकार केला. आणि नंतर तीहि भ्रममूलक वाटू लागली. म्हणून मी तिसऱ्या विचारप्रणालीचा अंगीकार केला.– पण अशा रीतीने एकेका विचार-प्रणालीचा डोलारा कालकालांतराने कोसळून पडल्यामुळे विचारप्रणालीचा डोलारा रचणे, हे मूर्खपणाचे तर नाही ना, असा विचित्र प्रश्न मला आता संत्रस्त करू लागला आहे.–

पण विचारप्रणालि नाही, समग्र–जीवनदर्शन नाही, तर मग जीवनाला अर्थच काय उरला ? समग्र जीवनदर्शनासाठीच माणूस विचारप्रणालि आकारास आणीत असतो. या विचारप्रणालीमुळेच जीवनाला काही अर्थ आहे, अशी श्रद्धा माणसाच्या अंतःकरणात उदयास येते. या श्रद्धेचे अधिष्ठान लाभणे, हीच जीवनाची सार्थकता नव्हे काय ?–

माझ्या सर्व भूतपूर्व विचारप्रणालींचे डोलारे कोलमडून पडले आहेत. त्यामुळे माझे सारे अनुभव विकीर्ण होऊन पुन्हा एकवार उघडे पडले आहेत. एका नव्या

विचारप्रणालीचे कधीहि न कोलमडणारे भव्य मंदिर उभारून, त्यांना सार्थता आणण्यासाठी मी सारखा धडपडत आहे. आणि ही धडपड चालू असताच माझे मन ईशावास्याकडे वेगाने आकर्षिले जाऊ लागले आहे.–

ईशावास्य हे एक समग्र जीवनदर्शन आहे, असा आभास मला होऊ लागला आहे. या दर्शनाच्या प्रभावामुळे माझे अनुभव मागे–पुढे भराभर सरकू लागले आहेत. त्यांची एक नवी जुळणी होऊ लागली आहे. या जुळणीतून एक नवा अर्थ मला प्रतीत होऊ लागला आहे. जीवनाच्या सार्थकतेचे तेजोगर्भ असे एक नवे क्षितिज मला दूर दूर दिसू लागले आहे.–

● ● ●

कालदृष्ट्या विचार करता माणसांचे तीन प्रकार करता येतील. भूतकालानुगामी माणसे, वर्तमानानुगामी माणसे आणि भविष्यकालानुगामी माणसे.

काळ माणसांच्या पाठीमागे धावत सुटला आहे. आणि, आपण कालवश होऊ नये म्हणून, माणसे कुठे तरी इतस्ततः धावपळ करीत सुटली आहेत. पण कुठे तरी धावपळ करीत असतानाच आपण काळाच्याच कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या आहारी जात आहोत, याची मात्र माणसांना जाणीव असलेली दिसून येत नाही.–

बहुतांश माणसे भूतकालानुगामी असतात, असे सूक्ष्म विचारांती दिसून येईल. आणि हे बरेचसे स्वाभाविकहि आहे. मातेच्या उदरातून बाहेर पडल्यापासूनच मानव प्रथमतः मातानुगामी बनत असतो. नंतर तो जसजसा मोठा होऊ लागतो तसतसा माता-पितानुगामी, गुरुजनानुगामी, आप्तमित्रानुगामी, म्हणजेच परंपरानुगामी होऊ लागतो. बहुतांश मानव परंपरानुगामी अवस्थेत, म्हणजेच भूतकालानुगामी अवस्थेत असतानाच कालवश होतात.–

पण काही माणसे, काही विशिष्ट अनुभवांच्या प्रभावामुळे, परंपरेच्या अवगुंठनातून बाहेर पडण्यासाठी धडपड करू लागतात, बंडखोर बनू पाहतात. पण परंपरेचे अवगुंठन एवढे विशाल व प्रबल असते की, त्यातून बाहेर पडण्याची धडपड करीत असता ते पुन्हा परंपरेच्याच कोणत्या ना कोणत्या प्रकारात विलीन होऊन जातात. परंपरेचा प्रभावच एवढा प्रचंड असतो की, त्याच्या आवाक्याबाहेर भरारी मारणे माणसाला जवळ जवळ अशक्य होऊन बसते.

परंपरेचा प्रभाव हा गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीसारखा असतो. उंच उडी मारून काही हात जमीनीच्या वर माणसाला जाता येते. पण किती थोडा वेळ !

अनुक्रमणिका

यांत्रिक शक्तीचे साहाय्य घेऊन विमानाच्या द्वारे आकाशात अधिक उंच जाऊन अनेक तास माणसाला भराऱ्या मारता येतात, हे खरे. तरीपण शेवटी त्याला जमीनीवर यावेच लागते. आणि कधी कधी, विमानात बिघाड होऊन, अथवा निसर्गाचा कोप होऊन, विमान खाली कोसळले की, त्याला जमीनदोस्तच व्हावे लागते.

परंपरेचेहि हे असेच आहे. परंपरेच्या पातळीवरून मोठ्या प्रयासाने व साहसाने माणसाला वर जाता येते. पण किती थोडा वेळ? आणि विशाल परंपरेच्या किती थोड्या भागाचे उल्लंघन करून?– पण या थोड्या वेळातच त्याला जे दिसते व भासते त्यालाच तो 'प्रगति' हे नाव देतो. तो आशावादी बनतो. जग बदलता येणे शक्य आहे, मानवी जीवनात क्रांति घडवून आणता येणे शक्य आहे, अशी भाषा तो बोलू लागतो. अनेकांना ही भाषा मोठी आकर्षक वाटू लागते. आणि मग तेहि तीच भाषा बोलू लागतात. या भाषेने बरेचसे लोक भारावले गेले व काही सामाजिक घडामोड घडून आली की, प्रगतिपथावर आपण जरा पुढे गेलो आहोत, असे या लोकांना वाटू लागते.–

मलाहि असेच वाटू लागले होते. तारुण्यातील काही अत्युत्कट अनुभवांच्या प्रभावामुळे मी परंपरेच्या विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. हा झेंडा सर्व भेदातीत मानवतेचे प्रतीक अशा पांढऱ्याशुभ्र रंगाचा होता. या झेंड्यावर 'व्यक्तिस्वातंत्र्य' ही अक्षरे मी लिहिली होती. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीची केवळ व्यक्ति या नात्याने प्रतिष्ठा आणि भेदातीत अशी उदात्त मानवता, यांच्याशी जे जे विसंगत ते ते त्याज्य व निषेधार्ह,– असा माझा बंडाचा दंडक होता. या झेंड्याशी जे जे विसंगत वा विरोधी असे मला भासले, मग ही विसंगति धर्माच्या, प्रस्थापित नीतीच्या, रूढ सामाजिक परंपरेच्या वा इतर कोणत्याहि तत्वाच्या नावावर आकारास आलेली असो, त्या सर्व विसंगतीचा मी तीव्रतम विरोधक बनलो. या उघड बंडामुळे मी माझ्या माता–पित्यांपासून, आप्तांपासून, रूढ व प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या अनेक सामाजिक जाणिवांपासून दूर गेलो. पण त्याची मी पर्वा केली नाही. काय वाटेल ते झाले तरी आपल्या अनुभवांशी कालत्रयी देखील यत्किंचित् प्रतारणा करावयाची नाही, असा आंतरिक निर्धार माझ्या अंतःकरणात उदय पावला होता.

या निर्धाराच्या बळावर मी पुढे पुढे जाऊ लागलो. परंपरेच्या गुरुत्वाकर्षणाची प्रचंड शक्ति मला मागे ओढीत होती. पण तिच्या आवेगालाहि न जुमानता, सारी आंतरिक जीवशक्ति एकवटून मी उंच, उंच भराऱ्या मारू लागलो.– या उंचीवरून मला जे दिसले, जे भासले ते उदात्त होते, रोमहर्षक होते, आनंदमय होते; कारण ते चैतन्यमय होते.

अनुक्रमणिका

—त्या आनंदाच्या भरातच मी हळूहळू खाली उतरलो. जमीनीच्या सपाटीवरून चालू लागलो. एक संसारी माणूस म्हणून जीवन व्यतीत करू लागलो. पण जीवनाकडे, जगाकडे, आणि विशेषत: माणसांकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टीत आमूलाग्र बदल घडून आला होता, असे मला आढळून आले.— त्या उंचीवर असताना जे दिसले, जे भासले त्याची स्मृतीच या नव्या दृष्टीला प्रेरक झाली होती.—

आता सारी, सारी माणसे मला अनोळखीशी वाटू लागली होती. माझी भाषा त्यांना कळेनाशी झाली आहे, असे मला आढळून येऊ लागले. माझी भाषा त्यांना कळावी, त्यांनाहि आमूलाग्र हादरून टाकावे, बदलून टाकावे, उंचाव्यावर असताना मला दिसलेले 'दिव्य भास' त्यांनाहि दाखवावे अशी उत्कट इच्छा माझ्या अंत:करणात उद्‌भवली. या इच्छेच्या उमाळ्यामुळेच काही साहित्य माझ्याकडून लिहिले गेले. लोक थोडे हादरताहेत, माझे 'दिव्य भास' त्यांनाहि थोडेबहुत दिसू लागले आहेत, असा मला भास होऊ लागला.— पण अखेरीस तो केवळ भासच ठरला.—

—सारी माणसे भूतकालवश झालेली मला आढळून आली. भूतकालाची झापड त्यांच्या मनावर पसरल्यामुळे ती सारी अर्धनिद्रितावस्थेत वावरत आहेत, असे मला दिसून येऊ लागले. गाढ झोपी गेलेल्या माणसाला जागे करण्यासाठी आपण त्याला जोराने हलवितो व मोठमोठ्याने त्याला हाका मारतो; तसेच मला करावेसे वाटले. माझ्या साहित्य–लेखनात आवेश होता, आक्रोश होता, हादरे देणारे आत्यंतिक, अत्युत्कट, मर्मभेदी शब्द–प्रयोग होते. आणि त्या बरोबरच क्षण–अनंताच्या अखंड मीलनाची हाक होती. पण भूतकालवश व म्हणूनच अर्धनिद्रित टीकाकारांना हा सारा प्रकार अतिरंजित, अवास्तव व कलाशून्य भासला. केवळ कलेकरता, केवळ कलाविलासाकरता माझे साहित्य आकारास आले नव्हते. या भूतकालवश अर्धनिद्रितांना हादरे देऊन, जोराने हलवून व मोठमोठ्याने हाका मारून जागे करणे, हीच माझ्या साहित्याची मूळ प्रेरणा होती. परंतु टीकाकार व रसिक म्हणून प्रतिष्ठा पावलेले लोक देखील भूतकालवश व अर्धनिद्रित असल्यामुळे त्यांना या प्रेरणेचे रहस्य कळू शकले नाही. काही दिवस थोडा गाजावाजा होऊन माझे साहित्य मागे पडले. लोकाभिमुख, लोकरंजनात्मक, भूतकालवशतेला आंजारून गोंजारून लिहिल्या गेलेल्या इतरांच्या साहित्याने लोकप्रियता मिळविली. आणि साहित्यकार या नात्याने मला प्राप्त होऊ लागलेले महत्व संपुष्टात आले.

५

भूतकालवश, अर्धनिद्रित वृत्तीवर आधारलेल्या परंपरेची शक्ति अपार असते. तिच्यावर मात करण्यासाठी तिच्या तोडीची अपार शक्ति मानवी

अंत:करणात उदय पावून ती पुरेशी विकसित झाल्याशिवाय भूतकालवशतेच्या मगरमिठीतून लोकांची व समाजाची विमुक्तता घडवून आणणे अशक्यप्राय आहे. या कठोर सत्याची मला हळूहळू जाणीव होऊ लागली. परंपरेच्या प्रचंड गुरुत्वाकर्षणात्मक शक्तीच्या प्रभावातून माझी देखील पुरेशी मुक्तता झाली नसावी, हे माझ्या ध्यानी येऊ लागले. क्षणोक्षणी येणाऱ्या काही अनुभवांच्या द्वारे चैतन्यमय वर्तमानाचे ओझरते दर्शन मला घडत होते व ते मला वेड लावीत होते, थरारून सोडीत होते. सारे मानव, सारे विश्व या चैतन्यानंदाचे वाटेकरी व्हावे, असे मला क्षणोक्षणी उत्कटतेने वाटत होते. पण माझी शक्ति तोटकी आहे, हे मला कळून येऊ लागले. कदाचित् चैतन्यमय वर्तमानाचे माझे दर्शन केवळ अंशात्मक असेल, व त्यामुळे माझी शक्ति अपुरी पडत असेल, अशी शंका माझ्या अंत:करणात घर करू लागली.–

एकीकडे चैतन्यमय वर्तमानाचा ओझरता, पण आवेगवान व अत्यानंदमय स्पर्श आणि दुसरीकडे अपुऱ्या शक्तीची जाणीव व तज्जन्य आत्यंतिक विषण्णता– अशा विचित्र द्वंद्वात माझे जीवन आंदोळू लागले.–

कालांतराने, अचानकपणे एका महापुरुषाची हाक माझ्या कानावर येऊन आढळली. त्या हाकेत मला प्रिय असलेल्या स्वातंत्र्याचे तेज होते. ती भारतीय स्वातंत्र्याची हाक होती. स्वातंत्र्य हाच चैतन्यमय वर्तमानाचा गाभा, याची जाणीव मला पुरेपूर झालेली होती. त्यासाठी बाह्य आवाहनाची माझ्या बाबतीत कसलीहि आवश्यकता उरलेली नव्हती. ते माझ्या आंतरिक जीवनाचे एक जिव्हाळयाचे अंगच होऊन बसले होते. माझ्या आंतरिक जीवनात क्षण–अनंताच्या अखंड मीलनाचा मला जो मधून मधून अनुभव येत होता, तो स्वातंत्र्याच्या जाणिवेमुळेच. माझ्या क्षणोक्षणीच्या व्यक्तिनिष्ठ, आत्मनिष्ठ जीवनाला अनंताचे क्षितिज लाभले होते, ते स्वातंत्र्याच्या चैतन्यमय जाणिवेमुळेच.–

म्हणून भारतीय स्वातंत्र्यासाठी एका महापुरुषाने मारलेल्या हाकेचे पडसाद माझ्या अंत:करणात उमटू लागले. या स्वातंत्र्याच्या हाकेत आणखी एक नवलपूर्ण विशेष साठला होता. ही नव्या स्वातंत्र्याची हाक जुन्या भारतीय परंपरेचे सारे बळ पाठीशी घेऊन अवतीर्ण झाली होती. त्या हाकेला भगवद्गीतेच्या तेजस्वी वाणीचे अधिष्ठान होते. भूतकाळाला वर्तमानाभिमुखी करण्याचे सामर्थ्य त्या हाकेत साठले आहे, असा मला भास झाला. भूतकालवशताजन्य अर्धनिद्रितावस्थेला जोराचा हादरा देऊन भारतीयांना जागे करण्याचे, चैतन्यमय वर्तमानानुगामी करण्याचे सामर्थ्य त्या हाकेत एकवटले असावे, असा भास मला झाला.–

मी त्या हाकेला 'ओ' दिली. भारतीय स्वातंत्र्याच्या संग्रामात, माझे संसारी जीवन वाऱ्यावर उधळून, मी उडी घेतली. भूतकालवश अर्धनिद्रित भारत

जागृत होऊन चैतन्यमय वर्तमानाशी समरस होईल, अशा आशेने मी या भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आपली आहुति दिली.

● ● ●

हजारो, लाखो, कोटयवधि भारतीयांनी या हाकेला 'ओ' दिली. सारा भारतवर्ष काही काल आसेतुहिमाचल हादरला गेला. ते एक भव्योदात्त दृश्य होते. व्यक्ति आणि समष्टि यांच्या चैतन्यमय तादात्म्याचा तो एक नवलपूर्ण आविष्कार आहेसे मला भासले. माझ्या व्यक्ति-स्वातंत्र्याची एकतारी समष्टि-स्वातंत्र्याच्या सारंगीशी काही काळ एकतानता पावली.–

पण केवळ काही काळच.– कारण लवकरच मला कळून चुकले की, या प्रचंड आणि अनेक दृष्टींनी अभूतपूर्व अशा जनआन्दोलनात साकार झालेले अनेकत्व, चैतन्यमय वर्तमानानुगामी अशा व्यक्ति-स्वातंत्र्याच्या जीवनमूल्यावर अधिष्ठित झालेले नसून, ते भूतकालानुगामी आणि अर्धनिद्रित अशा समूह-भावनेवरच अधिष्ठित झालेले आहे. व्यक्तीला 'व्यक्ति' या नात्याने या अनेकत्वात कसलेहि मूल्य नव्हते. उलट, आंधळया समूह-भावनेशी विसंगत असलेले अनेक व्यक्तित्वाविष्कार या जनआंदोलनाला सहन होऊ शकत नव्हते.

एकीकडे भारतीय स्वातंत्र्यासाठी आकारास आलेले नवलपूर्ण जनआंदोलन आणि दुसरीकडे माझ्या वैयक्तिक जीवनाला प्राणभूत झालेले व्यक्तिस्वातंत्र्य– असा चमत्कारिक संघर्ष माझ्या अंतराळात सुरू झाला. हा संघर्ष मनाला सदैव संत्रस्त करीत असताहि, मी त्याकडे थोडे दुर्लक्ष करू लागलो. आधी भारतीय स्वातंत्र्य आणि मग व्यक्तिस्वातंत्र्य, अशा भयानक समेटाच्या आहारी मी माझ्या मनाला जाऊ दिले. या समेटाचा भयानकपणा त्यावेळी मला इतका जाणवला नाही. कारण भारतीय स्वातंत्र्याच्या जनआन्दोलनाची धुंद माझ्याहि डोळयावर थोडी चढली होती.–

या भयानक समेटाने व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यापासून मला हळूहळू बरेच दूर दूर नेले. सीतामाईचे कांचनमृगाकडे जसे लक्ष गेले आणि त्यामुळे लक्ष्मणाच्या रेषेचेहि जसे उल्लंघन तिच्या हातून घडले, तसाच काहीसा प्रकार माझ्याहि बाबतीत घडला. भारतीय स्वातंत्र्याच्या जनआन्दोलनातून पुढे आपोआप चैतन्यमय व्यक्तिस्वातंत्र्य आकारास येणारच, ही माझी कल्पना म्हणजेच सीतेला दिसलेला कांचनमृग ! मीहि रामाप्रमाणे या कांचनमृगामागे धावत सुटलो. आणि तिकडे माझ्या अंत:करणातील व्यक्तिस्वातंत्र्याच्या देवतेने लक्ष्मणाच्या रेषेचे उल्लंघन केले– या अशा घटनेतून अनर्थपरंपरेशिवाय दुसरे काय निष्पन्न होणार ?–

भारतीय स्वातंत्र्याच्या जनआन्दोलनाची एक प्रचंड लाट वर उसळली आणि विलय पावली. मंदावलेल्या जनआन्दोलनाला पुन्हा एकवार उठावणी देण्याचा प्रश्न राष्ट्रासमोर उभा राहिला. या बाबतीत त्या महापुरुषाचे यत्नहि अपेशी ठरू लागले. अशा अवस्थेत देश असता, साम्यवादाचे एक नवीन वारे पश्चिमेकडून आले. जागतिक क्रांतीचे लाल निशाण मोठ्या दिमाखाने फडफडवीतच हे वारे आले. भारतीय स्वातंत्र्यासाठी अधीर झालेल्या अनेक तरुणांना हे क्रांतीचे नवे निशाण मोहक वाटले. शेकडो भारतीय तरुण या लालवावटळीत वाहून गेले. मी वाहून जरी गेलो नाही तरी काही काळ मोहित मात्र खासच झालो. पार वाहून न जाण्याचे कारण माझ्या अंतःकरणातील ती व्यक्ति-स्वातंत्र्याच्या चैतन्याची धुगधगी.–

● ● ●

साम्यवादाच्या प्रभावाने, व्यक्ति-स्वातंत्र्याच्या चैतन्यमय वर्तमानापासून, जागतिक वर्गयुद्धाच्या माध्यमातून 'अपरिहार्यपणे' आविष्कृत होणाऱ्या वर्ग-विरहित समाजरचनेच्या भविष्यकालीन स्वप्नाकडे मला नेले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेतावर उभारण्यात आलेल्या साम्यवादाच्या या मोहमयी स्वप्नरंजनात माझ्या जीवनाची दहा वर्षे खर्ची पडली. आणि चैतन्यमय वर्तमानातून अचानकपणे आलेला जोराचा हादरा पुन्हा एकवार बसला नसता, तर सदैव अप्राप्य अशा भविष्यात्मक स्वप्नाच्या वेदीवर जगातील इतर असंख्य ध्येयवादी व धुंद स्त्री-पुरुषांचे जसे बलिदान झाले, तसेच माझेहि बलिदान कदाचित् घडून आले असते.

माझ्या आयुष्याची सुमारे दोन तपे प्रचंड जनआन्दोलनात आणि तितक्याच प्रचड वैचारिक संघर्षात खर्ची पडली. आज या निश्चल बिछान्यावर पडून त्या वेगवान काळाकडे मी जेव्हा पाहू लागतो तेव्हा मनुष्य किती मूर्ख, किती बावळट, किती आंधळा आणि तरीहि किती आवेशपूर्ण व उद्दाम अहंकारी बनू शकतो, याची मला पुरेपूर जाणीव होते.–

महासागरावरील प्रचंड वादळाने मानवकृत अशा भव्य नौकेची दाणादाण उडवून द्यावी आणि मग त्या नौकेच्या एखाद्या ठिकरीला पकडून प्रचंड लाटांचा मारा सहन करीत आणि क्षणाक्षणाला जीवन-मृत्यूच्या रेषेवर तरंगत प्रवाशांनी काळ कंठावा– असेच काहीसे त्या संघर्षमय काळाचे स्वरूप होते. आज मी कसाबसा एका किनाऱ्याला लागलो आहे. पण हताश, हतबल, असहाय, हतबुद्ध अशा अवस्थेत.–

अनुक्रमणिका

या अवस्थेतून त्या काळाकडे पाहू लागता मला आता स्पष्ट दिसून येते की, माणसाचा 'काळ' माणूसच आहे. बहुतांश माणसे गतार्थ भूतकालानुगामी बनून 'चैतन्यमय जीवनाला पारखी होऊन बसतात; तर इतर काही सदैव अप्राप्य अशा भविष्यकालीन स्वप्नाकडे डोळे लावून चैतन्यमय जीवनाला कायमचे अंतरतात. एकीकडे गतार्थ भूतकालानुगामी जनता आणि दुसरीकडे व्यर्थ व असंभाव्य भविष्यनुगामी जनता, यांच्या वाढत्या संहारक संघर्षात चैतन्यमय वर्तमान हजारो वर्षांपासून सारखा चिरडत जात आहे. क्षणाक्षणातील सळसळत्या चैतन्यावर दृष्टि केंद्रित करून क्षण-अनंताच्या अखंड मीलनामुळे प्रतिक्षणी नवता धारण करणाऱ्या लावण्यमय जीवनाचा आस्वाद घेणारी जी काही विरळा माणसे या सर्वसंहारक संघर्षाच्या धुमश्चक्रीतूनहि उसळी मारून वर येतात आणि अर्धनिद्रित व धुंद मानवी जगाला जागे करण्याचा प्रयत्न करतात, त्यांचा आवाज कोणाच्याच कानी पडेनासा होतो. मानवी जीवनाचे हे विदारक चित्र पाहिले म्हणजे वाटू लागते, मानवाला कसले तरी भवितव्य आहे का ?–

'कालाय तस्मै नमः'– असे उद्गार काढून मानव आपल्या दुर्दैवाचे खापर सदैव कालाच्या माथ्यावर फोडीत आला आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे की, काळ माणसाला मारीत नसतो, तर माणूसच आपल्या मूर्खपणामुळे कालवश होत असतो. आपणच आपले काळ आहोत, याची जाणीव माणसाला झाली, तर जन्म-मृत्यूच्या सीमा उल्लंघून दिक्कालाच्याहि आरपार जाणारी एक नवी दिव्य दृष्टि त्याला कदाचित् प्राप्त होऊ शकेल.–

या नव्या दिव्य दृष्टीचा लाभ करून घेण्याकडे माझे मृतप्राय व मरणासन्न जीवन आता ओढ घेऊ लागले आहे.

(क्रमशः)

* * *

अनुक्रमणिका

गडकऱ्यांची नाटयप्रकृति व नाटयसृष्टि

●

लेखक:– वसंत वरखेडकर

●

(कै. राम गणेश गडकरी यांच्या ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त नागपूर येथे विदर्भ साहित्य संघात दिनांक २२ व २३ जानेवारी १९६१ रोजी झालेली भाषणे.)

गेली बेचाळीस वर्षे कै. राम गणेश गडकरी यांची पुण्यतिथि साजरी होत आहे. निदान गेली पंचवीस वर्षे तरी मी स्वत: ही पुण्यतिथि साजरी झालेली बघत आलो आहे. माझ्या माहितीप्रमाणे मी असं विनदिक्कत म्हणेन की आज महाराष्ट्रात क्वचितच असा नामवंत साहित्यिक असेल की ज्याने कै. गडकऱ्यांवर उभ्या आयुष्यात एकदाहि भाष्य केलं नसेल. ह्याचाच अर्थ असा की जाणत्यांची, रसिकांची, मर्मज्ञांची, अभ्यासकांची, संशोधकांची सूक्ष्म दृष्टि गडकऱ्यांच्या वाङ्मयावर फिरली आहे. तेव्हा अर्थातच क्षणभर असं वाटणं अगदी स्वाभाविक आहे की आता कोणी झाला तरी नवीन ते काय हुडकून काढणार आणि सांगणार ?

व्याख्यानातील दोन सूत्ररूप सिद्धान्त

माझ्या आजच्या व्याख्यानातील मुख्य सूत्ररूप सिद्धान्त असा आहे की कै. राम गणेश गडकरी यांची नाटयप्रकृति नियतिवादी होती. त्यांनी नाटकासाठी ज्या कथावस्तु उचलल्या त्यात त्यांना नियतीचा प्रभाव तरी प्रथम प्रत्ययाला आला किंवा ज्या ज्या कथावस्तु त्यांनी उचलल्या त्यांचा ओघ गेला तो नियती अनुसार.

उद्या मी बोलणार आहे कै. राम गणेश गडकरी यांच्या नाटयसृष्टीवर. ह्या संबंधातील माझा सूत्ररूप सिद्धान्त असा आहे की गडकऱ्यांची नाटयसृष्टि कल्पनारम्य कोटीतली आहे. तथाकथित वास्तव वा सामाजिक ह्या कोटीतली

अनुक्रमणिका

नव्हे. ह्या नाटचसृष्टीला कल्पनारम्य कलेचे निकष लावल्यास ती श्रेष्ठ प्रतीची ठरते. तसंच ह्या नाटचसृष्टीची काही खास प्रकृतिवैशिष्ठयंहि आहेत.

काही सर्वस्वी नवीन हुडकून काढावं असा माझा प्रयत्न नाही. तरीहि जे मी मांडीत आहे ते नवीन वाटल्यास बघा.

नाटचप्रकृति

माझा आजचा विषय आहे, 'गडकऱ्यांची नाटचप्रकृति.' इथे नाटचप्रकृति हा षष्ठी तत्पुरुष समास आहे. म्हणजे 'गडकऱ्यांच्या नाटचाची प्रकृति' असा आहे हा विषय. आपल्याला हे शीर्षक जरा नवीन वाटेल. गडकऱ्यांना एक शरीर होतं. हाडामांसाचं. त्या शरिराची एक विशिष्ट प्रकृति होती असं म्हटलं तर आपल्याला सहज समजेल. ती कफप्रकृति होती, का पित्तप्रकृति होती, का वातप्रकृति होती, हे धन्वंतरी आपणास सांगू शकले असते. इथे प्रकृति ह्या शब्दाचा जो अर्थ आहे तोच मलाहि अभिप्रेत आहे. होमिओपाथीचा डॉक्टर आपल्याला सांगेल की हा माणूस अॅकोनाइटचा पेशंट आहे आणि तो नक्स व्हॉमचा. म्हणजे इथे प्रकृतीचं लक्षणानुसार केलेलं वर्गीकरण आपल्याला आढळेल. असाच काहीसा प्रकार इथेहि आहे.

नाटचतनु गडकरी

प्रकृतीची काही लक्षणं साहित्याच्या रूपाने आपल्याला दिसताहेत. आता त्या लक्षणांची संगति लावायची आहे. प्रकृतीचं एक सुसंघ चित्र तयार करायचं आहे. तिचे नियम बसवायचे आहेत. वर्गवारी लावायची आहे. ही प्रकृति म्हणजे शरीरी नाही. शंकराचं वर्णन 'नादतनु' ह्या शब्दानं केलेलं आपल्याला माहित आहे. म्हणजे शंकराचं एक व्यक्तित्व नादमय कल्पिलेलं असून ह्या नादमय व्यक्तित्वालाच नादतनू ही संज्ञा आहे. अशाच अर्थाने गडकरी नाटचतनु आहेत. आणि ह्या नाटचतनूची एक विशिष्ट प्रकृति आहे.

गडकऱ्यांच्या कथावस्तु

कै. गडकऱ्यांची प्रमुख नाटकं म्हणजे पंचाक्षरी नांवाची पांच. पहिलं प्रेमसंन्यास, दुसरं पुण्यप्रभाव, तिसरं एकच प्याला, चौथं राजसंन्यास व पाचवं भावबंधन. ह्यांचा क्रम कसा लावावा हा थोडा मतभेदाचा प्रश्न होऊ शकेल. त्या मतमतांतराच्या वादात मी शिरत नाही. 'वेडयांचा बाजार' हे आणखी एक उपलब्ध असलेलं नाटक आहे. ह्याला प्रहसन म्हणण्यात आलं आहे. ह्याचे गडकऱ्यांनी स्वतः लिहिलेले दोन अंक किर्लोस्कर कंपनीच्या रंगभूमि नामक मासिकात प्रथम प्रकाशित झाले होते. आज हे नाटक अन्य हस्त पूर्ण झालेल्या स्थितीत आहे. १९२३ साली चिंतामणराव कोल्हटकरांनी बाकी भर घालून ते पूर्ण

केलं त्या स्थितीतच ते पूर्ण आहे. हे नाटक आपण पूर्ण का केलं ह्याची कारणं चिंतामणरावांनी दिली आहेत. ते म्हणतात की " राजसंन्यास नाटकाचे कथानक सर्वांच्या परिचयाचे असल्यामुळे व ते नाटक रंगभूमीवर आणणे अत्यंत जरूरीचे वाटल्यावरून ते तसेच बसविले व रंगभूमीवर आल्यावरहि लोकांनी त्याचा अत्यंत आदरपूर्ण व प्रेमयुक्त अंत:करणाने स्वीकार केला. पण वेड्यांचा बाजार नाटकाची स्थिति वेगळी होती. हे कथानक काही सर्वांच्या माहितीचे नव्हते. हेहि नाटक रंगभूमीवर आले पाहिजे हा मंडळीचा हेतु. म्हणून स्वतः काही भाग रचून नाटक पूर्ण करण्याचे धाडस करण्यावाचून दुसरा मार्ग राहिला नाही." चिंतामणरावांनी ह्या नाटकाच्या प्रकाशित आवृत्तीच्या प्रस्तावनेत हे उद्‌गार काढलेले आहेत. चिंतामणराव कोल्हटकरहि, साक्षात गुरु असलेल्या लेखकाबद्दल अतिशय आदर व भक्ति दर्शवूनहि नाटकाच्या दर्जाबद्दल म्हणतात, की भाषेच्या व नाट्याच्या दृष्टीने जरी विचार केला तरी त्या वेळचे गडकरी बाल गडकरी होते. सिंहगडाला घोरपड लावणे, तरवारीच्या धारेवर नाच करणे या गोष्टी ते शिकत होते. त्यामुळे या प्रहसनात नाट्यलेखनाचा त्यांचा बारकावा नाही ! वेड्यांचा बाजार नाटकात गडकऱ्यांच्या हातून उतरलेले अंक केवळ दोन आहेत. त्यातहि गडकऱ्यांचा नित्याचा थाट फार थोडा प्रत्ययाला येतो. स्वतः गडकऱ्यांनाहि ह्या नाटकाबद्दल फारसा उत्साह उरलेला नव्हता असं दिसतं. प्रेमसंन्यास एकदा लिहून पूर्ण झाल्यावर व त्याच्या तालमीची तयारी सुरू असता हे नाटक पूर्ण करून द्यावं म्हणून मंडळी गडकऱ्यांच्या मागे लागली असावी असं दिसतं. पण " ह्या अवकाशांत मी पूर्वानुसंधान बरेच विसरलो आहे." असं टाळाटाळीचं उत्तर गडकऱ्यांनी दिल्याचं ह्याच प्रस्तावनेत चिंतामणरावांनी सांगितलं आहे. हा भाग आपण समजू शकतो प्रतिभा प्रस्फुटित होण्यापूर्वी लिहिलेला भाग प्रतिभा गगनाला जाऊन भिडणारे कल्लोळ उठवू लागल्यावर लेखकाला कसा आकृष्ट करू शकेल ? अर्थात गडकऱ्यांनी ह्या अर्धवट लेखनाकडे स्वतःच पाठ फिरविली होती हे स्पष्ट आहे. माझ्या एकूण विचारात मी हे नाटक घेतलेलं नाही.

गर्वनिर्वाण

'गर्वनिर्वाण' नामक आणखी एक नाटक गडकऱ्यांनी 'प्रेमसंन्यास' नाटकापूर्वी लिहिलेलं होतं. हे प्रल्हादाच्या चरित्रावर आहे. हे नाटक रंगभूमीवर कधीच आलं नाही. हे लिहून पूर्ण तरी झालं होतं की नाही हे कळायला मार्ग नाही. ह्या नाटकांतील काही प्रवेश तेवढे श्री. गो. गो. अधिकारी यानी संपादन केलेल्या 'गडकरीं यांच्या आठवणी' नामक पुस्तकात प्रकाशित झालेले आहेत. मामा वरेरकरांनी आपल्या 'माझा नाटकी संसार' नामक आत्मचरित्रात ह्या नाटकाचा निर्देश करून म्हटलं आहे की गर्वनिर्वाण नाटकात तत्कालीन

राजकारणाची छटा आलेली असल्यामुळे तत्कालीन परिस्थितीच्या प्रभावाचा परिणाम गडकरी यांच्या मनावर झाला आणि कच खावून त्यांनी ते नाटक मागे घेतलं.'

नाशिकच्या विजयानंद थिएटरात किर्लोस्कर मंडळीच्या शारदा नाटकाचा प्रयोग चालला असता थिएटरात जॅक्सनचा खून झाला. वस्तुत: नाटकाशी वा नाटक मंडळीशी ह्या खुनाचा काडीमात्र संबंध नव्हता. पण ह्या प्रकाराने मंडळीला भयंकर दहशत बसली. त्यातच मुंबईतील एका इंग्रजी वर्तमानपत्रानं असं जाहीर केलं की "किर्लोस्कर मंडळीत राजकीय विचारांचं एक नाटक बसविण्यात येत आहे." ही आठवण श्री. पां. ग. क्षीरसागर नामक तत्कालीन नटाने आपल्या आठवणींच्या संग्रहात ग्रथित केलेली आहे. क्षीरसागर म्हणतात की "गर्वनिर्वाण नाटकाच्या तालमी त्यावेळी सुरू होत्या व चार अंकांची रंगीत तालीमहि झाली होती. या नाटकात राजकारण नव्हते; पण त्यातील एका प्रवेशावर राजकीय विचाराची थोडी फार छाया पडली होती." क्षीरसागरांच्या आठवणीप्रमाणे, इंग्रजी वर्तमानपत्राच्या प्रच्छन्न सूचनेचा गडकऱ्यांवर भयंकर परिणाम झाला. ते घाबरून गेले व त्यांनी नाटक जाळून भस्म केलं. पुढे वातावरण शांत झाल्यावर गडकऱ्यांनी नाटक पुन्हा लिहून काढल्याचं व कुणाच्या तरी बोलण्यानं चिडून तेहि त्यांनी जाळून टाकल्याचं क्षीरसागर सांगतात.

तात्पर्यार्थ, हे नाटक प्रल्हादाच्या चरित्रावर होतं येवढ्यावरूनच आपल्याला त्याच्या कथावस्तूचा बोध होऊ शकतो. येवढ्यापुरताच मी ह्या नाटकाचा परामर्श घेणार आहे.

तोड ही माळ

कै. गडकऱ्यांच्या आणखी एका नाटकाचा बहुरूपीत कै. चिंतामणराव कोल्हटकरांनी उल्लेख केलेला आहे. ह्या नाटकाचं नाव 'तोड ही माळ' 'चिंतामणरावांचं अभिनयवैशिष्ठ्य लक्षात घेऊन ह्या नाटकातील श्यामल नामक नायकाची भूमिका गडकऱ्यांनी साकार केली होती असं चिंतामणराव सांगतात. ह्या नाटकाचं कथानक त्यांनी सांगितलं आहे ते असं की ह्या श्यामलचं तरु नामक सुंदर, सुशील मुलीवर प्रेम बसतं. पुढे जगाच्या रहाटीप्रमाणे तरूचं लग्न होतं ते एका श्रीमंत पण व्यसनी तरुणाशी. हा माणूस तरूला मारहाण करतो व अतिशय छळतो. श्यामल प्रेमनिराशेने आधीच विव्हल. त्यात ह्या कारुण्याने त्याच्या अंत:करणाचे बांध फुटतात. पतिपत्नीच्या भांडणात त्रयस्थाला पडता येत नाही. पण श्यामल मन आनावर होऊन अशा मारहाणीच्या प्रसंगी धावून जातो. तरूच्या नवऱ्याला, श्यामलला सरकारी पेचात पकडण्याची संधि मिळते. श्यामलवर फौजदारी खटला होतो. तो सेशनकमिट होतो. श्यामलचा मित्रच त्याचा वकील असतो. श्यामलचा

मित्रच न्यायाधीश असतो. दोघांचीहि मनोमन खात्री असते की श्यामल निष्पाप आहे. पण पुरावा तो दोषी असल्याचं सिद्ध करीत असतो. अखेर कौस्तुभ, न्यायाधीश असलेला श्यामलचा मित्र, श्यामलला दोषी ठरवून सजा देतो. श्यामल आणि कौस्तुभ हे फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थि. कै. गडकऱ्यांना जगातल्या ज्या गोष्टीबद्दल नितान्त प्रेम व आदर होता त्यात फर्ग्युसन कॉलेज अग्रगण्य. ह्या कॉलेजच्या समोर आपला पुतळा व्हावा व फर्ग्युसन कॉलेजच्या धुळीनं तो माखावा अशी गडकऱ्यांची अंतिम इच्छा होती. इतकं फर्ग्युसन कॉलेजवर कै. गडकऱ्यांचं प्रेम होतं. ह्या नाटकाच्या शेवटी श्यामलचं जे हृदयविदारक भाष्य होतं त्यात फर्ग्युसन कॉलेजला त्रिवार वंदन होतं, गुरुवर्यांना प्रणाम होता आणि 'श्यामलनं तुमची निराशा केली ह्याबद्दल त्याला क्षमा करा' असा विलाप होता.

ह्या कथाभाग चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या स्मरणानुसार सांगितलेला आहे. ह्या नाटकाच्या प्रत्येक अंकाच्या शेवटी पात्रांची एकेक जोडी एकेक माळ तोडते. म्हणून 'तोड ही माळ' असं नाटकाचं नाव होतं. हे नाटक लिहून झालेल्या स्थितींत उपलब्ध नाही. ह्या नाटकाचा एकूण रोख जे विवेचन मला करायचं आहे त्यादृष्टीने उपयोगाचा आहे. तेवढ्यापुरता मी माझ्या विवेचनात ह्या उपलब्ध नसलेल्या नाटकाचा उल्लेख मात्र करीन.

ब्रह्मकौस्तुभ थोरल्या माधवरावांवर नाटक

आणखी एका नाटकाची जन्मकथा चिंतामणरावांनी सांगितली आहे. ह्या नाटकासाठी प्रथम 'राजयक्ष्मा' हे नांव योजलेलं होतं. पुढे हे नाव बदलून 'पिंडप्रदान' हे नाव ठरलं आणि शेवटी निर्णायक नाव ठरलं ते 'ब्रह्मकौस्तुभ.' ह्या नाटकाचा वृत्तान्त मोठा मजेदार आहे. गडकऱ्यांना स्फुरलेली एक कल्पना होती. ती त्यांनी चिंतामणरावांना सांगितली व ह्या कल्पनेवर नाटक लिहा म्हणून सूचना केली. नव्हे, अशी भयंकर गळ घातली की चिंतामणरावांच्या तोंडून नकार निघू शकला नाही. पुढे गडकरी कोल्हटकरांना पुन्हा पुन्हा विचारीत, कुठपर्यंत लिहून झालं नाटक? कोल्हटकर उडवाउडवी करीत. अखेर एक दिवस त्यांनी मन घट्ट करून गडकऱ्यांना निर्वाणीचं म्हणून सांगितलं की हे नाटक लिहणं आपलं काम नव्हे व आपण ते लिहिणार नाही. ह्यावर गडकरी म्हणाले की मग ते मला द्या. कोल्हटकर म्हणाले अहो, ते तुमचंच आहे. पण गडकऱ्यांच्या स्वभावात मुलासारखं वागण्याची तऱ्हा होती. त्यांचं म्हणणं की नाटक आपण लिहिलं तरी ते आपण कोल्हटकराकडून घेतलं असं आपण प्रस्तावनेत लिहिणार आहोत. येवढ्यावरच गडकरी थांबले नाहीत. तर नाटकाचं कथानक शपथेवर गडकऱ्यांना आपण दिलं आहे असं त्यांनी चिंतामणरावांकडून म्हणवून घेतलं. हे नाटक

उपलब्ध नाही. ह्या नाटकाची कथावस्तु सर्वांच्या परिचयाची आहे. जे नाटक गडकऱ्यांच्या मनात शिजून तयार झालं होतं त्याचा आराखडा कोल्हटकरांनी बहुरूपीत दिला आहे. काही प्रसंग व काही वाक्यं देखील.

ह्या नाटकाची कथावस्तु माझ्या विवेचनाच्या दृष्टीने महत्वाची आहे. थोरल्या माधवराव पेशव्यांवर हे नाटक आहे. पानिपत आटोपल्यावर पहिलं वर्षश्राद्ध ओंकारेश्वरावर होत आहे. माधवराव पिंडप्रदान करताहेत. एका पिंडाला कावळा शिवत नाही. माधवराव आज्ञा करून आणखी एक पिंड तयार करवून मागवतात. भटजीला संकल्प म्हणायला सांगतात. आणि म्हणतात, "या पुढे हा माधवराव केवळ सदाशिवरावभाऊंची इच्छा म्हणूत जिवंत राहील. माधवरावाचं स्वतंत्र अस्तित्व संपलं. माधरावानें आपल्या स्वतःच्या इच्छा आकांक्षांना आज तिलांजलि दिली आहे." थोरल्या माधवरावांची पराक्रमशाली कारकीर्द आपल्याला माहित आहे. ह्या तेजस्वी पुरुषाने स्वतः कापराप्रमाणे झिजून मराठ्यांची गेलेली सत्ता व इभ्रत परत जिंकून दाखविली. राजयक्ष्म्याने ह्या थोर पुरुषाचा जो अंत झाला तो सर्वांना माहित आहे. रमाबाई सोबत सती गेली. हे सगळं नाट्य गडकऱ्यांनी उभं करण्याचं योजलं होत. ह्या नाटकातली काही वाक्यं सही सही कोल्हटकरांनी दिली आहेत. तसेच काही महत्वाचे प्रसंगहि सारांशरूपाने सांगितले आहेत.

'शिवराई शिक्का' व 'सुरती शिक्का' अशा आणखी दोन नाटकांच्या कल्पना गडकऱ्यांच्या मनात तरळून गेल्याचं कोल्हटकर म्हणतात. पण ह्यांना म्हणण्यालायक मूर्तरूप आल्याचं दिसत नाही.

थोडक्यात म्हणजे प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला व भावबंधन ही पूर्ण नाटकं, राजसंन्यास हे अर्धवट लिहिलं गेलेलं नाटक व संकल्पित नाटकांपैकी 'तोड ही माळ' व 'ब्रह्मकौस्तुभ' ह्या नाटकांची कथावस्तु येवढं साहित्य मी विवेचनार्थ घेत आहे.

नाट्यप्रकृतीचं स्वरूप

गडकऱ्यांची नाट्यप्रकृति एका विशिष्ट प्रकारची आहे. तिचं एक अंग काव्यात्म असतं. काही तरी दिव्य भव्य बघून त्यावर तें झेप घेत असतं. जयंत आणि लीला हे बालपणचे खेळगडी. पण दोघेहि दुर्दैवी आहेत. जयंताचं कजाग स्त्रीशी लग्न लागलेलं आहे आणि लीला ही बालविधवा आहे. दोघांचं प्रेम काव्यात्म करताना गडकरी किती उंच झेप घेतात हे बघण्यासाठी त्यांची भाषणं वाचावी वा ऐकावी. पुण्यप्रभावावद्दल तर बोलायलाच नको. पातिव्रत्याची कल्पना त्यांनी इथे पराकोटीची काव्यात्म करून दाखविली आहे. एकचप्याल्यात सिंधु

आणि सुधाकर एकेक उच्चांक गाठतात. सिंधूच्या रूपानं त्यांनी पातिव्रत्याचं असंच एक आत्यंतिक चित्र उभं केलं आहे आणि सुधाकरच्या तोंडची वाक्यं मद्याहून अधिक धुंद करणारी आहेत. राजसंन्यास नाटकांत संभाजी आणि तुळशी यांची भाषणं म्हणजे काव्याचे जणु कल्लोळ आहेत. भाववंधनात ही काव्यात्म झेप इतकी वर जात नाही. पण गडकरीथाटाच्या अफाट वक्तव्याचा वारसा बहुतेक पात्रांनी विशेषतः घनःशामने तरी पुष्कळच उचलला आहे दिव्यत्वाप्रत झेप घेण्याचा प्रकार ज्या अलिखित वा अर्धलिखित नाटकांचा मी उल्लेख केला त्यातहि आहेच. हा भाग गवसला की गडकऱ्यांची प्रतिभा स्फुरते व स्तिमित व्हावं असे चमत्कार दाखवते. ह्याच कांव्यात्मतेची आणखी एक बाजू असते. ही झेप जास्तीत जास्त उंच असली तरी गडकऱ्यांच्या नियतिवादी नाटयप्रकृतीने अखेर व्हावयाचा तो सोक्षमोक्ष आधीच लिहून ठेवलेला असतो. संभाजी कसा आहे हे दाखविण्या-साठी काव्यात्मतेच्या शिखरावर पोहचवून राजसंन्यासात गडकरी पहिला अंक पूर्ण करतात आणि लगेच शेवटचा अंक लिहितात तो ह्या 'कमनशीब मराठयाचा रामराम' ऐकविण्यासाठीच. 'मावळत्या सूर्याची किरणं' दाखविण्यासाठीच. दीपशिखेवर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणे प्रथम झेप आणि तिचा अखेर असाच चटका लावील इतका दारुण करणे असा हा रोख आहे.

नियतिवादाचं उपजत आकर्षण

प्रेमसंन्यासाच्या बाबतीत एक आठवण उपलब्ध आहे ती मी येथें देतो. प्रेमसंन्यास ही दोन दुर्दैवी जीवांच्या प्रेमाची शोककहाणी झाली आहे. जयंत फासावरून सुटल्यावर त्याचं लीलाशी लग्न व्हायला वस्तुतः कोणतीहि अडचण उरलेली नव्हती. कजाग बायकोचा काटा दूर करण्याचे उपकार खलनायक कमलाकराने करून ठेवलेले होते. बाबासाहेबहि पुनर्विवाहाला अनुकूल झाले होते. पण अशा वेळेला कमलाकर लीलेला विष देतो व होऊ घातलेल्या सुखान्त नाटकाचा शेवट दुःखान्त होतो. मामा वरेरकरांना 'प्रेमसंन्यास' नाटकात 'पुनर्विवाह घडून येणं अगदीं तोंडाशी आलं असता' गडकऱ्यांनी संधि घालवावी ह्याची फार खंत वाटली आहे. 'माझा नाटकी संसार' खंड २ रा मधे त्यांनी ही खंत प्रदर्शित केली आहे. नाटकाचा गडकऱ्यांनी केलेला दुःखपर्यवसायी शेवट न आवडून मामा म्हणतात की हा 'शेवट ओढूनताणून घडवून आणला होता.' याबाबत मला उपलब्ध झालेली आठवण अशी आहे की गडकऱ्यांनी ह्या नाटकाचा शेवट प्रथम सुखान्त केलेला होता. हा कुठे आणि कसा केला असावा हे तर्कानं हुडकून काढता येणं शक्य आहे. फासावरून सुटलेला जयंत धावतच घरी येतो. 'आपल्या पुनर्विवाहाला बाबासाहेब सहानुभूति देत आहेत' असं आनंदाने म्हणत तो लीलेजवळ जातो. दोन प्रेमी जीवांच्या मीलनाचा काव्यात्म प्रसंग इथे पूर्ण करून

पडदा खाली ओढला की झालं ! नाटक सुखान्त होत होतं. 'पुर्नविवाह' लागल्याचं बघून कित्येक सुधारकांना आनंदाचा ढेकर आला असता. पण हे सुख गडकऱ्यांनी कां हिरावून घेतलं ? मामा म्हणतात, ' पुर्नविवाहाच्या भानगडीत पडणाऱ्यांचा शेवट असाच व्हायचा, असे म्हणून ते आपल्या मताचं समर्थन करण्यासाठी या नाटकाकडे बोट दाखवीत होते.' म्हणजे गडकऱ्यांना पुर्नविवाह होणं निषिद्ध वाटत होतं म्हणून त्यांनी सुखान्त शेवट बदलून दुःखान्त केला ! जी आठवण मला उपलब्ध झालेली आहे ती जरा वेगळा प्रकाश टाकते. ही आठवण अशी आहे की हे सुखान्त नाटक वाचून कारखानीसांनी असा अभिप्राय दिला की ते दुःखान्तच व्हायला हवं होतं. ह्या विधानाचा गडकऱ्यांच्या मनावर चटकन परिणाम झाला. ते खोलीवर परतले ते ह्या विधानाने सर्वस्वी भारून. सकाळपर्यंत त्यांनी नाटक एकसंध दुःखान्तिका बनवून हातावेगळं केलं. हीच ती आज उपलब्ध असलेली आवृति. माझे स्नेही श्री. र. वि. कुळकर्णी यांनी प्राप्त करून घेतलेली ही आठवण आहे. ही त्यांनी ह्या घटनेला साक्ष असलेल्या व्यक्तीकडून मिळविलेली आहे. ही त्यांनी आजच्याच तरुण भारतात प्रकाशितहि केलेली आहे. कारखानीसांनी नाटक दुःखान्तच व्हायला पाहिजे असं म्हटलं असेल तर हे मात्र सहज उमजण्यालायक आहे. गडकऱ्यांची काव्यात्म झेप आणि नाटचप्रकृति ज्यांना आकलन झाली त्यापैकी कारखानीस हे एक होत. भाववंधनाचा शेवट सुखान्त आहे. पण ही सुखान्त जुळवाजुळव अखेर प्रहसनाच्या धाटणीची होऊन बसते व गगनाला स्पर्श करणारी गडकऱ्यांची प्रतिभा भुईवर सरपटू लागते असंच त्यांच्या सुखान्तिकांच्या बाबतीत वाटल्यावाचून रहात नाही. भाववंधनाचा शेवट निकृष्ठ धाटणीचा असल्याचं टीकाकारांनी म्हटलेलं आहे. नाटक सुखान्त करावं ही एक तत्कालीन सामाजिक गरज होती. गुहस्थानी असलेले श्रीपाद कृष्ण कोल्हटकर अनेक योगायोगांच्या साह्याने प्रहसनी धाटणीचा सुखान्त साधण्याची करामत करून दाखवीत. आणि त्यांचं तत्कालीन यश ह्या नवोदित नाटककाराला भारावं असंच होतं. तेव्हा प्रहसनी धाटणीचा सुखान्त साधण्याचा मोह गडकऱ्यांना व्हावा हे साहजिक होतं. पण हा केवळ मोहच होता. त्यांच्या नाटचप्रकृतीला हे साजेसं नव्हतं आणि साधणारहि नव्हतं. गडकऱ्यांची प्रतिभा भुईवर सरपटू नये, तिनं गगनात झेप घेतली तर गगन भेदूनच पार जावं असं कारखानीसांसारख्या मर्मज्ञालाच वाटू शकतं. गडकऱ्यांच्या मनावर त्या विधानाचा इतका परिणाम व्हावा ह्याला कारण मामा वरेरकर समजतात त्याप्रमाणे पुर्नविवाहाच्या सुधारणेबद्दल गडकऱ्यांच्या ठायी असलेला दुस्वास कारणीभूत असेल असं मला वाटलं नाही. वरेरकर म्हणतात की ' पुर्नविवाहाच्या भानगडीत पडणाऱ्यांचा शेवट हा असाच व्हायचा असे म्हणून ते आपल्या मताचं समर्थन करण्यासाठी या नाटकाकडे बोट दाखवीत होते.' गडकऱ्यांनी असे उद्‌गार काढले असतीलहि. पण ते थट्टेने !. डॉ. रा. शं.

वाळिंबे आपल्या नाटककार गडकरी ग्रंथात म्हणतात की सनातनी पक्ष व सुधारणावादी पक्ष दोघांच्याहि बाबतीत गडकरी अलिप्त होते व त्यांची ही अलिप्तता नाटयात्म आहे. हेच विधान अधिक मर्मग्राही आहे. कारखानीसांच्या विधानाने गडकरी इतके प्रभावित झाले ते पुर्नविवाह लावून देण्याचं पातक हातून होऊ नयं ह्या विचारामुळे नव्हे. तर दुःखान्तिकेतच त्यांची गगनाप्रत पोहोचलेली प्रतिभा गगन भेदून जाण्याचा अधिक नेत्रदीपक चमत्कार करू शकत होती हे त्यांचं त्यांना उलगडलं म्हणून. माझ्या मते प्रेमसंन्यास ही एक एकसंघ दुःखान्तिका आहे. ती प्रथम सुखान्त असतानाहि एका रात्रीत बसून गडकरी ती परिपूर्णतया दुःखान्त करू शकले ह्याचं कारण हेच की त्यांची नाटयप्रकृति मुळातच नियतिवादी आहे व जे एकदा उंचावत नेलं ते दुःखान्ताद्वारेच ती स्वाभाविकपणे अत्युच्चपदी पोहचवू शकत होती.

"कालिंदी वृंदावनाच्या नशिबाशी दैवानं जखडली गेली आहे !"

प्रेमसंन्यासाच्या बाबतीत उपलब्ध असलेल्या आठवणीपेक्षा अगदी उलट स्वरूपाची आठवण पुण्यप्रभावाच्या बाबतीत उपलब्ध आहे. गडकरी आणि बालकवि ठोंबरे हे जिव्हाळयाचे मित्र होते. बालकवि गडकऱ्यांना वडिलकीचा मान देत तर 'नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार' अशा शब्दांत बालकवींचा गडकऱ्यांनी गौरव करून ठेवलेला आहे. पुण्यप्रभाव नाटकासंबंधात गडकरी–बालकवींची एक आठवण चितामणराव कोल्हटकरांनी बहुरूपीत दिली आहे. ती अशी, की चिंतामणरावांनी गडकऱ्यांच्या खोलीत हे नाटक बालकवींना वाचून दाखवलं. उसासे आणि हास्याचे उमाळे यांच्या द्वारे बालकवि साद देत होते. 'वाचन झाल्यावर ठोंबरे स्वस्थ बसले. मास्तरांनी अळेबळे त्यांना बोलते केले. तो कोवळया मनाचा बालकवि दुःखातिशयाने विव्हल होऊन निकरावर येऊन बोलू लागला, "नाही, मास्तर मी हा अन्याय सहन करू शकत नाही. तुम्ही कालिंदीच्या मुलाचा बळी कशासाठी दिलात ?" मास्तर बालकवींचा आवेग पाहून प्रथम चमकले. वृंदावन हा पापी खरा. पण त्याची पत्नी कालिंदी तर पापी नाही ना ? मग तिच्या मुलाचा बळी काय म्हणून ? गडकरी म्हणाले, "ती वृंदावनाच्या नशिबाशी दैवाने जखडली गेली आहे म्हणून." गडकऱ्यांचं हे वाक्य लाख मोलाचं आहे. नियतीचे साखळदंड असेच सुष्टाला दुष्टाशी बांधून दोघांनाहि दुःखाच्या खाईत ओढून नेतात हे गडकऱ्यांच्या नाटयप्रकृतीचंच एक अंग आहे. त्याची जाणीवहि गडकऱ्यांना बरोबर होती. बालकवि म्हणाले, "ती वृंदावनाच्या नशिबाशी दैवाने जखडली गेली असली तरी त्या वृंदावनाच्या पापपुण्याची जबाबदारी तुमच्या बुद्धीशी जखडली आहे." पात्राच्या पापपुण्याची जबाबदारी लेखकाच्या माथी चिकटविणाचा हा प्रकार बरोबर नाही. पण 'काही करा,

वृंदावनाला त्या पापापासून परावृत्त करा. कालिंदीच्या मुलाचा बळी देऊ नका." असा बालकवींचा आग्रहच पडला. गडकरी आपल्या जिव्हाळ्याच्या मित्राचं मन मोडू शकले नाहीत. नियतीचा रोख आणि तर्कशास्त्र अनिरुद्ध आणि बिनतोड असतात. गडकरी नाटचौघात जे लिहून गेले होते त्याचं सगळंच तर्कशास्त्र नियतीच्या सामर्थ्यामुळे बिनतोड होतं. पण बालकवींच्या बालहट्टाखातर गडकऱ्यांनी वृंदावनाला पापापासून परावृत्त जरी केलं नाही तरी योगायोगाची जुळवाजुळव करून कालिंदीच्या हाती, तिला न कळत, मेलेलं मूल दिलं आणि वृंदावनाकडून मेलेल्या मुलाचीच हत्या करविली. पुढे हे भगदाड सावरणं ही एक जोखीम होऊन बसलीच. हे प्रहसनी रहस्य स्पष्ट करण्यासाठी अखेर शेवटच्या अंकात गडकऱ्यांच्या प्रतिभेला भुईवर सरपटावं लागलंच. पुण्यप्रभाव नाटकातलं हे केतनच्या बनावट हत्येचं प्रकरण म्हणजे त्यांतला एक कमकुवत दुवा होऊन बसलं आहे. त्यानं नाटचौघ काहीसा क्षीणही केलेला आहे.

शेक्स्पीयर, गडकरी आणि नियतिवाद

वृंदावनाच्या पापाचं प्रायश्चित्त तुम्ही कालिंदीला काय म्हणून भोगायला लावता ? ह्या प्रश्नाला गडकऱ्यांनी उत्तर दिलं, की 'वृंदावनाच्या नशिबाशी ती दैवाने जखडली गेली आहे म्हणून'– ते वाङ्मयांत एका महत्वपूर्ण वादाची आठवण करून देणारं आहे.

शेक्स्पीयरच्या नाटकात हॅम्लेट, अथेल्लो, मॅकबेथ व किंग लियर ह्या चार दुःखान्तिका सर्वश्रेष्ठ समजल्या जातात. ह्या चारहि दुःखान्तिकात काही नाटचगुण समान आहेत. त्यातील ज्वलंत नियतिवाद हा एक आहे. हा नियतिवाद किंग लियरमधे विशेष प्रकर्षाला गेलेला आढळतो.

" As flies to wanton boys are we to the gods;
They kill us for their sport."

हे किंग लियर मधलं वाक्य आहे. सगळा दैवी शक्तीचा खेळ ! खोडकर मुलांना जशा माशा तसे परमेश्वराला आपण ! या नाटकाचा नायक मनाचा तोल सुटलेला जराजर्जर लियर राजा आहे. ह्याचे प्रमाद अगणित आहेत व त्याचा शेवट दुःखान्त व्हावा इथपर्यंत नियतीचा रोख आपल्या poetic justice च्या– काव्यात्म न्यायाच्या संकेताशी जुळणारा आहे. कमलाकराचा गळा दरोडेखोराने घोटावा ही नियति आपल्याला पटणारी आहे. पण ह्या किंग लियर नाटकातलं सर्वांच्या सहानुभूतीला पात्र झालेलं, विलोभनीय, सोज्वळ व्यक्तित्व असलेलं कॉर्डेलियाचं पात्र नियतीनं जर दुःखाच्या खाईत ढकललं तर आपण काय म्हणाल ? ह्या नाटकात कॉर्डेलियाचा अत्यंत दुःखद अंत होतो. कालिंदी निष्पाप

ना ? मग तिच्या केतनचा बळी काय म्हणून? असा सवाल वालकवींनी गडकऱ्यांना केला. शेक्स्पीयरलाहि हा सवाल सतत केला गेला आहे. हॅम्लेटमधली ऑफेलिया, हॅम्लेटची निष्पाप प्रेयसी– हिनं कोणतं पाप केलं होतं? पण दुःखाच्या खाईत जातात ते हॅम्लेटसह सारेजण. दुष्ट आणि पातकी तर जातातच. पण त्यांच्याहि आधी ऑफेलिया जाते. ऑथेल्लोतली डेस्डिमोना– तिचीहि विचारीची तीच गत. दैवी खेळ चालला असता सगळयाच माशा सारख्या ! ए. सी. ब्रॅडले हा शेक्स्पीयरच्या टीकाकारात फार नामवंत समजला जातो. गडकऱ्यांनी जे समयस्फूर्त उत्तर वालकवींना दिलं होतं तेच हा टीकाकारहि देतो. तो म्हणतो, This destruction of the good through the evil of others is one of the tragic facts of life. म्हणजे जीवनाचं हे एक अंगच आहे. नियतिवाद म्हणतात तो हाच. शेक्स्पीयरच्या नियतिवादावर पुरेपूर प्रकाश टाकणारा एक टीकाग्रंथ विल्सन नाइट नामक टीकाकारानं लिहिला आहे. ह्या ग्रंथाचं नाव आहे 'व्हील ऑफ फायर.' 'व्हील ऑफ फायर' म्हणजे नियति. ही नियति अग्निचक्राप्रमाणे फिरते आहे आणि मनुष्यप्राणी तिला बांधला गेला आहे. ही आंधळी आहे. मधे येईल त्याचा ती बेदरकारपणे संहार करते. ही नियति म्हणणे सावांच्या पोटचं मुसळ आहे. हे सगळयाच यादवांवर जाऊन कोसळतं आणि उभी द्वारका रसातळाला नेतं. नियति म्हणजे सडकेवरून फिरणारा स्टीम रोलर आहे. जो समोर येईल त्याला तो भरडेल. जमीनदोस्त करून टाकील. ब्रॅडले म्हणतो की tragic art–मधे दुःखान्त कलेत हा नियतीचा आंधळा प्रभाव काही मर्यादेपर्यंत समर्थनीयच आहे. विल्सन नाइटचं समर्थनहि मार्मिक आहे. नियतीच्या ह्या आंधळ्या विध्वंसापायी जर दुष्टाबरोबर सुष्टहि चिरडले जाणार असतील तर सुष्ट असण्यात काय उरलं आहे ? काय उरलं आहे ते नाइट सांगतो. हीं सुष्ट पात्रं म्हणजे अंधःकाराचा भेद करणाऱ्या प्रकाशशलाका (beams of light) होत. ज्या सृष्टीत सुष्टांना सुष्टपणाबद्दल मुळी पारितोषिकच नाही तिथे सुष्ट उदयाला यावेत, फुलासारखे फुलावेत, खुलावेत, त्यांनी सौंदर्य उधळावं हीच तर केवढी आनंदाची बाब आहे. ते ह्या आंधळ्या नियतीच्या सृष्टीत उदयाला येतात हीच तर परम समाधानाची बाब आहे. ह्या सृष्टीत सौंदर्य निर्माण करण्यासाठीच त्यांचं प्रयोजन आहे !

कमलाकराच्या सृष्टीत लीला आहे. वृंदावनाच्या सृष्टीत कालिंदी आहे– तिचा केतन आहे– (तो मुळातल्याप्रमाणे खरोखरच मारला गेला होता असं समजून मी हे म्हणत आहे), सुधाकराच्या सृष्टीत पुण्यमयी सिंधु आहे, संभाजीच्या सृष्टीत हिरोजी फर्जंद आहे, घनःश्यामाच्या सृष्टीत धुंडीराज आहे–मालती आहे– ह्या निष्पाप जीवांचं बरं होवो का वाईट होवो, ते आहेत ते ह्याहि सृष्टीत सौंदर्य उधळण्यासाठी.

गडकऱ्यांचं सामर्थ्य नियतिवादातच !

प्रथितयश, अग्रगण्य मराठी नाटककारांत गडकरी हे एकमेव नियतीवादी नाटककार आहेत. किर्लोस्कर, देवल आणि खाडिलकर हे अव्वल प्रतीचे निष्णात 'नाट्यरचनाकार' आहेत. गडकरी रचनाकार म्हणून निकृष्ट आहेत. रचनाकार होण्याचा त्यांनी प्रयत्न कसोशीने केला आहे. पण इथे त्यांना भुईवर उतरून सरपटावं लागलं आहे. पण जेव्हा गरुडावर बसलेल्या विष्णूप्रमाणे ते नियतीवर सवार होतात तेव्हा त्यांच्या पराक्रमाला गगन ठेंगणं आहे. माझ्या मते, गडकऱ्यांच्या नाट्यप्रकृतीचा अनिरुद्ध विलास कशात प्रकर्षाला पोहचला असेल तर तो एकच प्याल्यामधे. गडकऱ्यांच्या सर्व नाटकात एकच प्याला सर्वात जास्त प्रभावी आहे. आणि ह्या नाटकात नियतीचं तुफान इतकं जबर आहे की रचनेंतले एक नव्हे, लाख दोष कःपदार्थ वाटावेत. इथलं तर्कशास्त्र नियतीचंच. कुणीहि थोपवू शकत नाही इतक्या आवेगानं तिचा संचार सुरू झाला की जे घडेल ते बिनतोड. गेल्या शतकात इग्लंडमधे थॅकरे हा कादंबरीकार होऊन गेला. हा म्हणतो, माझ्या पात्रांचं कोटकल्याण व्हावं असं माझ्या मनात कितीहि आलं तरी ते करणं माझ्या हातचं उरत नाही. 'टेस ऑफ् अर्बरव्हिले' ह्या दारुण शोककथेत निष्पाप नायिकेचं कोवळं जीवनपुष्प एक नराधम बलात्कार करून कुसकरून टाकतो. हा प्रसंग वर्णन करून अंती कथालेखक टॉमस हार्डी स्वतःच कळवळून विचारतो '–And where was her god angel ?' तळमळून स्वतः कादंबरीकारच विचारतो, देवा तू काय झोपला होतास ?' स्वतः ही सृष्टि निर्माण करणारा लेखक परमेश्वरालाच जाब विचारतो ! आहे की नाही गंमत! आणखी कडी म्हणजे नियतीचा हा क्रूर खेळ सहन न होऊन हार्डी सपाटून आजारी पडला होता. गडकऱ्यांच्या बाबतीतहि असंच घडल्याची एक आठवण आहे. द्रुमनला भूतमहालात लटकविल्यानंतर स्वतः गडकरी आजारी पडले होते आणि दुखण्यात भीतीने किंचाळत होते. ज्या माडीवर पुण्याला त्यांचं वास्तव्य होतं तिचं नाव अखेर भूतमहाल पडलं ! असो, नियतीला चालना देणं हे कलावंताच्या हातचं असतं. पण पुढे तिच्यावर त्याचा ताबा उरत नाही. आणि ही नियति जे चित्र निर्माण करते तेच परिपूर्ण होतं. अवकाशाची तीन–लांबी, रुंदी व खोली आणि कालाचं चौथं अशी चार परिमाणे वास्तव सृष्टीला असल्याचा आइन्स्टीनचा सिद्धान्त आहे. नाट्यसृष्टीतलं नियति हे चौथं परिमाण आहे. नाट्यातील गतीचा व परिणतीचा मक्ता हिच्याकडे असतो.

'एकच प्याला' दारूचे दुष्परिणाम दाखविणारे नाटक झाले नाही; नियतीचे नाटक झाले.

आठ नऊ वर्षांपूर्वी इथेच नागपूरला, नागपूर आकाशवाणीवर गडकऱ्यांच्या

एकच प्याल्यावर माझं भाषण झालं होतं. ह्या भाषणात मी विस्तारशः असा मुद्दा मांडला होता की एकच प्याल्यात प्रथम दारु आणि मग दारुण पर्यवसान असा कार्यकारणसंबंध आढळत नाही. तर उलट घडतं. प्रथम दारुण घटना आणि नंतर दारु असाच क्रम ह्या नाटकात सर्वत्र आहे. म्हणजे हे नाटक दारूचे दुष्परिणाम दर्शविणारं नाटक नाही. हे नाटक नियतीचं आहे. इथे दारू परिणामत: येते. कारण किंवा निमित्त म्हणून नव्हे. अति बुद्धिमान, अति संवेदनाशील आणि मनस्वी वृत्तीचा एक अति मानी माणूस आहे. बोला, त्यांच्या बाबतीत काय होऊ शकतं? अपमानाची एकच घटना घडली की झालं! नियतीनं पुढचा मार्ग तयारच ठेवलेला आहे! आणि तेच घडतं. सिंधूचं प्रेम त्याला सावरायला असमर्थ आहे. गीतेची कठोर गीता त्याला संमोहातून क्षणभरच मोकळा करू शकते. अधिक नाही. इथे शहाणपणाचे शब्द शिकवायला साक्षात श्रीकृष्ण जरी आला असता तरी स्वतःच शहाणपणाचे शब्द शिकून परत गेला असता. भगिरथाला तुम्ही वाचवू शकाल. शरदला वाचवू शकाल. कारण ती अग्निचक्राला बांधली गेलेली नाहीत. पण सुधाकराला सुटका नाही. त्याच्याशी दैवानं जखडल्या गेलेल्या सिंधूला आणि कोवळ्या बालकाला तर नाहीच नाही. इथे पातिव्रत्य पायदळी जातं. मूल रामलालचं आहे अशी डागणी प्रत्यक्ष जन्मदाता बाप सुधाकर त्या साध्वीला देतो. हा प्रकार बघून बालकवीना काय वाटलं हे कळायला काही मार्ग नाही. ते ह्यात असताना एकच प्याला लिहून पूर्ण झालं होतं. साधारणत: १९१७ मधे हे नाटक लिहून पूर्ण झालं असावं असा कयास आहे. बालकवि १९१८ मधे वारले. कदाचित त्यांच्या वाचनात हे नाटक आलं नसेल. एकच प्याल्याचा पहिला प्रयोग गंधर्व नाटक मंडळीने २९ मार्च १९१९ रोजी केला. प्रयोग बालकवींनी पाहिला नाही हे तर स्पष्टच आहे. हे नाटक पाहून बालकवींची काय अवस्था असती हे सांगणं कठिण आहे. गडकऱ्यांच्या बुद्धीचा हा प्रताप बघून ते बहुधा हतबुद्ध झाले असते.

‘तोड ही माळ’ नाटक दु:खान्तच का व्हावे?

‘तोड ही माळ’ ह्या नाटकाचा रोखहि असाच नियतिवादी असल्याचं स्पष्ट दिसतं. इथे poetic justice–काव्यात्म न्याय नाही. काव्यात्म न्याय असता तर जो श्यामल एका असहाय स्त्रीचा अमानुष छळ बघून द्रवतो व तिच्या मदतीला धावून जातो त्याला निदान अंती तरी सुखप्राप्ति झाली असती. पण जगाचा न्याय उफराटा असावा ह्यालाच तर नियति म्हणतात. ह्या नियतीचा साक्षात्कार गडकऱ्यांच्या प्रतिभेला झाला असल्याची साक्ष ह्या नाटकाच्या बाबतीतहि मिळते.

संभाजीच्या व थोरल्या माधवरावांच्या जीवनकथांनीच गडकऱ्यांना कां भारावे ?

गडकऱ्यांना भारणारे जे विषय आहेत त्यात पातिव्रत्याच्या बरोबर मराठ्यांचा पराक्रमपूर्ण इतिहास हा आणखी एक विषय आहे. मराठ्यांच्या इतिहासात सुखान्त स्वरूपाचे कितीतरी नाट्यपूर्ण प्रसंग आहेत. पण कोणत्या व्यक्तीवर व घटनांवर गडकऱ्यांची प्रतिभा लुब्ध झाली – जडली, ते विचार करण्यालायक आहे. राजसंन्यासात संभाजी आहे. हा महान पराक्रमी आणि मनस्वी वृत्तीचा राजा म्हणजे दुर्दैवी जीवांत अग्रणी म्हणून शोभावा असा आहे. ह्याच्या पराक्रमाला जे ग्रहण लागलं ते अतिशय भीषण होतं आणि त्याचा जो अंत झाला तोहि हृदय विद्ध करील इतका दारुण. पण हा मराठ्यांचा दुर्दैवी राजा जनमनाला भारू शकेल इतका मानवी गुणदोषांनी ओतप्रोत विनटलेला आहे. ह्याच्या जीवनकहाणीवर गडकऱ्यांची प्रतिभा लुब्ध झाली. थोरल्या माधवरावांचं जीवन बघा. मराठ्यांच्या इतिहासात जी महान नररत्नं निपजली त्यात हा ब्रह्मकौस्तुभ. अल्पवयात हा पेशवा बनला. पानपतच्या सत्तर हजार जीवांच्या हौतात्म्याचं ओझं ह्याच्या सुकुमार खांद्यावर येऊन पडलं. सारा हिंदुस्थान मराठ्यांवर उलटला होता. जे पानपताहून जिवंत परत आले होते त्यांची इभ्रतच नष्ट झालेली होती. घरी आणि बाहेर त्यांचा दवदवा नष्ट झालेला होता. जुने भरभक्कम आधारस्तंभ कोसळून पडलेले आणि घरातं राघोबासारख्या नतद्रष्ट चुलत्याच्या रूपाने धुमसती आग. एकीकडे निझाम आणि दुसरीकडे हैदरअली. शिवाय साडेतीन शहाण्यापैकी तीन शहाणे, पुण्याचा सखारामबापू वोकील, नागपुरचा देवाजीपंत चोरघडे आणि हैद्राबादचा विठ्ठल सुंदर परशरामे शहकाटशहाचा खेळ खेळत असलेले. जानोजी भोसले पुणं जाळायला निघालेला. पण ह्या थोर पुरुषानं पडलेला सगळा भार आपल्या खांद्यावर झेलला. दशदिशांनी घोंघावत येणाऱ्या संकटांना तोंड दिलं. आणि अवघ्या अकरा वर्षाच्या अवधीत ह्या पराक्रमी पुरुषाने परिस्थितीवर विजय मिळवून दाखवला. दक्षिणेवर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित झाली. उत्तरेत फत्तरगडच्या लढाईत विसाजी कृष्णाने रोहिल्यांचा नि:पात करून व अक्षरश: खांडववन करून पानपताचं उट्ट काढलं. महादजीनं दिल्लीवर मराठ्यांचा अंमल बसवला. पण गडकऱ्यांच्याच शब्दाचा आधार घेऊन वर्णन करायचं म्हणजे हा ब्रह्मकौस्तुभ कापरासारखा झिजला आणि कामी आला. राजयक्ष्म्यानं ह्या महान पराक्रमी पुरुषाचा ऐन उमेदीत बळी घेतला. रमाबाईचं चारित्र्यहि गडकऱ्यांच्या अत्यंत आवडत्या कल्पनेचं– पातिव्रत्याचं–मूर्तिमंत चित्र म्हणावं असं. पति कापरासारखा झिजला तशीच ही साध्वी चंदनासारखी त्याच्यासाठी झिजली. आणि चितेवर कापराबरोबरच

चंदनहि चढलं. ह्या कथावस्तूवर गडकऱ्यांची प्रतिभा लुब्ध झाली. हे नाटक गडकऱ्यांच्या हातून पूर्ण व्हायला हवं होतं. त्यांच्या नाटयप्रकृतीचा विलास परमोत्कर्षाला गेलेला इथे आढळला असता. एकच प्याल्यात नियतीचं भीषण तांडव आहे. इथेहि नियतीचं तसंच भीषण तांडव आहे. आणि परिपूर्ण दुःखान्तिकेला लागणारा मालमसाला नुसता ठासून भरलेला आहे. अंतःकरणाला चटका लावील असं कारुण्य आहे. नियतीने निर्माण केलेली अगतिकता,– असहायता आहे. उत्तुंग व्यक्तित्वाचा साक्षात्कार आहे. गगनात मावू शकणार नाही इतकं विशाल पातिव्रत्य आहे. गडकऱ्यांच्या प्रतिभेला रान मोकळं होतं. दशदिशा खुल्या होत्या.

स्वतःहि नियतीच्या हातातलं बाहुलं !

गडकरी मरण पावले ते वयाच्या ३४ व्या वर्षी. पुढे बराच काळ अनेकांच्या बुद्धीला एकच वेध लागलेला होता– गडकरी हयात असते तर त्यांनी आणखी काय काय चमत्कार दाखविले असते ! केवढी वरची पायरी गांठली असती ! त्यांनी यश आणखी किती उंच नेऊन पोहचवलं असतं ! पण त्यांचं जीवन हाहि एक नियतीचाच खेळ ठरला. गडकऱ्यांना प्रत्येक जिना चढताना आणि उतरताना त्याच्या पायऱ्या मोजण्याचा छंद होता. एक दिवस ते ह्या उपक्रमात चुकले. त्यांचा पाय एका पायरीवरून घसरला. झालं ! त्यांच्या नियतिवादी मनानं दुःखद अंताची खूणगाठ बांधून टाकली. जणु त्यांचं स्वतःचं जीवन हीहि ते लिहीत असलेल्या एखाद्या नाटकाचीच कथावस्तु होती. पायरीवरून पाय घसरणं हा झाला नाटकातल्या पहिल्या अंकातील दुःखान्त शेवटाचा प्रथम परिस्फोट. पुढे बलवंत नाटक कंपनीची कुंडली मांडताना त्यांना ग्रह वाईट असल्याचं दिसून आलं. हे वर्ष वाईट जाणार असे उद्गार त्यांनी काढले आणि ती गोष्ट मनाला लावून घेतली. पुढे त्यांना मलेरियाचा ताप येऊ लागला. ह्या दुखण्यात गडकऱ्यांच्या मनात अगतिकतेची जाणीव इतकी तीव्र होती की कितीदा तरी त्यांनी उशालगतच्या शंकर–विठ्ठलाच्या तसबिरी भिरकावून दिल्या. ह्या दुखण्यातून गडकरी अखेर उठलेच नाहीत. नियतीच्या तर्कशास्त्राचा लेखकाच्या प्रतिभेवर व त्याचबरोबर मनावरहि पगडा किती जबरदस्त असतो ह्याचंच हे उदाहरण आहे.

पण त्याचबरोबर हेहि म्हटलं पाहिजे की जिथे गडकऱ्यांच्या जीवनाचा अंत झाला तिथेच नियतीने त्यांच्या निर्मितीचाहि अंत योजून ठेवलेला होता. आणि म्हणूनच जी निर्मिति आपल्या पुढे आहे तिच्या द्वारे जे चित्रं उभं होतं तेच परिपूर्ण मानलं पाहिजे. त्याच्या मागील आंतरिक सृष्टि जेवढ्या प्रमाणात आपल्याला त्या चित्रात दिसली तेवढ्यावरूनच तिच्या संपूर्ण स्वरूपाबद्दल निदान केलं पाहिजे.

नियतिवादाच्या आहारी गेल्यामुळे गडकऱ्यांच्या जीवनाचा अंत लवकर व दारूण असा घडून आला खरा. पण नियतीवादाचं तर्कशास्त्र ही कलासृष्टीतली विशेषत: दु:खान्त कलेतली महान शक्ति आहे. शेक्स्पीयरच्या महान गणलेल्या कलाकृतीत, दु:खान्तिकात तर्कशास्त्र आहे ते नियतीचंच आणि कलात्म प्रभाव साधला आहे तो ह्या शक्तीच्या तांडवाद्वारेच.

कै. गडकऱ्यांची नाट्यप्रकृति शेक्स्पीयरच्या नाट्यप्रकृतिसदृश होती. ती नियतिवादी होती.

गडकऱ्यांची नाट्यसृष्टि

[भाषण दुसरे]

काल माझं पहिलं भाषण झालं. गडकऱ्यांच्या नाट्यप्रकृतीवर. ती नांदी झाली. आज मी गडकऱ्यांच्या नाट्यसृष्टीचं विवेचन करणार आहे.

आज मराठा दैनिकाने कै. गडकऱ्यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने लिहिलेला गडकऱ्यांवरील अग्रलेख मी वाचला. आचार्य अत्रे ह्या अग्रलेखात म्हणतात की विष्णुशास्त्री चिपळूणकर मराठीचे शिवाजी आहेत असं म्हटलं तर गडकरी हे मराठीचे पहिले बाजीराव आहेत असं म्हणता येईल. हे वर्णन सार्थ आहे. गडकऱ्यांचा दिग्विजय तसाच अफाट आहे. जनमनावर त्यांच्या वाङमयाची मोहनी पडली ती अद्याप कायम आहे.

गडकऱ्यांच्या प्रभावाचं निदान करण्यासाठी वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या स्वरूपाचे प्रयत्न झाले आहेत. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यास नाटकाच्या द्वितीय आवृत्तीत प्रारंभी दिलेल्या कै. गोविंद चिमणाजी भाटे यांच्या दोन प्रस्तावना आजच सहजगत्या माझ्या पाहण्यात आल्या. कै. गोविंद चिमणाजी भाटे हे गडकऱ्यांचे फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत भाटे यांनी प्रेमसंन्यासाचा विचार पुनर्विवाहावरील नाटक म्हणूनच केलेला आढळतो व त्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही हे स्पष्ट दिसते. तेच भाटे नऊ वर्षानंतर दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिताना सुधारणावादाचा निकष पूर्णपणे बाजूला ठेवून नाटकाचे कलात्म मूल्यमापन करतात व गडकऱ्यांची नाटकं 'मराठी भाषेचे कायमचे अलंकार बनले आहेत' असा हवाला देतात.

अमर्याद भाटशाहीच्या निर्दालनाचे प्रयत्न

गडकरी हे महाराष्ट्रापुढे उभं ठाकलेलं एक कोडं आहे. त्यांच्या यशाचं निदान करणं फार दुरापास्त आहे. श्री. रा. ग. हर्षे यांनी 'गोविंदाग्रज' नामक काव्यपरीक्षणात्मक प्रबंध लिहून बत्तीस वर्षांपूर्वी प्रकाशित केला आहे. हा आपण अवश्य पहा. 'गोविंदाग्रजांची भाटशाही अमर्याद वाढली' म्हणून चवताळून ह्या टीकालेखकानं शस्त्र हाती उचललं आहे. ह्या भाटशाहीचं निर्दालन करण्यासाठी गडकऱ्यांवर चौफेर हल्ला चढवला आहे. गडकऱ्यांच्या काव्यात्म ऊक्ती हर्षे यांनी बुकलून काढल्या आहेत. गडकऱ्यांच्या तरल प्रतिमांना आपल्या कावीत पकडून त्यांना चिंध्याप्रमाणे टराटर फाडलं आहे. वस्तुतः येवढा पराक्रम केल्यानंतर गडकरी शिल्लक राहायला नको होते. पण तसं झालं नाही. प्रा. ना. सी. फडके यांनी गडकऱ्यांच्या नाटकात, विशेषतः एकच प्यालयात ज्या विसंगती दाखविल्या आहेत त्या मला आठवतात. त्या वघून क्षणभर गडकऱ्यांची कीवच येत असे. दरवर्षी एखाद दुसरा तरी प्रदीर्घ लेख कुठेना कुठे वाचनात येतोच. गडकऱ्यांचा लौकिक शब्दप्रभु म्हणून. हा शब्दांचा डामडौल म्हणजे कृत्रिमता आहे, केवळ कारागिरी आहे हे सांगून झालं आहे. प्रतिमा तरल असतात म्हणावं तर त्या रोमँटिक, वास्तवाचं बूड नसलेल्या होत हेहि सांगून झालं आहे. कथावस्तूत आणि पात्ररेखाटन यातहि वास्तवतेचा अभाव व अतिमानुषता असल्याचा आरोपहि वरचेवर होत आहे. आणि नाटकाची रचना शिथिल असते, उपकथानकांचा गुंतावळा फार मोठा असतो वगैरे दोषहि सांगून झाले आहेत.

यशाचे श्रेय नटांना !

आपल्या 'बहुरूपी' नामक आत्मचरित्रात कै. चिंतामणराव कोल्हटकर यांनी भाऊराव माडखोलकरांची एक आठवण सांगितली आहे. नागपूरला 'प्रेमसंन्यास' नाटकाचा प्रयोग झाला असता पहिल्या अंकानंतर माडखोलकर आत गेले आणि चिंतामणरावांना म्हणाले की 'गडकऱ्यांच्या ह्या नाटकाची भाषा विशेष अवास्तव व कृत्रिम वाटते. नाटक पाहतांना त्यांच्या प्रतिभेमुळे ते तितके लक्षात येत नाही. पण खटकल्याविनाहि राहत नाही.' एका जाणकार चोखंदळ मर्मज्ञाचा हा अभिप्राय आहे. ह्याच आठवणीचा पुढचा भाग अधिक मनोज्ञ आहे. प्रयोग संपल्यानंतर माडखोलकर चिंतामणराव कोल्हटकरांना म्हणाले "गडकऱ्यांची भाषा पेलून तिची योग्य तऱ्हेने फेक करायला तुमच्यासारखेच नट पाहिजेत. तुमच्यासारख्या नटाकरिताच ही नाटके आहेत." माडखोलकर प्रयोगामुळे प्रभावित झाले असल्याचे चिंतामणराव सांगतात. ही आठवण सांगण्याचा हेतु इतकाच आणखी एका वादाचं प्रत्यंतर त्यांत मिळतं. रांगणेकरांचं 'कुलवधू' नाटक खूप

अनुक्रमणिका

गाजलं. शेकडयाने त्याचे प्रयोग झाले. महाराष्ट्रात एक वाद सुरू झाला. 'कुलवधु' येवढं यशस्वी झालं ते ज्योत्स्नाबाईंच्यामुळे ! ह्या आरोपावर अधिष्ठित असा तो वाद होता. खाडिलकरांची नाटकं केवळ बालगंधर्वामुळे यशस्वी झाली हा आरोपहि तुम्ही अनेकवार ऐकला असेल. गडकऱ्यांवरहि असा आरोप झालेला आहे. म्हणजे गडकऱ्यांची नाटकं तरली ती नट कलावंतांच्या कौशल्यावर ! तात्पर्यार्थ, गडकऱ्यांवर व्हावयाचे तेवढे आरोप करून झाले आहेत. भाटगिरीचं निर्दालनहि भरपूर झालं आहे. पण गडकरी, त्यांच्या ह्या ४२ व्या पुण्यतिथीला शिल्लक आहेत ते आहेतच.

गडकरी प्रथितयश झाले

ह्यावरून आरोपकर्ते टीकाकार नेस्तनाबूत झाले आणि भाटगिरी करणारे विजयी झाले असा निष्कर्ष मात्र आपण काढू नका. भाटगिरीवर कुणाचंच साहित्य तरू शकत नाही. जी टीका गडकऱ्यांवर झाली आहे तीहि काही अर्धवट लोकांनी केलेली नाही. जाणत्यांनी, मर्मज्ञांनीच केलेली आहे. तिच्यात वादग्रस्त भाग असेल पण काही तथ्यहि आहे. म्हणण्याचा हेतु येवढाच की एक नव्हे लाख आरोप सिद्ध झाले आणि गडकऱ्यांच्या साहित्यातला दोषन् दोष मान्य झाला तरी त्यांच्या यशाला धक्का लागू शकलेला नाही. गडकरी आता प्रथितयश झाले आहेत. त्यांचं यश प्रस्यापित झालेलं आहे. ते आता नष्ट करणं कुणालाहि शक्य राहिलेलं नाही. इंग्लंडला एक वेळ नष्ट करता येईल. पण शेक्स्पीयर हा इतका प्रथितयश आहे की त्याला सगळया जगानं जरी संगनमत केलं तरी नष्ट करता येणार नाही. महाराष्ट्रानं यश एक वेळ हिरावून नेता येईल. पण गडकऱ्यांचं यश नष्ट करणं आता अशक्यप्राय झालं आहे. गडकरी हे एक अजस्र कोडं आहे असं मी म्हणतो ते हे यश बघून.

एकशे बेचाळीसाव्या पुण्यतिथीलाहि गडकरी उरतील

कै. राम गणेश गडकरी यांची ही बेचाळीसावी पुण्यतिथि येथे साजरी होत आहे. महाराष्ट्रात अन्यत्रहि ती अशीच उत्साहात साजरी होत असते. यंदाहि होईल. गडकऱ्यांची लोकप्रियता अफाट आहे. सर्व प्रकारच्या लोकात आहे. स्त्रियांना, पुरुषांना, आबालवृद्धांना सदासर्वकाळी भारणारी काही तरी जादु गडकऱ्यांच्या वाङमयात आहे. आज बेचाळीसाव्या पुण्यतिथीला गडकऱ्यांच्या साहित्याबद्दल लोकात उत्साह दिसतो. असाच उत्साह एकशे बेचाळीसाव्या पुण्यतिथीलाहि दिसेल.

आता प्रश्न आहे, ही जादु कोणती ? ही जादु प्रतिभेची ! प्रतिभा शब्द वापरला की दायित्व संपतं ! किंवा अधिक कीस काढायला लागलं तर अखेर

पुन्हा हातीं काहीच लागत नाही आणि कोडं कोडंच राहतं. गडकऱ्यांच्या बाबतीत हा चमत्कार घडत असल्यामुळे आज त्यांच्या बेचाळीसाव्या पुण्यतिथीला हुडकता येण्यालायक पुष्कळ उरलेलं आहे. आणि एकशे बेचाळीसाव्या पुण्यतिथीलाहि कदाचित वरचसं उरण्याचा संभव आहे.

नाटककार हाच गडकऱ्यांचा पूर्णावतार

गेल्या काही वर्षांतले येथे वाचले गेलेले प्रबंध मी डोळ्याखालून घातले आहेत. गोविंदाग्रज आणि राम गणेश गडकरी असं दुहेरी व्यक्तित्व ह्या प्रतिभा-संपन्न साहित्यिकाला आहे. लागल्यास बाळकराम जमेस धरून गडकऱ्यांचं व्यक्तित्व तिहेरी आहे म्हणा. म्हणजे त्यांचा एक अवतार कवीचा आहे. एक विनोदकर्त्याचा आहे. आणि तिसरा अवतार आहे नाटककाराचा. हा नाटककाराचा अवतार गडक-ऱ्यांचा पूर्णावतार आहे. ह्या तीन्ही अवतारांचं वेगवेगळं निरीक्षण झालेलं आहे. मी राम गणेश गडकऱ्यांवर बोलत आहे. गडकऱ्यांच्या पूर्णावतारावर बोलत आहे. नाटककार गडकरीच माझ्यासमोर आहेत. तसं पाहिलं तर नाटककार गडकरी हा विषय आधी पुष्कळ वेळा घेतला गेलेला आहे. डॉ. रा. शं. वाळिंबे गेल्या वर्षी बोलले ते प्रामुख्याने नाटककार गडकऱ्यांवरच. तत्पूर्वी 'नाटककार गडकरी' हाच विषय घेऊन श्री. द. रा. गोमकाळे बोलले होते. प्रा. स. पां. पांजणकर व प्रा. श्री. मा. कुळकर्णी गडकऱ्यांच्या नाट्यशैलीवर व स्वगतावर बोलले. यांच्या प्रबंधाचा विषय नाटककाराच्या अवतारातले गडकरी हाच होता. पण ज्या बाजूला अद्याप फारसा स्पर्श केला गेलेला नाही अशी एक बाजू आहे. तिचाच मी विचार करणार आहे.

गडकऱ्यांची नाट्यरूप प्रतिभा

नाट्य म्हणजे काय ? आपण हडसनचं प्राथमिक स्वरूपाचं पुस्तक वाचा. किंवा अॅलरडाइस निकल्स, ब्रँडर मथ्यूज, क्लेटन हॅमिल्टन, ब्रॅडले वा विल्सन नाइट यांचं नाट्यावरील टीकालेखन वाचा. मराठीतलं प्रा. ना. सी. फडके यांचं प्रतिभासाधन वाचा की भरतमुनींचं नाट्यशास्त्र वा अॅरिस्टॉटलचं पोएटिक्स घ्या. सूक्ष्म भेद वर्णन करणाऱ्या नाट्य ह्या संज्ञेच्या कितीतरी व्याख्या आपल्याला आढळतील. ह्या सर्व व्याख्या एकेकश: घेऊन चर्चा करूं म्हटलं तर एक भला मोठा ग्रंथ होऊ शकेल. पण इथे ढोबळ मानाने मी नाट्याची व्याख्या करतो. व नाट्य ह्या संज्ञेत काय अभिप्रेत आहे, त्याचं एकूण स्वरूप काय ते सांगतो. इथे विषयाला आवश्यक आहे म्हणून.

नाट्याला नाटकातच स्थान असतं असं नव्हे. नाट्य कुठल्याहि कथेत असू शकतं. लघुकथेत, कादंबरीत, घटनेत, प्रसंगांत–तसच व्यक्तित्वात देखील. ते

काव्यात आणि महाकाव्यात असू शकतं, कीर्तनात आणि वक्तृत्वातहि असू शकतं. ते निवेदनाच्या शैलीत असू शकतं तसं शब्दविहीन आविष्कारातहि म्हणजे हावभावात असू शकतं. ते ताललयाच्या शारीरिक हालचालीतून व्यक्त होऊ शकतं किंवा स्वरसाधनेच्या द्वारे आलापांच्या फेकीतून अवतरू शकतं. म्हैसूर येथे मी 'महारथी कर्ण' नामक एका कानडी नाटकाचा प्रयोग पाहिला होता. ह्यात रणांगणावर गदा घेऊन समोरासमोर ठाकलेली दोन पात्रं एका नंतर एक गगनभेदी भिंगरी तान घेत एकमेकावर धावून जात होते. ह्या तानांच्या योगे त्या नटांनी नाट्य निर्माण केलेलं होतं. आणि प्रेक्षक तल्लीन होऊन गेलेले होते. नाट्य रूपात असू शकतं, रंगात असू शकतं, स्पर्शात असू शकतं, कदाचित् गंधात देखील. हे वर्णन सांगितल्यावर आपण कदाचित विचाराल की कायहो तुमची ही नाट्य नामक चीज जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी वसणाऱ्या परमात्म्यासारखीच दिसते आहे. ह्यावर मी म्हणेन की उससेभी ज्यादा ! जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, नाट्य तर आहेच. पण तुम्ही परमात्मा म्हणजे काय ते सांगा म्हणजे त्याच्यातहि नाट्य कुठे आहे ते मी दाखवतो असं माझं उत्तर राहील !

तात्पर्यार्थ हा की ज्यात चित्त वेधण्याची शक्ति आहे त्यांत नाट्य आहे· एकाच एका स्वरात वक्ता बोलायला लागला म्हणजे आपण कंटाळतो. तेच मधेच तो त्वेषात येऊन आवाज चढवू लागला की आपलं चित्त वेधतं. त्यानंतर चटकन त्यानं आवाज हळूवार केला आणि अगदी विश्वासात घेतल्याप्रमाणे काही सांगू लागला म्हणजे आपण अधिक ध्यान देतो. त्याच स्वरात त्यानं एक चुटका हवेवर सोडला तर आपण रंगतो. आणि कुठे प्रणय, कुठे कारुण्य, कुठे उदंड उत्साह तर कुठे संथपणा व शांति असा चढउतार, आवर्तनं, वळसे, कलाटणी आढळली की आपण म्हणतो इथे नाट्य आहे. चढत्या श्रेणीनं आपलं चित्त आकृष्ट होऊ लागलं – मग ते कशानंहि असो, आपण नाट्याची पावती देतो. चटचट होत जाणारा बदल, चटचट वळणं घेत जाणारी गति, उत्कर्षाप्रत जाणारा रोख, विविधता, वैचित्र्य, चमत्कृति ह्या गोष्टी नाट्यात अभिप्रेत आहेत. नाट्याच्या व्याख्येत आणखी दोन गोष्टींवर भर दिलेला आपल्याला आढळेल. प्रा. ना. सी फडके यांनी संघर्षावर इतका भर दिलेला आहे की नाट्य 'म्हणजेच संघर्ष असं समीकरण मांडून त्यांची व्याख्या स्पष्ट करता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे कलाटणी. अरिस्टॉटलने कलाटणी म्हणजे denouement किंवा turning of tables हे एक नाट्याचं अत्यावश्यक अंग कल्पिलेलं आहे. ह्याचा अर्थ असा की एका विशिष्ट रोखानं भली मोठी रचना उभारायची आणि कशानं तरी ती उलथून पाडायची व स्तिमित करायचं किंवा ह्याच्या उलट, अशक्यप्रायतेची परमावधी गाठायची आणि मग एकदम आहे त्यातूनच इप्सित काढून दाखवावयाचं ! हा प्रकार झाला म्हणजे म्हणायचं नाट्य. नाट्याची मी जी

अनुक्रमणिका

व्याख्या करीत आहे त्यात मी संघर्षाला व कलाटणीलाहि स्थान देतो. तात्पर्यार्थ चित्त वेधण्याचं एक अमोघ साधन म्हणजे नाट्य. गडकऱ्यांच्या ठायी प्रतिभा होती असं सगळेच म्हणतात. मी म्हणतो, त्यांच्या ठायी विलक्षण कोटीतलं नाट्य होतं.

चौकटीतून दिसणारा भाग

लेखकाच्या बाबतीत म्हणायचं म्हणजे हे नाट्य एका सृष्टीच्या रूपानं आंतरिक पार्श्वभूमीवर फुलतं, खुलतं, विस्तारतं, नाना आकार धारण करतं आणि अवखळपणानं धावतं. हे झालं पडद्याच्या आतलं. पडदा विभागून दोन बाजूंनी वर गेला म्हणजे चौकटीत एक चित्र दिसतं. लेखकाचं साहित्य म्हणजे एक चौकट असते व त्या आंतरिक सृष्टीचा फक्त एक दर्शनी भाग तेवढा त्या चौकटीत आलेला असतो. ह्या चौकटीत येईल तेवढ्यानंच त्या आंतरिक सृष्टीचं यथातथ्य दर्शन घडावं. यातच कला आहे म्हणा. गडकऱ्यांच्या ठायी, त्यांच्या आंतरिक सृष्टीत नाट्य अफाट होतं. त्याचा एक भाग आपल्यासमोर आहे. त्याच्याचवरून त्यांच्या नाट्यप्रकृतीचं तसंच नाट्यसृष्टीचं निदान करायचं आहे.

मुख्य सूत्र

आता प्रथम मी माझ्या विवेचनाचं मुख्य सूत्र सांगून टाकतो. ह्या सूत्राचा एक भाग असा आहे की गडकऱ्यांच्या अंतर्यामी जणु सप्तपाताळापर्यंत जाऊन भिडलेलं अथांग नाट्य दाटून आलेलं होतं आणि एखाद्या नायगारा धबधब्याच्या प्रपाताप्रमाणे ते येऊन कोसळलं. गडकऱ्यांच्या नाटकांना अन्य नाटकांप्रमाणे एक साचा आहे. ह्या साच्यावर तो धबधबा येऊन कोसळला. प्रपाताचा काही भाग साच्यात बसला. बराचसा ओसंडून बाहेर पडला तसंच, ह्या नाटकात पात्रं आहेत. सुधाकरासारखं अत्यंत बुद्धिमान पात्र आहे. तसंच गोकुळासारखं निर्बुद्धहि आहे. पण पात्र म्हणजे भांडं ह्याच अर्थानं गडकऱ्यांची सर्व पात्रं ही केवळ भांडी आहेत. त्यातली काही सोन्याचांदीची असतील तर काही चिनी मातीची, काचेची किंवा कच्च्या मातीची असतील. पण आपल्या हे लक्षात येईल की ती सारी शिगोशीग एकाच धुंद करून सोडणाऱ्या रसायनानं भरलेली आहेत. हे रसायन आहे त्याच नाट्याचं – प्रपाताच्या रूपानं पात्रात येऊन पडलेल्या व ओसंडून बाहेर वाहिलेल्या. दृष्टांत आपण एकदा लक्षात घेतला म्हणजे गडकऱ्यांच्या साहित्यावर केल्या गेलेल्या अनेक आरोपित दोषांचं वैयर्थ्य आपल्याला उलगडेल. ह्याच सूत्राचा दुसरा भाग असा आहे की अंतर्यामी गडकरी हे पूर्णतया नियतीवादी आहेत. त्यांच्या कथावस्तूंचा रोख नियति निश्चित करते. गडकऱ्यांचं अंतर्मन त्यांनाच न जुमानता सारं काही आधीच निकालात काढून टाकतं. एक प्रकारच्या

अगतिकपणे स्वतः गडकरी, सुष्ट दुष्ट सगळेच एकदम अंतिम समर्पणाच्या खाईत उतरलेले बघत राहतात. हा भाग मी काल विशद केलाच.

गडकरी हे अगदी वेगळ्या घडणीचे नाटककार

कै. गडकऱ्यांच्या ठायीचं नाट्य प्रस्फुटित झालं, उत्कर्षाप्रत गेलं आणि त्यांनी आपल्या प्रतिभेचे नेत्रदीपक चमत्कार दाखविले. हा काळ साधारणतः १९१२ ते १९१९ पर्यंतचा, म्हणजे अवघा सात वर्षांचा आहे.

गडकऱ्यांचं यश अनन्यसाधारण कोटीतलं आहे. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर कै. गो. ब. देवल, कै. कृ. प्र. खाडीलकर आणि त्यांच्याच बरोबर कै. गडकरी यांचं स्थान मराठी नाट्यसृष्टीत अढळ बनलेलं आहे. परस्परांशी परस्परांची तुलना करणं योग्य नाही. शिवाय प्रत्येकाचं वैशिष्ट सर्वस्वी वेगळ्या कोटीतलं असल्यामुळे तुलना करणं शक्यहि नाही. विशेषतः गडकरी ह्यात्र नव्हे तर मराठीतल्या सर्व प्रथितयश आणि अन्य नामवंत नाटककारांत अगदी वेगळ्या घडणीचे नाटककार आहेत. त्यांची नाटकं परिणाम करतात. चित्तवृत्ति हलवून सोडतात. मन बेभान करतात. आणि त्यांची भाषा कधी बुद्धीला तर कधी भावनांना भारून टाकते. त्या भाषेच्या ओघाचा जणु अंमल चढतो.

वास्तवातील तर्कशास्त्राचा निकष चूक

ज्या तार्किक शक्तीच्या अनुसार आपण आपल्या नित्याच्या वास्तव सृष्टीत वावरतो तिला गडकऱ्यांनी गुंडाळून बाजूला ठेवलं असेल. पण त्यामुळे परिणामात कुठे काकणभर घट झालेली प्रत्ययास येत नाही. हे मी नाटक, नाटक आहे हे स्मरून म्हणत आहे. नाटकाच्या 'cold print' बद्दल– छाप्याच्या शीतघरातून काढलेल्या थंड शब्दाबद्दल म्हणत नाही. मायकासुराच्या (लाऊडस्पीकरच्या) कंठातून निघणाऱ्या चिरक्या किंवा घुमत्या शब्दाबद्दल म्हणत नाही. जे शब्द कोल्हटकर, दीनानाथ, बालगंधर्व आदि, ते शब्द पेलण्याची शक्ति असलेल्या नटांनी, सजीव रूपात प्रेक्षागृहाच्या भिंतीवर पल्ला घेऊन फेकले, ते स्मरून हे विधान मी करीत आहे. प्रा ना. सी. फडके, शिल्पकार फडके आणि डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी जेवढी तर्कविसंगतीची उदाहरणं सादर केली आहेत ती सारी समोर ठेवून मी हे विधान करीत आहे.

आपल्या वास्तवसृष्टीतल्या तर्कसंगतीचा बडेजाव आपल्या व्यवहाराच्या वास्तवसृष्टीत वाटेल तितका असेना. ह्या घेंडाला तुम्ही रंगभूमीवर स्थान दिलं नाही म्हणून टीकाकार वाटेल तितका आक्रोश करीनात का, तिथल्या तर्काचा देश वेगळा, वेश वेगळा. वास्तवसृष्टीतल्या घेंडाला तिथे लुडबूड करण्याचं

कारण नाही. गडकरी वास्तवातल्या तर्कसंगतीला विसरले व त्यांनी चूक केली. प्रमाद केला असं म्हणणारेच चूक करताहेत.

एक मौलिक सिद्धान्त

दोन वर्षापूर्वी इथे नागपुरासच डॉ. रा. शं. वाळिंबे यांची सौंदर्यशास्त्रावर तीन अत्यंत मर्मग्राही अशी व्याख्यानं झाली होती. ह्या आपल्या भाषणात डॉ. वाळिंबे यांनी अनेक प्रतिभासंपन्न, मूलग्राही, प्राचीन व आधुनिक साहित्यशास्त्रज्ञांचे आधार देऊन असं प्रतिपादन केलं होतं की रंगभूमीवरची सृष्टि व प्रेक्षागृहातली सृष्टि ह्या भिन्न होत व त्या भिन्नच राखल्या पाहिजेत. ह्या दोन जगांच्या मधून विभाजनाची एक रेषा जाते. ही रेषा दोन्हीहि सृष्टींना अनुल्लंघनीय आहे. ह्याचाच अर्थ असा की प्रेक्षागृहातला, म्हणजे वास्तवातला तर्क रंगभूमीवर पोहचण्याचं कारण नाही.

रंगभूमीवरील सृष्टीचे विशेष स्वरूप–खास तर्कशास्त्र

रंगभूमीवरचं तर्कशास्त्र हे स्वतंत्र असतं. वास्तव सृष्टीत अवकाश अफाट असेल. रंगभूमीवरच्या सृष्टीतला अवकाश वीस गुणिले वीस, गुणिले तीस घन फुटांचा. कदाचित सवाई–दीढीनं कमी किंवा जास्त. बस्स ! वास्तवातला कालहि अनादि अनंत असेल. पण या सृष्टीतला काल आदि– मध्य– अंत यांनी पूर्णतया सीमित असतो. या सृष्टीतली पात्रं माणसंच असली पाहिजे असं नाही. माणसांच्या वेशात इथे अशरीरी, अमूर्त कल्पना साकार होऊन अवतरतात. त्यांचं तर्कशास्त्र हे सर्वस्वी त्यांचं असतं. तुमचं आमचं नव्हे. त्यांचं तर्कशास्त्र बिनतोड आहे किंवा नाही याची कसोटी एकच. त्यांनी करायचा तो परिणाम केला की त्यांचं तर्कशास्त्र परिपूर्ण आहे असं समजा. प्रयोगाच्या क्षणापुरतं कां होईना त्यांनी आपल्याला आपल्या संभाव्य असंभाव्यतेच्या व वास्तवातील तर्कसंगतीचा विसर पाडला की झालं. त्यांचं कार्य त्यांनी पुरेपूर केलं. त्या कृतार्थ झाल्या. आपण व्यवहारात स्वगत मोठ्यानं बोलत नाही. पण इथे स्वगत मोठ्यानं बोलता येतं. इथलं स्वगत प्रेक्षागृहात लख्ख ऐकूं येतं पण रंगभूमीवरच दोन फुटावर उभ्या असलेल्या व्यक्तीला ऐकूं येत नाही. इकडे आपल्या स्वगताने पात्र प्रेक्षागृह दणाणून सोडत असताना शेजारचं पात्र त्याला विचारतं, अरे तू असा घुम्म उभा का ? बोलत का नाहीस ? मंडळींनो, ह्या प्रकार म्हणजे विसंगति आहे असं म्हणणं तुमच्या आमच्या अज्ञानाचंच द्योतक आहे. इथली पात्रं बोलता बोलता गाऊ लागतील. इथले पुरुष आपल्या बायकांना सुंदरी म्हणतील, चारुगात्री म्हणतील, लाडके म्हणतील, प्राणेश्वरी म्हणतील आणि स्त्रिया म्हणतील– नाथ, प्राणनाथ,

हृदयेश्वरा, राया ! आणि हेच श्रोतृमंडळींनी घरी परतल्यावर करून पहावं ! बघा काय प्रकार होतो तो !

तात्पर्यार्थ इथल्या सृष्टीचा परमेश्वर नाटककार. तो आपल्या सृष्टीचे जे नियम ठरवील तेच खरे. त्यानं करायचा तो परिमाण केला की त्याचं तर्कशास्त्र परिपूर्ण आहे हे तुम्ही आम्ही मान्य केलं पाहिजे.

असंभाव्य कथावस्तूचा एक नमुना

मार्लो नामक इंग्रज नाटककाराचं डॉ. फॉस्टस नावाचं एक नाटक आहे. मार्लो आणि शेक्स्पीयर, दोघेहि एकच होत असा एक समज प्रचलित आहे. मार्लोच्या नाटकात **डॉ.** फॉस्टस हे विशेष गाजलेलं नाटक आहे. जो सिद्धान्त गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीसाठी मी येथे प्रतिपादित आहे त्याच्या पुष्ठचर्थ ह्या नाटकाचा दाखला विशेष उपयुक्त होण्यालायक आहे. ह्या नाटकात डॉ. फॉस्टस सैतानाशी असा करार करतो की सैतानाने डॉ. फॉस्टसच्या तो म्हणेल त्या कामना पूर्ण कराव्या आणि मोबदला म्हणून फॉस्टसने आपला आत्मा सैतानाला गहाण लिहून द्यावा. ह्या करारावरहुकूम सैतान फॉस्टसला, जिच्यावरून होमरवर्णित ट्रोजन युद्ध झालं ती, पॅरिसची पत्नी, हेलन, आणून उपभोगार्थ पुरवतो. ह्या नाटकाचा शेवट असा आहे की सैतान कराराच्या अटीप्रमाणे गहाण टाकलेला फॉस्टसचा आत्मा न्यावयाला येतो. आणि इथे कामनापूर्तीसाठी आपला आत्मा सैतानाकडे टाकणाऱ्या डॉ. फॉस्टसचा अत्यंत हृदयस्पर्शी असा विलाप आहे.

आपलं वास्तवातलं संभाव्य– असंभाव्यतेचं तर्कशास्त्र लागू केलं तर हे नाटक कचऱ्याच्या टोपलीत टाकण्याच्या योग्यतेचं ठरवावं लागेल. डॉक्टर फॉस्टस या नावावरून तो तुमच्या आमच्या वास्तव सृष्टीतला माणूस आहे हे स्पष्टच आहे. जसे आणि जितके जयंत – लीला – कमलावर; वृंदावन–वसुंधरा–भूपाल; सुधाकर – सिंधु – तळीराम, घन:श्याम – लतिका वा संभाजी – तुळशी आपल्या वास्तव सृष्टीतले आहेत तितकाच डॉ. फॉस्टस आपल्या वास्तव सृष्टीतला आहे. म्हणून ह्या नाटकातला सगळाच भाग हे असं कवी होत असतं का असा प्रश्न विचारून निकालात काढता येईल. मेंढचासारखी वळसेदार शिंगं माथ्यावर असलेला सैतान तुम्ही आम्ही कधी पाहिला आहे काय ? नाही ! मुळात सैतानच खोटा मग त्याच्याशी कराररमदार कसले ? ते त्याहूनहि खोटे. जसं आपली रामायण – महाभारत ही महाकाव्यं आहेत तसंच होमरचं इलियड. यातलं हेलन हे एक पात्र. हे कधी वास्तवात होऊन गेलं की नाही ह्याचाच वांधा. बरं हेलन कधी काळी होऊन गेली असली तरी ती मेली गेली असली पाहिजे यावद्दल प्रश्नच नाही. मग ही हेलन जिवंत स्त्रीच्या रूपात उपलब्ध होईलच कशी ? सगळंच असंभाव्य. पुढे

सैतान फॉस्टसचा आत्मा काढून नेऊ लागतो. आत्मा का कुठे असा काढून कुणाला नेता येतो ? सगळंच झूट ! सगळंच असंभाव्य.

सृष्टीच्या स्वयंपूर्णतेचं तर्कशास्त्र: त्यानुसार गडकऱ्यांची नाटकं परिपूर्ण

पण मंडळींनो, हे सगळं आपल्या वास्तव सृष्टींत असंभाव्य असलं तरी रंगभूमीवर तर्कदुष्ट नाही. ह्याचं तर्कशास्त्र मुळातच आपल्या वास्तवातल्या तर्कशास्त्रापेक्षा वेगळं आहे. हे तर्कशास्त्र त्या सृष्टीच्या स्वयंपूर्णतेचं तर्कशास्त्र असतं. ह्याचा अर्थ असा की कलावंत आपली एक सृष्टि निर्माण करतो. ती स्वयंपूर्ण असते. आणि त्यातल्या लहान मोठ्या गोष्टीला जो काही अर्थ असतो तो त्या सृष्टीच्या स्वयंपूर्णतेच्या संदर्भातच. कलावंताने निर्माण केलेली सृष्टि स्वयंपूर्ण वा परिपूर्ण असल्याचा पडताळा एकाच गोष्टीवर मिळत असतो. ती म्हणजे त्या सृष्टीचा साकल्याने पडणारा प्रभाव. म्हणजे कलाकृतीने पूर्णाविष्कृती-नंतर रसिकाच्या मनाची पकड घेतली की ती सिद्ध झाली. रसिकाच्या कल्पना शक्तीवर पगडा बसविला की त्या निर्मितीने आपलं कार्य पूर्ण केलं. रसिकाच्या ठायीचे स्थायीभाव उद्दीपित केले व रससिद्धि केली की ती कलाकृति परिपूर्ण आहे, निर्दोष आहे हे मान्यच केलं पाहिजे.

ह्याच अर्थाने गडकऱ्यांची नाटकं परिपूर्ण आहेत, निर्दोष आहेत.

गडकऱ्यांच्या नाट्याची प्रकृति कल्पनाप्रचुरच आहे.

कै. गडकऱ्यांची नाटकं सर्वच दृष्टींनी सरसकट निर्दोष आहेत असं सिद्ध करून दाखविण्याचा माझा प्रयत्न नाही. वास्तवातील संभाव्य – असंभाव्यतेची कसोटी व तर्कशास्त्र या नाट्यसृष्टीला लावून चालणार नाही येवढं स्पष्ट करणं मात्र आवश्यक आहे. वस्तुतः या निकषावर कोणत्याच प्रकारच्या नाट्यकृतीचं मूल्यमापन करणं इष्ट नाही. मार्लोचं डॉ. फॉस्टस हे रोमँटिक म्हणजे सर्वस्वी कल्पनाप्रचुर असं नाटक आहे असं कुणी म्हणेल. असल्या कल्पनाप्रचुर नाट्याला वास्तवातील तर्कशास्त्राचे सिद्धान्त लावता येणार नाहीत व ते लावू नयेत हा युक्तिवाद बहुतेक सर्वजण मान्य करतील. पण सामाजिक नाटकांबद्दल मात्र पुष्कळांची अशी समजूत असते की त्यातील सृष्टीला वास्तवातील सृष्टीचंच तर्कशास्त्र लागू आहे. पण ही समजूत बरोबर नाही. सामाजिक नाटकाची प्रकृति कल्पनाप्रचुर असू शकते. आणि ती तशी असेल तर मार्लोच्या डॉ. फॉस्टसबद्दल जे विवेचन मी केलं ते तिलाहि लागू होतं. गडकऱ्यांची नाट्यप्रकृति वस्तुतः कल्पना-प्रचुरच आहे. म्हणजे 'पुण्यप्रभाव' हेच नाटक कल्पनाप्रचुर आहे असं नव्हे. तर कल्पनाप्राचुर्याचीच आभा अन्य सर्व नाटकांवर पडली असल्यामुळेच ती इतकी प्रभावी झाली आहेत. आणि त्यांची जात रोमँटिक म्हणजे कल्पनाप्रचुरच आहे.

सुष्टांची व दुष्टांची मूस एकाच द्रव्याची आहे.

गडकऱ्यांच्या नाटकांची जात कल्पनाप्रचुर ठरविण्याचं कारण मुख्यत: एकच. म्हणायला त्यांची पात्रं वास्तव कोटीतली असली तरी ती अतिमानुष असतात. किंवा अमानुष असली तर पराकोटीतली असल्याचं निदर्शनाला येतं. म्हणजे तीहि अतिमानुषच असतात. हे जे अतिमानुषतेचं रसायन आहे त्यातच नाटकांचा कल्पनाप्रचुर आत्मा दडलेला आहे. ज्या द्रव्याची मूस ओतून गडकरी ह्या पात्रांची जडणघडण तयार करतात ते द्रव्य गडकऱ्यांच्या काव्यात्म नाट्याचं असतं. कमलाकर, वृंदावन व घनःश्याम नुसतेच खलपुरुष नाहीत. खलपुरुष म्हणून त्यांचे जे डावपेच असतात ते काही प्रत्यक्षात होऊन गेलेल्या अट्टल गुन्हेगाराप्रमाणे आपली अक्कल गुंग करू शकणार नाहीत. संपूर्ण भावबंधन घन:शामाने हस्तगत केलेल्या दोन चिटोऱ्यावर उभं आहे. कोणीहि वकील ह्या दोन चिटोऱ्यांचं उपद्रवसामर्थ्य बेताबाताचं आहे हे सांगू शकेल. कमलाकराचं कारस्थान करण्याचं सामर्थ्य अफाट असल्याचं प्रेमसंन्यासात दिसून येतं. पण बुद्धीच्या धारेवर ती कारस्थानं धरताच त्यांची वासलात लागायला वेळ लागत नाही. चिकित्सकांनी या बाबीवर बोट ठेवून नाटकातील कमकुवतपणा दाखवण्याचा प्रयत्न अनेकवार केलेला आहे. पण डॉ. फॉस्टसमधला मेफिस्टोफेलिस सैतानाचा राजदूत आहे येवढी ओळख मान्य केल्यावरोबर आपण वास्तवातील संभाव्य – असंभाव्यतेच्या निकषाचा शाणाष्मच गुंडाळून बाजूला ठेवतो. तोच प्रकार गडकऱ्यांच्या नाटकांच्या बाबतीतहि घडतो. हे मी छाप्यातील थिजलेल्या अक्षरांबद्दल म्हणत नाही. नाट्यप्रयोग बघताना जी तादात्म्यता साधते ती स्मरून म्हणतो. कमलाकर, वृंदावन व घन:शाम यांचं नाट्यात्म मोल त्यांच्या कसबी गुन्हेगारीत नाही. ते तसे वास्तवातील जडणघडण असलेले खलपुरुष नाहीतच. ते कल्पनारम्यसृष्टीतले फक्त विशिष्ट नाट्यछटांनी विनटलेले खलपुरुष आहेत. वृंदावनाच्या पापाची जात तर काव्यात्मच आहे. डॉ. अ. ना. देशपांडे आपल्या 'आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास' (भाग १ ला पृ. २२६) या ग्रंथांत हा पापी वसुंधरेची 'निरी ओढण्यासाठी' सरसावून जातो असं अनवधानाने लिहून जातात. तर आपल्या 'नाटककार गडकरी' ग्रंथात डॉ. रा. शं. वाळिंबे तात्काळ जबाब देतात की या निरी ओढण्याच्या प्रकाराला नाटकात कसलाहि पुरावा नाही. म्हणजे वृंदावनाला पाप करायचं होतं ते वेगळंच. काव्यात्म ! वसुंधरेने त्याला फक्त हार घातला की त्याच्या सूडबुद्धीचं समाधान होणार होतं. गडकऱ्यांची पात्रं दोन वर्गात मोडतात. सुष्ट आणि दुष्ट. दोघांचीहि प्रकृति काव्यात्म वक्तृत्वाद्वारे प्रकट होण्याची आहे. फरक येवढाच की सुष्टांची प्रतिमानं सुरम्य तर दुष्टांची प्रतिमानं भीषण, भेसूर ! तात्पर्यार्थ दोहोतलं रसायन एकच. कल्पनाप्राचुर्याचं ! दोघांची मूस एकाच द्रव्याची. काव्यात्म वक्तृत्वाची ! छटाहि दोघांच्या गडदच. पण सुष्टांच्या सुरम्य तर दुष्टांच्या भेसूर.

भीषण व भेसूर प्रतिमानांनी खल साकार होतात

कमलाकर कसा आहे ? तर ज्याला संध्याकालीन शोभा ' भीषण रमणीय ' वाटते. अस्ताला जाणारा सूर्य गगनमार्ग चालण्याच्या श्रमाने उरी फुटल्यामुळे रक्ताची गुळणी टाकून निष्प्राण होऊन पडलेला दिसतो. ढग शेणगोळा फिरवताना दिसतात. अगस्तीचा तारा मृत्युशय्येजवळच्या दक्षिणमुखी समयीसदृश भासतो. द्रुमनचं लटकतं प्रेत बघून ' भयानक सौंदर्याला ' आलिंगन देण्यासाठी त्याचे बाहू शिवशिवतात. ही सारी प्रतिमानं प्रथम काव्यात्म आहे. गडद छटांची आहेत. आणि मग भेसूर आहेत. आणि या छटांनी कमलाकर साकार होतो. तो खल आहे तो काव्यात्म स्वरूपाचा, भीषण व भेसूर प्रतिमानांनी साकार झालेला.

वृंदावनाला दिव्य तेजाला ' राक्षसी रंग ' चढून ' काळोखाचे ब्रह्मांड ' पसरलेले दिसते. तोहि काव्यच बोलतो. त्याला भीति वाटते ती अशी की "कोमल चंद्रिकेने कठिण चंद्रकांत पाझरतो. झुळझुळत्या झऱ्याच्या नाजूक झरणीने काळ्याकभिन्न कड्यालाहि कंगोरा पडतो. त्याचप्रमाणे कालिंदीच्या अश्रूंच्या झिरपणीने आपल्या हृदयाचे पाणी होऊन जाईल." त्याच्या भावना मुक्त होताच तो म्हणेल – " अचेतन जगावर सुद्धा स्त्रियांची सत्ता चालते. नंदनवनातल्या पारिजातावर स्त्रियांनी चूळ टाकली म्हणजे तावडतोब त्याची कळी खुलते. बिचारा अशोक तर नुसत्या लत्ताप्रहारानेहि फुलून जातो." पापाला विरोध करू पाहणाऱ्या बायकोला खडसावताना तो म्हणेल, " नदीचे पाणी मूळचे गोड असले तरी समुद्राला मिळताच तिचे त्याचे एकजीवन होते हे लक्षात ठेव ! "

आणि घनःशाम एकाच दमात कन्यादानाच्या उदकाची डोळ्यांनी सुरवात होते असे म्हणतो आणि असेहि म्हणतो की प्रियजनांच्या मृत्यूची बातमी ऐकताच सचैल स्नान करण्याची धर्माज्ञा पाळण्याचं कार्य अश्रूंच्या मंगल स्नानाने होतं. तो संतापला म्हणजे म्हणतो, धगधगीत निखाऱ्यावर पाणी टाकले म्हणजे त्याचा सर्वस्वी कोळसा होतो व तेजस्वी माणसाच्या आशेवर पाणी पडू लागले म्हणजे त्याचे अंतःकरण काळेठिक्कर पडते ! तो लतिकेला खडसावतो, दयामाया हे सारे शब्द रिकामटेकड्या भाषापंडितांनी कोशाच्या खोगीरभरतीसाठी तयार केले आहेत. जगाच्या बाजारात निर्व्याज दयेची हुंडी ओळखीवाचून व्यवहारी मनाला पटत नाही.

साऱ्यांनाच कल्पनेची खिरापत मिळालेली

जयंत आणि लीला यांच्या कल्पनारम्य व्यक्तित्वाची ओळख सांगण्यासाठी अशा सुरम्य काव्यात्म उक्तींची नुसती रास उभी करता येईल. गोकुळ आणि मथुरा निर्बुद्ध खरी. पण कल्पनाप्रचुरतेचा यथेच्छ थाटमाट केल्यावाचून ती सुद्धा

अनुक्रमणिका

रंगभूमीवर येत नाहीत. त्यांची काव्यात्मता फक्त निर्बुद्धतानिदर्शक छटांनी रंगलेली असेल येवढाच काय तो फरक. पुण्यप्रभावात वसुंधरा आणि कालिंदी, भूपाल आणि ईश्वर यांचं व्यक्तित्व सुरम्य कल्पनाप्राचुर्याने विनटलेलं असेल तर कंकण आणि किंकिणी, नुपुर, सुदाम आणि दामिनी यांच्या रूपाने कल्पनाप्राचुर्यच पण विडंबनपर रूपांत उभं होतं. एकच प्यालयातल्या सुधाकर, सिंधुबद्दल तर बोलायलाच नको. पण तळीराम आणि आर्यमदिरा मंडळातील सदस्य देखील कल्पनाप्राचुर्याची लेणी इतकी चढवतात, विडंबन साधतात पण परमेश्वराने कल्पनेची खिरापत वाटली तेव्हा सुधाकर – सिंधूबरोबर झाडून आपणहि सारी हजर होतो याचीच साक्ष पटवतात.

असा हा पात्र उभारणीचा प्रकार बघून गडकऱ्यांच्या नाटयसृष्टीचं निदान, ती कल्पनाप्रचुर कोटीतली आहे असंच करावं लागेल. व कल्पनारम्य जातीच्या कलाकृतीला लावावयाचे निकष लावूनच तिची पारख करावी लागेल.

सगळे बोल नाटयात्म

प्रेमसंन्यासापासूनच गडकऱ्यांनी भीषण कल्पनाचित्रें रंगवलेली व भेसूर प्रतिमानांची जागोजाग पेरणी केलली आढळते. हा प्रकार हेतुपूर्वक, योजून केला आहे असं म्हणता येणार नाही. त्यांची नाटयात्मता जशी प्रासादिक बोल काढीत थुईथुई नृत्य करीत जाते तशीच भेसूर प्रतिमानांचं तांडव घालून उग्र रंगहि भरते. हा सारा त्याच्या नाटयप्रकृतीचाच एक भाग आहे. गडकऱ्यांची प्रतिभा बरीचशी शेक्स्पीयरच्या प्रतिभेच्या जातीतली आहे. ती साधं बाळबोध आशयाचं गद्य सहसा बोलतच नाही. बोलेल ते ढंगदार. काव्यात्म चमत्कृतिपूर्ण प्रतिमानांनी विनटलेलंच. पोपच्याबद्दल एक आठवण आहे की हा कवि लहान असताना त्याला त्याच्या बापानं कविता करण्याबद्दल मार दिला. तसा हा कवि कळवळून ओरडला ते परत काव्यच. Father father mercy take; verses shall I never make. गडकऱ्यांच्या देखील साध्या उक्ति अशाच नाटयात्म थाटणीच्या असत कंपनीच्या बिऱ्हाडी गडकऱ्यांच्या झोपायच्या जागी कुणीतरी बटाटयांचं पोतं आंतून ठेवलेलं होतं. गडकरी ओरडले, कोण लेकाचा आपलं डोकं इथे रिकामं करून गेला आहे ? त्यांनी लिहिलेल्या पुण्यप्रभाव नाटकाच्या तालमी सुरू होण्यापूर्वी गुर्जर आणि चिंतामणराव कोल्हटकर यांनी काटछाट करताना चार वाक्यावर तांबडी पेन्सिल मारताच गडकरी विव्हळले – मारली, मारली, मारली माझी चार पोरे ! आपल्या परम स्नेह्याबद्दल शंकरराव मुजुमदार वाईट बोलू लागले तर गडकरी उद्गारतात – तुमच्याबरोबर स्वर्गाला येण्याऐवजी त्याच्याबरोबर नरकाला जाणं पसंत करीन ! ही असली वाक्यं जाता येता गडकऱ्यांच्या

तोंडातून बाहेर पडत. मग त्यांच्यातला वृहस्पति जागा होऊन लिहू लागला तर विचारायलाच नको. नुसता धवधवा अव्याहत कोसळत राहतो. गडकऱ्यांच्या नाटयात्मतेत कितीतरी गुणांचा अभाव असेल. पण काय नाही याला 'काहीच महत्व नाही. अनेकांनी गडकऱ्यांच्या ठिकाणी कोणते गुण नाहीत हे सांगितलं आहे. ते गुण नसतीलहि. पण त्यानं काय विघडतं ? गडकऱ्यांच्या प्रतिभेत mature wisdom नाही ! निखालस वास्तवता नाही. बुद्धिवादी तार्किकता नाही. रचनाकौशल्य नाही. निरगाठ मारण्याचं आणि हलक्या हातानं गुंतागुंत सोडविण्याचं हस्तलाघव नाही. स्थलकालाच्या खाणाखुणांची विनचूक आठवण त्यांना ठेवता येत नाही. वंडगार्डन या नावाशी कुणाच्या कल्पनासृष्टीत काय साहचर्य उत्पन्न झालेलं आहे याचं भान ते ठेवू शकत नाही. परिपूर्ण आदर्श शोधायला निघालेल्यांसाठी रंगभूमीवर आदर्शांचं प्रदर्शन मांडून हवा तितका परिपूर्ण माल त्यांना पुरवता येत नाही. त्यांना धड सुधारकांकडून कौल देता येत नाही की सनातन्याकडून. आकाशातल्या नक्षत्रांच्या शर्यती रमून बघत राहावं त्याप्रमाणे ते टिळक आगरकरांचा वाद व जहाल मवाळांचं राजकारण यांच्याकडे लुब्ध नजरेने बघतच राहतात. पण कोणताच पक्ष त्यांना घेता येत नाही. ज्या काळात ते जगले त्याचं प्रतिबिंब हवं तितकं यथातथ्यपणे त्यांच्या नाटकात सापडत नाही हे सगळं खरं असलं तरी अभाव कशाचा आहे हे महत्वाचं नाही. प्रभाव कशाचा आहे हे महत्वाचं आहे.

गडकऱ्यांची नाटयप्रतिभा मोराच्या प्रकृतीची

नागपूर येथेच झालेली एक खडाजंगी मला आठवते. एका स्मृतिदिन प्रसंगी गडकऱ्यांवर बोलताना नामवंत नाटककार, वासुदेवराव भोळे यांनी असं प्रतिपादन केलं की गडकऱ्यांच्या नाटकात अकारण पसारा फार असतो. या नंतर आपल्या सर्वांच्या परिचयाचे कथाकार पु. भा. भावे बोलले. भाव्यांनी भोळ्यांवर जबरदस्त हल्लाच चढवला. भाव्यांचे उद्गार मात्र अत्यंत चमकदार होते व तितकेच मर्म विशद करणारे होते. ते म्हणाले की मोराचा पिसारा तसा कोणत्याहि उपयोगाचा नसेल. म्हणून काय मोराला आटोपशीर करण्यासाठी तुम्ही त्याची सोललेली कोंबडी बनवाल ? भाव्यांचा सवाल अतिशय मार्मिक आहे. गडकऱ्यांची नाटयप्रतिभा मोराच्या प्रकृतीची आहे आणि त्यांच्या नाटयसृष्टीचा पसारा मोराच्या पिसाऱ्यासारखा आहे. ही नाटयप्रतिभा जितकी रंगात येईल तितका ती पिसारा विस्तारीत सुटेल. गडकऱ्यांनी लिहिलेल्या नाटकाची काटछाट करून ते तुम्हाला प्रमाणशीर करताच येणार नाही. आणि तसं करू पहाल तर मोराच्या जागी सोललेली कोंबडीच तुम्हाला बघावी लागेल. मोराला जसा त्याचा पिसारा हे सर्वस्व तसाच गडकऱ्यांना आपला काव्यात्म नाटयसंभार हे सर्वस्व होतं. गुर्जर

– कोल्हटकरांनी पुण्यप्रभावातल्या चार वाक्यावर तांबडा काट मारल्याबरोबर मारली, मारली, मारली माझी चार पोरं असं म्हणत गडकरी विव्हळल्याचं थोड्या वेळापूर्वी मी सांगितलंच. दुसऱ्या एका प्रसंगी ते न्हाव्याकडून श्मश्रु करून घेत बसले असता काटछाट केलेली भावबंधनाची रंगावृत्ति त्यांच्यापुढे आली. बघतात तो त्यांच्या आवडत्या वाक्यावर – हातापासून हृदय दोनच हात दूर असेल तर पायांपासून डोके साडेतीन हात अंतरावर असते – या वचनावर लाल काट. त्याबरोबर गडकरी न्हाव्यावर ओरडले, तुझा वस्तरा बंद कर बघू. माझी अर्धी मान कापली गेली आहे, उरलीसुरली तुझ्या वस्तऱ्याने तुटेल !

गडकऱ्यांच्या पात्रांचे तोंड प्रेक्षकांकडे आहे

गडकऱ्यांच्या नाटयसृष्टीबद्दल आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. आजच्या प्रचलित नाटयपद्धतीत रंगभूमीवरची पात्रं आपापसात बोलतात, व्यवहार करतात – थोडक्यात म्हणजे परस्परात संवाद साधतात. हेच सहज स्वाभाविक आहे अशी समजूत करून दिली असल्यामुळे आमचा आजचा प्रेक्षक रंगभूमीवरच्या पात्रांनी आपली दखल घेतली नाही म्हणून तक्रार करीत नाही. परस्परांशी नित्याच्या पद्धतीने – म्हणजे बहुधा तोंडातल्या तोंडात – ही पात्रं बोलत असताना त्यांचे शब्द नीट ऐकूहि येईनासे झाले म्हणजे फार फार तर आजचा सोजन्यशील प्रेक्षक येवढीच सूचना करतो की माइकची व्यवस्था थोडी अधिक चांगली होईल तर बरं ! प्रत्येक पात्राच्या तोंडाशी अगदी ओठाजवळ जेव्हा माइक नाचवला जाईल तेव्हाच कदाचित् हे 'सहज स्वाभाविक' संवाद प्रेक्षकांच्या कानी पडले तर पडतील. गडकऱ्यांच्या नाटकात पात्रांनी परस्परात बोलून टाकावेत असे संवाद नाहीत. गडकऱ्यांची नाटकं प्रमाणशीर करण्याचा कुणी प्रयत्न करील तर त्याच्या हातून विटंबनाच होईल. तद्वतच गडकऱ्यांच्या पात्रांना 'सहज – स्वाभाविक' करण्यासाठी कुणी आपापसात बोलून घ्या म्हणेल तर ते चालण्यालायक नाही. त्यांची प्रकृति फार वेगळी आहे. विधानसभेतली वा संसदेतली भाषणं आपण ऐकली असतील. इथे वक्ता 'मिस्टर स्पीकर सर' म्हणून सभापतीला संबोधतो व भाषण करतो. पण नुसतं सभापतीला 'मिस्टर स्पीकर सर' म्हणून संबोधून झालं की बाकी सगळा भाग वक्ता सभागृहाला व प्रसंगी वरच्या गॅलरीतल्या प्रेक्षकांना उद्देशून बोलतो. गडकऱ्यांच्या नाटयसृष्टीतली पात्रं म्हणजे एम्. एल्. ए. – एम्. पी. च समजा. सुधाकर 'ऐक रामलाल' म्हणतो ते त्याचं 'मिस्टर स्पीकर सर' असं प्रारंभिक संबोधन असतं. 'या एकच प्याल्यात काय आहे म्हणून विचारतोस ? भाई अगदी वेडा आहेस !' येवढं वाक्यं म्हटलं की सुधाकराचं तोंड प्रेक्षकांकडे. घसा साफ करून खडया चढत्या स्वरात सुधाकर प्रेक्षकांना ऐकवील – या एकच प्याल्यात काय काय नाही म्हणून

तुला वाटतं ? (प्याला भरून) हा पहा एकच प्याला – यांत काय दिसतं आहे ?' आणि मग तब्बल तीन पानी भाषण ! तेहि रामलालला बाजूला उभा ठेवून प्रेक्षकांना उद्देशून. मंडळीनो, हा गडकऱ्यांच्या नाटयलेखनातला दोष नाही. ती नाटयप्रतिभा याच प्रकृतीची आहे. मी मघाच एक सिद्धान्त सांगितला की रंगभूमीवरची सृष्टि आपल्या वास्तवातल्या सृष्टीसारखी असण्याचं काहीच कारण नाही. तिचा खाक्या वेगळा असतो व तो वेगळा असायलाहि हवा. रंगभूमीवरची पात्रं आपापसात बोलायचं ते प्रेक्षकांकडे तोंड करून बोलतात हा काही दोष नाही. या पद्धतीबद्दल त्यांच्यावर दोषारोप करणं केवळ अज्ञानाचंच द्योतक आहे. हा जो नाटयातला कलाप्रकार आहे – pattern आहे त्याचंच ते एक अंग आहे. गडकऱ्यांची नाटयप्रकृति रंगभूमीवरून प्रेक्षागृहाच्या भिंतीवर शब्दांची सरबत्ती करणारी आहे. तोफखान्याप्रमाणे तिचं तोंड खंदकाच्या पल्याड धडक देण्यासाठी उघडलेलं असतं. गडकऱ्यांच्या नाटयात्मतेचा नायगारा रंगभूमी-वरून धाडधाड प्रेक्षागृहात सरळ कोसळत असतो. "अंतःकरणात पेट घेऊन आतल्या आत भडकणाऱ्या सूडाच्या निश्वासांनी या वातावरणाला अजून आग कशी लागत नाही – आकाश तुटून खाली का कोसळत नाही" म्हणून मुठी आवळत, दात ओठ खात केवळ प्रेमसंन्यासातला कमलाकरच आपल्या शब्दांच्या तोफा प्रेक्षकांकडे तोंड करून डागीत नाही. जयंत आणि लीला देखील आपापसातलं प्रेमहि परस्परात उरकीत नाहीत. त्यांच्या प्रेमामृताचा ओघहि तुम्हा आम्हा प्रेक्षकाकडे तोंड करूनच वाहतो. "दूर हो, लीले दूर हो" म्हणण्या-पुरतं जयंत लीलेकडे पाहील व "मन पापी आहे तसंच ते अनावरहि आहे" वगैरे भाग, महाराज, तुम्हा आम्हांकडे तोंड करून जयंत म्हणेल. आणि लीला जेव्हा "देवा, आजवर खोल हृदयसागरात दाबून ठेवलेली ही प्रेममौक्तिके ज्या मनकवडया पाणबुडयाने काढली ती त्यालाच दिली नाहीत तर तू सुद्धा मला क्षमा करणार नाहीस" म्हणेल तेव्हा तिचं तोंड देवाकडे नव्हे, तर प्रेक्षागृहाकडे असेल. प्रेक्षागृहाकडे अभिमुख होऊन बोलकी बनलेली अशी गडकऱ्यांची नाटयात्मता आहे. ती ज्यांना आकलन झाली नाही त्यांना गुणातच दोष दिसेल !

नाटयात्मता वक्तृत्वाप्रमाणे साकल्याने परिणाम करते

गडकऱ्यांची नाटयात्मता प्रेक्षकाभिमुख होऊन बोलकी होते तशीच तुफान वक्तृत्वाप्रमाणे साकल्याने संस्कार करते. गडकऱ्यांचे छापील शब्द समोर ठेवून विसंगतीचा कीस काढणारे टीकाकार पुष्कळ आहेत. पण थिजलेले शब्द घेऊनच हा कीस काढणं शक्य आहे. मी वेडयांचा बाजार आणि राजसंन्यास ह्या दोनच नाटकांचे प्रयोग पाहिलेले नाहीत. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला व

भावबंधन यांचे प्रयोग पाहिले आहेत. प्रेमसंन्यास व एकच प्याला यांचे प्रयोग तर अनेकवार पाहिलेले आहेत. ही नाटकं बघताना जो व जसा परिणाम घडतो, घडत जातो तो मी वर्णन करू शकेन. तार्किक विसंगतीचा विचार करायला मुळी आपल्याला मधे उसंतच मिळत नाही असा माझा अनुभव आहे. शब्द जणु भिरभिरत पण अचुक वेध घेत येतात व मनावर निशाणी उमटवून जातात. मनाला शब्दांची एक वेगळीच गुंगी चढू लागते. आणि नियतीचा जो अनावर ओघ आहे त्याबरोबर एकदा आपण वाहू लागलो की घडतं आहे ते अटळ वाटत राहतं. अवाक् होऊन होतं आहे ते आपण बघत राहतो. आणि जेव्हा नाटकाहून परततो तेव्हा गडकऱ्यांच्या शब्दांचं आणि प्रतिमानांचं मोहळ अद्याप आपल्या डोक्याभोवती घोंघावत आहे असंच वाटत राहतं. गडकऱ्यांची नाट्यप्रतिभा ही अशी झपाटणारी आहे.

चिरपरिचित आशय आणि अक्षय प्रभावी ऊक्ती

ज्याला boiling down म्हणतात तो प्रकार करून गडकऱ्यांच्या नाट्यातून काय सार निघतं ते काढण्याचा प्रयत्नहि टीकाकारांनी केला आहे. पातिव्रत्य ही एक गडकऱ्यांना सापडलेली अफाट कल्पना आहे. तीच नाना रूपांनी मंडित होऊन सतत प्रकट होते. त्यांची प्रत्येक कथावस्तु म्हणजे पातिव्रत्याचं एक रूपच असतं म्हणाना. प्रेमसंन्यासात तिची दोन चार रूपं आहेत. पुण्यप्रभावात दोन चार रूपं आहेत. आणि एकच प्याल्यांत एक दोन आहेत. एक तर, म्हणजे सिंधूचं; साक्षात् गौरीशंकराच्या शिखरासारखं सर्वोच्च बनलेलं आहे. मराठी आणि महाराष्ट्र याबद्दल गडकऱ्यांना असीम प्रेम आहे. याचा साक्षात्कार राजसंन्यासात मिळतो. 'ब्रह्मकौस्तुभ' हे थोरल्या माधवरावांवरचं नाटक पूर्ण झालं असतं तर त्यांत मिळाला असता. आणि संपूर्णशः गडकऱ्यांची नाट्यसृष्टि घेतली तर वर विस्तारशः वर्णिलेलं नाट्य त्यात आहे. मग नाही काय याचा टीकाकारांनी जो पाढा वाचला तो मी दिलाच आहे. हा पाढा बराच मोठा आहे. एवंच आशयाच्या बाबतीत what boils down म्हणजे अखेर सार काय उरतं ? असा प्रश्न उभा राहील. बर्नार्ड शॉला असा प्रश्न टाकला असता तर त्यानं सुप्रसिद्ध शेव्हियन खाक्याचं उत्तर दिलं असतं – कोण लेकाचा म्हणतो की नाट्यात सार असावं म्हणून ? वस्तुतः ह्याच खाक्याचं उत्तर याबाबतीत समर्पक होईल. नवा आशय गळी उतरविण्यासाठी नाट्याचा अवतारच नाही.

ब्रँडर मॅथ्यूज हा इंग्रजीतला एक नामवंत टीकाकार आहे. याचं एक वचन इथे देतो – " It has been the strength of the great dramatists that they were not too far in advance of their time,

that they held most of the opinions of their contemporaries, contenting themselves with restating the eternal commonplaces of life in imperishable phrase." हे वचन गडकऱ्यांच्या नाटचप्रकृतीच्या समर्थनार्थच जणु लिहिलं असावं असं आहे. आपल्या कालाच्या पुढे झेप घेतली नाही यातच जगातल्या मोठ्या नाटककाराप्रमाणे गडकऱ्यांचं सामर्थ्य आहे. पुढचे ब्रँडर मॅथ्यूजचे शब्द तर फारच मौलिक आहेत. आणि गडकऱ्यांच्या नाटचप्रतिभेचं अत्यंत मौलिक अंग कोणतं ते त्यावरून लक्षात-येईल. commonplaces of life म्हणजे तुम्हा आम्हाला चिरपरिचित आहे तोच आशय गडकऱ्यांनी उचललेला आहे. पण हे commonplaces of life नुसतेच commonplaces of life असून चालत नाही. ते eternal म्हणजे चिरंतन स्वरूपाचे असावे लागतात. पातिव्रत्य ही त्या चिरंतन व चिरपरिचित कोटीतली चीज आहे व ती गडकऱ्यांनी श्रृंगारली. पुढे आविष्कृतीबद्दल ब्रँडर मथ्यूजने "in imperishable phrase" हा शब्दप्रयोग केला आहे. म्हणजे उक्ति कशी असावी तर अविनाशी – चिरंजीव – अक्षय प्रभावी ! आणि गडकऱ्यांची नाटचसृष्टि म्हणजे अशा उक्तींचं नुसतं कुबेराचं भांडार आहे.

"निव्वळ हौसेनं जरी दारूशी खेळून पाहिलं तरी दिवाळीचा दिवा भडकून होळीचा हलकल्लोळ भडकल्यावाचून रहायचा नाही.'' (एकच प्याला)

"नीट पहा, म्हणजे श्रीकृष्णाच्या तोंडांत विश्वरूपदर्शनप्रसंगी यशोदेला जे चमत्कार दिसले नसतील ते या रिकाम्या प्याल्यांत तुझ्या दृष्टीला पडतील." (एकच प्याला)

"नव्याने पायमल्ली होऊं लागली म्हणजे मेल्या कातडयाची वहाणसुद्धा थोडी कुरकूर करिते; मग मी तर जित्या रक्तामांसाची मुलगी आहे." (भावबंधन)

"भोवताली पसरलेल्या वस्तुमात्रांतला ईश्वर एखाद्या पतिताने पायाखाली तुडवून टाकला तरी निदान त्याच्या हृदयांतला ईश्वर जिवंत राहावा म्हणून विधात्याने हृदयाची उभारणी पायांच्यावर केली आहे." (पुण्यप्रभाव)

"काळचा रात्रीच्या अंधःकारात चक्रवाकीला प्रियवियोगाचा भास व्हावयाला कमळाचे पान तरी आड यावे लागते. पण या सामाजिक अन्यायाच्या अंधारात तुमच्यामाझ्यामधे काही देखील अंतर नसून तुम्ही मला अंतरला आहांत, हाताजवळ असून हाती लागत नाही." (प्रेमसंन्यास)

"नाही लीले, परमेश्वर प्रेममय नाही.... मनुष्याला एखादे फूल निर्माण करता आले तर तो त्याला नुसते हातावर झेलील आणि आजन्म त्याचे पोवाडे

गात वसेल. पण परमेश्वर दररोज हजारो फुले फुलवितो आणि दुसरे दिवशी निर्दयपणाने ती सारी चिरडून टाकतो. एखाद्या कवीने तुझ्यासारखी नायिका निर्माण करून तिचा असा निर्दय शेवट करण्याचे मनात आणले असते तर ते भयंकर शब्दचित्र रेखाटताना त्याची लेखणी बंद पडली असती आणि त्याच्याच अश्रूंच्या ओघात ती कठोर अक्षरे पार वाहून गेली असती. पण अमानुष परमेश्वर हे सारे खेळ सहज करीत असतो." (प्रेमसंन्यास) हे वाक्य अक्षय प्रभावी उक्ति म्हणून जितकं उल्लेखनीय आहे तितकंच ज्या नियतिकल्पनेचा मी माझ्या पहिल्या भाषणात उहापोह केला तीच गडकऱ्यांना अभिप्रेत असल्याचा पुरावा म्हणून लक्षात ठेवण्यालायक आहे.

"उद्या या राखेच्या ढिगात कणाकणागणित जळलेल्या आशा, मेलेले मनोरथ, प्रेमाचे प्रेतप्राय प्रलाप, करपलेल्या कल्पना, मुक्या मनाच्या मातीत मिसळलेल्या महत्वाकांक्षा सापडतील, त्या मोजून ठेवा." (प्रेमसंन्यास)

"महाराष्ट्राच्या मूर्तिमंत पराक्रमा, तू हिंमतीनं हसायला लाग; तुझ्याबरोबर सह्याद्रीवरच्या फत्तराफत्तराला फुले येऊन ती हसायला लागतील." (राजसंन्यास)

"मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो. माझ्या बाबांनीं मालुसऱ्यांचे नाव सिंहगडावरून स्वर्गावर चढवून दिले आहे." (राजसंन्यास)

या आणि अशासारख्या एक नव्हे शेकडो अक्षय प्रभावी उक्ती – imperishable phrases गडकऱ्यांच्या नाटयसृष्टीत बारेमाप उघळल्या गेल्या आहेत. पण गडकऱ्यांची नाटयसृष्टि म्हणजे अशा उक्तींचीच आरास आहे असे मात्र नव्हे. अशा उक्ती मधून मधून सापडतात. परिणाम घडतो तो सर्वस्वी या व अशा उक्तींनी भरलेल्या वक्तृत्वाच्या ओघामुळे.

रचनाशास्त्र तोल आणि डौल यांचे

गडकऱ्यांची नाटयप्रतिभा मोराच्या कोटीतलीच आहे. तिला जितकं जितकं स्फुरण चढत जातं तितकी ती काव्यात्म वक्तृत्वाचा पिसारा अधिकाधिक विस्तारीत जाते. सौंदर्य आहे ते या पिसाऱ्याचंच. आणि म्हणूनच सौंदर्यशास्त्र आहे तेहि पिसाऱ्यालाच लागू होणारं. मोराच्या प्रकृतीला अनुकूल असलेलं !

गडकऱ्यांच्या नाटयसृष्टीत जो तोल आणि डौल आहे त्याचं स्वरूप लक्षात घेतलं म्हणजे रचनेबद्दलच्या ज्या दोषांचा त्यांच्या नाटकांवर आरोप केला जातो ते निकालात निघू शकतील. एका विशिष्ट साच्यात गडकऱ्यांनी आपलं नाटय ओतलं आहे खरं. आणि त्यात ते मावलं नाही हेहि खरं आहे. काटछाट करून आपण गडकऱ्यांचं नाटक प्रमाणबद्ध करून घेऊ शकू असं कुणाला म्हणता येणार

नाही. तसा प्रयत्न केल्यास मोर आहे त्याची सोललेली कोंबडी होईल. वक्तृत्वाच्या धाटणीचं नाटच तीव्र आवेगाने आविष्कृत होऊ लागल्यामुळे व पिसाऱ्यांप्रमाणे कल्पनांचा विस्तार करण्याच्या दुर्दम्य प्रवृत्तीमुळे कोणत्याहि साच्याची मर्यादा त्यांच्या नाटचप्रतिभेला चालण्यालायकच नव्हती. पण नाटक म्हणून जो एक साचा मान्यता पावलेला आहे त्यात जरी गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीला अंग आवळून बसता येत नसलं तरी त्या सृष्टीला स्वतःची अशी चार परिमाणं व्यवस्थित आहेत. येवढंच नव्हे तर तोल आणि डौल अशी रचनाशास्त्रातील आणखी दोन सौंदर्यलक्षणं तिच्या ठायी आहेत. त्यांच्या काव्यात्मतेत अवकाशाची तीन – लांबी, रुंदी व उंची – खोली ही परिमाणं आहेत समजा. आणि चौथं परिमाण आहे नियतीचं. या सृष्टीत जो तोल आढळतो तो पात्रांच्या उभारणीत. सिंधु हा पतिव्रता स्त्रीचा परमोच्च आदर्श आहे आणि हा आदर्श गडकऱ्यांनी निर्माण केला म्हणून त्यांना थोर मानणारे लोक आहेत. पण सिंधूचं पात्र उभारलं गेलं ते सुधाकराच्या भूमिकेला तोलून धरण्यासाठीच. हे सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून एकच प्याल्याच्या रचनेकडे बघितल्यास सहज लक्षात येईल. सिंधु हा आदर्श नव्हे. ती कमालीची दुबळी स्त्री आहे असं प्रतिपादणाऱ्यांचाहि एक वर्ग आहे. असेल! पण सुधाकराच्या आत्यंतिक वृत्तीचं पारडं तोलून धरायला तिच्या ठायीची समर्पणशील ऋजुताच आवश्यक होती आणि तिथे तसंच पात्र उभं करणं आवश्यक आहे येवढं भान गडकऱ्यांच्या नाटचप्रतिभेला जरूर होतं. तोल साधण्याची जागरुकता गडकऱ्यांच्या ठिकाणी असल्याचं ठायी ठायी प्रत्ययास येतं. सिंधु उभी करताच तिच्याशी तोल साधायला गडकऱ्यांनी लगेच गीता उभी केली आहे. गीता म्हणजे नुसताच विरुद्ध स्वभावाचा नमुना नाही. सिंधूच्या समर्पणशील ऋजुतेवर तिचा फटकळपणा व कणखरपणा क्षणकाल खुलून दिसतो तर तिच्या याच गुणांच्या अल्पप्रभावी पार्श्वभूमीवर सिंधूच्या समर्पणशीलतेचं सौंदर्य उठून दिसतं. प्रेमसंन्यासात बघा. विषय पुनर्विवाह हा. सुशीला, लीला व दुमन यांच्या रूपाने त्यांनी वैधव्याच्या तीन बाजू उभ्या केल्या त्या जणु परस्परांच्या विरोधात उभ्या राहून परस्परांचा तोल साधण्यासाठीच. पुण्यप्रभावात तीन प्रेमी आहेत. भूपाल, ईश्वर आणि वृंदावन, या तीघांच्याहि उभारणीत तोल साधण्याचाच प्रकार दिसतो. कालिंदी आणि वसुंधरा याहि असाच एक प्रकारचा तोल साधतात. पुण्यप्रभावात तर हा तोल साधण्याचा प्रकार बराच आढळतो. एका बाजूने पातिव्रत्याचा विषय नटवीत ते उत्कर्षाप्रत नेतात तर दुसऱ्या बाजूने कंकण आणि किंकिणी, सुदाम आणि दामिनी यांच्या द्वारे ते तीच कल्पना उलटी टांगून तोल साधतात. प्रेमसंन्यासात गडकऱ्यांनी पुनर्विवाहाचा धड पुरस्कार केला नाही की त्या सुधारणेचा धड निकाल लावला नाही अशी टीका गडकऱ्यांवर दोन परस्परविरोधी गटांनी मिळून केलेली आहे.

ही टीका आहे बरोबरच. पण गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीत तोल साधलेला आहे या माझ्या विधानाला पुष्टि देणाराच हा आक्षेप आहे. टीकाकारांना ज्यात दोष दिसला तो होता गुणच.

प्रमाणबद्धता तोल व डौल यांत

आता डौलासंबंधात म्हणायचं म्हणजे दुःखान्तिका असेल तर गडकरी सुष्ट आणि दुष्ट दोघांनाहि सारखाच पदन्यास करीत दुःखान्ताच्या गर्तेप्रत नेतात. येथे नाटचाच्या गतीत तो डौल दिसतो. पुण्यप्रभाव आणि भावबंधन या सुखान्तिकात गडकऱ्यांनी सुष्टांच्याबरोबर दुष्टांनाहि सावरून घेतलं आहे. जणु पदन्यासासाठी एक पाऊल वर तर एक खाली, पण दोन्ही आवश्यकच आहेत हा हिशेब गडकरी विसरत नाहीत. असा हा डौल दुःखान्तिकेप्रमाणे गडकऱ्यांच्या सुखान्तिकातहि आढळतो. रचनेच्या बाबतीत गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीत प्रमाणबद्धता शोधायचीच असेल तर ती या तोलाचा व डौलाचा प्रत्यय घेऊनच शोधावी लागेल. आणि गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीच्या रचनेचं हे विशिष्ट स्वरूप लक्षात घेतलं तर रचनेच्या बाबतीतील बहुतांश आक्षेप निरर्थकच ठरण्यालायक आहेत.

समारोप

असो, गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीच्या सर्वच अंगोपांगांचा विचार करण्याचा माझा हेतु नाही. काल मी गडकऱ्यांच्या नाटचप्रकृतीवर बोललो. आज नाटच-सृष्टीवर बोललो. वस्तुतः हे विषय दोन नव्हते. विषय एकच होता. तो म्हणजे गडकऱ्यांची नाटचप्रकृति हाच. दोन भाषणं द्यायची म्हणून दोन भाग पाडले. आणि म्हणूनच स्वाभाविकपणे दोन भाषणांतील मुद्यांची काहीशी सरमिसळ झालेली आहे. गडकऱ्यांच्या नाटचसृष्टीबद्दल जे जे मी बोललो आहे ते सर्व गडकऱ्यांच्या नाटचाच्या प्रकृतीबद्दलत्र आहे. आणि जे बोललो ते काही वैशिष्टचं सांगण्यालायक आहेत असं वाटलं म्हणून. आणि या भाषणांना मर्यादा घातली ती त्या वैशिष्टचांपुरतीच.

कालच्या व आजच्या श्रोतृवर्गाचा मी अतिशय आभारी आहे. आपण तल्लीन होऊन मला हवी ती पावती दिलेली आहे. ही व्याख्यानं देण्याचं आमंत्रण देऊन संचालक मंडळींनी माझ्या पदरात बहुमान टाकलेला आहे. मी त्यांचा ऋणि आहे.

★ ★ ★

● कथा

विषण्णतेच्या जिर्ण घागरीत
संदेहाचे जल खळबळते
अन् जडावलेली अस्थिरता
चिरशांतीला शोधित बसते !

कवी मनाला जाळित असते
गूढतेतली गूढगूढता
मध्यरात्रीच्या भयाणतेला
साथ देतसे मूक स्तब्धता !

निवांततेची रिती पोकळी
चोळित असते मीठ व्रणावर
निष्ठूरतेने घालित असते
घाव घनांचे जिव्हाग्रावर !

अशाच केव्हा उत्तररात्री......
आठवणींची हले डहाळी
स्वप्न सांगते कथा मनाला
जी घडलेली एकेवेळी !

★ ★ ★ —कृष्णा चौधरी

● गळफास

बरा होतो मी आंधळा
माझ्या आंधळ्या विश्वात
तुझ्या डोळस कृपेचा
आज मला गळफास !

भक्ति ठेऊनि गहाण
मोक्ष घेऊनि नाडलो ;
तुझ्या अस्तित्वाचा थांग–
घेण्या, रिणात बुडालो !

—जगन वंजारी

● रितपणे

नमवीता माथा
  झिजले कपाळ
दयेची ओंजळ
  रिती तुझी

कळले उशीरा
  कोरडा पाषाण !
तुला न तहान
  मा न व्या ची !

★ ★ ★ —सर्जेराव चौधरी.

● चुकलेली वाट

चुकलेली वाट
शोधतो कधिचा
अनंत विश्वाचा, शोध घेत.

    अनंत विश्वाचा
    कसा घ्यावा ठाव
    द्वैताद्वैत भाव, जुळवित.

जुळवा, जुळव
व्हायची अजून
अपंग जीवन सजवाया.

    अपंग जीवन
    क्षणात सजले
    क्षणात संपले, द्वैतभाव.

आला एक क्षण
वाटाड्या होवून
थकलेले मन, शांतवाया.

—राम भोयर.

मपला गाव

●

कुणी मंत्याती मजला आर तुह कोंच गाव
मराठवाड्यातला मी अर्धापूर मोह गाव.
साव, चोरांच्या पल्याह याची हाये सदा धाव
काही अंशी हिऱ्याहून अिथे इज्जतीला भाव.
गाव कोस तरणा बांड उभा झुकुनिया म्होर
शीणलेल्या काफिल्याची सेवा कराया तत्पर.
झुळझुळत्या वढ्याचा उतरून हिर्वाकाठ
करा नमन मुंज्याला हाये जरा हा वक्कट.
इथे राग, लोभ नाही इथे सुख, दुःख नाही
अेक पोटी अेक ओठी इथे काही काही नाही.
"इथे सदा कुंकवाला घर धन्याचेच ध्यान
त्यावे मंगळसुत्रान गाबे दगडी जात्यान.
असा आहे माझा गाव आहे जरी फाटलेला
लाज दुज्यांची झाकून हाये उघडा पडला.
अशा अुघड्या गावाला हाये मपलं हो घर
इथे ऱ्हातो वेळा पीर लिवलय दारावर!"

—राजामुकुंद

पुणे विद्यापीठ.

कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला

१९६१

पुणे विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेसाठी अेका व्याख्यात्याची निवड करावयाची आहे. व्याख्यानांचा विषय अितिहास, साहित्य, भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र अथवा "मराठी भाषा किंवा मराठ्यांचा अितिहास" या विषयांतील संशोधन, यांपैकी असावा. व्याख्यात्यास कमीत कमी सहा व्याख्याने मराठीत अेकाच विषयावर द्यावी लागतील. व्याख्यानमाला झाल्यावर व्याख्यात्यास, विद्यापीठाकडे व्याख्यानांची संपूर्ण हस्तलिखित प्रत द्यावी लागेल व त्यानंतर व्याख्यात्यास ७५० रुपये मानधन देण्यात येअील. व्याख्यानमाला कै. न. चिं. केळकर यांच्या श्राद्धदिनाच्या सुमारास सुरू होअील.

या व्याख्यानमालेतर्फे ज्यांना १९६१ या वर्षी व्याख्याने देण्याची अिच्छा असेल त्यांनी विद्यापीठाकडे १५ मार्च १९६१ पूर्वी अर्ज करावेत. अर्जदारांनी अर्जासोबत सर्व व्याख्यानांचा संक्षिप्त गोषवारा देणे जरूर आहे. त्याचप्रमाणे विषयासंबंधी आतापर्यंत अुपलब्ध नसलेली माहिती देण्यात येणार असल्यास, किंवा विषयाची नवीन दृष्टिकोनातून मांडणी करण्यात येणार असल्यास, तसा स्पष्ट निर्देश करावा.

गणेशखिंड, पुणे ७.

व. ह. गोळे
कार्यवाह.

अनुक्रमणिका

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

वि. सा. संघाला भेटी व व्याख्याने–

दि. ६–१–१९६१ रोजी सायं. ६–३० वा. श्री. ग. वा. कवीश्वर, अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य सभा इंदूर, यांनी भेट दिली.

दि. ९–१–६१ रोजी सायंकाळी ६–३० वा. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कलाकार श्री. नामदेवराव व्हटकर यांनी भेट दिली. यावेळी त्यांचे लोकसाहित्य व लोककला या विषयावर भाषण झाले.

दि. ११–१–६१ रोजी कोल्हापूरचे विद्वान व ज्ञानेश्वरीचे अभ्यासक श्री. बाळाचार्य खुपेरकर शास्त्री यांचे "ज्ञानेश्वरी आणि शैवागम" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले. यावेळी लो. ना. डॉ. बापूजी अणे यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते.

कै. बेहेरे व्याख्यानमाला वर्ष ३ रे–

दि. १६ ते १९ जानेवारी ६१ या तारखांना कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात करण्यात आली. यावेळी डॉ. ग. त्र्यं देशपांडे यांची "दार्शनिक अभिनवगुप्त" या विषयावर अनुक्रमे १ अभिनवगुप्ताचे जीवन – चरित्र २ अभिनवगुप्ताचे दार्शनिक विचार ३ अभिनवगुप्ताची साहित्य मीमांसा ४ अभिनवगुप्ताचा प्रभाव या विषयांवर उद्‌बोधक व्याख्याने झाली.

महात्मा ज्योतीबा फुले – तैलचित्र अनावरण समारंभ

दि. १८–१–६१ रोजी सकाळी ९ वाजता म. ज्योतिबा फुले यांच्या तैलचित्राचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. सुरुवातीला प्रा. म. ना. सरपटवार यांनी तयार केलेले गीत प्रा. सौ. चौधरी यांनी गाऊन दाखविले. नंतर संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी प्रास्ताविक भाषण केले. तैलचित्र फुलेसेवामंडळातर्फे सौ. सुशीलाबाई दळवी यांनी भेट म्हणून

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाला दिले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी " विदर्भ साहित्य संघासारख्या सांस्कृतिक व साहित्याचे केंद्रात महात्मा ज्योतिबा फुले याचे तैलचित्र लागले हा त्यांचा मोठा मान झाला असे मी मानतो " असे उद्गार काढले.

शेवटी चिटणीस श्री. य. गो. मालोदे व फुले सेवामंडळाचे अध्यक्ष श्री. अ. रा. कुळकर्णी यांनी आभार मानल्यानंतर 'वंदेमातरम्' होऊन कार्यक्रम संपला.

दि. २२-१-६१ रोजी सायं. ६ वाजता पंजाबचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. हरनामदास सहराई यांनी भेट दिली.

कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन समारंभ-

दरवर्षीप्रमाणे ४३ वा कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन समारंभ दि. २२ व २३ जानेवारी रोजी वि. सा. संघाच्या रंगमंदिरात साजरा करण्यात आला. या दोन्ही दिवशी प्रमुख वक्ते म्हणून विदर्भातील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वसंतराव वरखेडकर यांचे रविवार दि. २२ सायंकाळी ५ वा. 'गडकऱ्यांची नाटचप्रकृति' आणि सोमवार दि. २३ ला सायंकाळी ७ वाजता 'गडकऱ्यांची नाटचसृष्टि' या विषयावर सुश्राव्य व्याख्याने झाली.

दि. २२ ला रात्री ७ वाजता गोविंदाग्रजांच्या 'वाग्वैजयंती' मधील निवडक कविता सौ. दातार, सौ. प्रमिलाबाई पटवर्धन, सौ. शशिताई भिडे, कु. मीनाक्षी जोशी, कु. पुष्पा हळवे, कु. शैला ताम्हणे, श्री. धनंजय भावे, श्री. गोपाळ कौशिक, श्री. शरद मुठे, श्री. शरद सुतवणे, श्री. त्रिंबक काळे आणि श्री. विजय चिटणीस यांनी गाऊन दाखविल्या. हा कार्यक्रम छान झाला.

दि. २३ रोजी रात्री ९ वाजता गडकरी स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रराज्य-सरकारच्या नाटचस्पर्धेत रंजनकलामंदिराचे प्रथम क्रमांक मिळालेले श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित 'चंद्र नभीचा ढळला' नाटक सादर करण्यात आले. नाटचप्रयोग फार छान झाला. यावेळी रंजनकलामंदिराने कै. गडकरी स्मारक समितीला रु. १०१ आणि कै. नाना जोग स्मारक निधीला रु. १०१ ची देणगी दिल्याचे जाहीर केले.

दि. २९-१-६१ रोजी भंडारा येथील सर्वोदय कार्यकर्ते श्री. प्र. गो. सेंदुर्णीकर वकील यांचे सायं. ६-३० वाजता 'अश्लीलता आणि समाज जीवन' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थान श्री. रा. कृ. पाटील यांनी मंडित केले होते.

दि. १०–२–६१ रोजी सायं. ७ वाजता दासनवमी निमित्त साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचे धनवटे रंगमंदिरात 'राजगुरु आणि राष्ट्रगुरु श्री रामदास' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

दि. ११–२–६१ रोजी सायं. ६ वाजता न्या. मू. प्र. वा. गजेंद्रगडकर, उच्च न्यायालय नवी दिल्ली (भारत) यांनी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी त्यांना संघकार्यालय आणि रंगमंदिर दाखविण्यात आले. नंतर कै. राम गणेश गडकरी सभागृहात संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. यावेळी चहापानाचा कार्यक्रम झाला. उत्तरादाखल न्या. मू. गजेंद्रगडकर यांनी भाषण केले. यावेळी डॉ. भवानीशंकर नियोगी, न्या. मू. ग. व. वडकस, म. म. डॉ. वा. वि मिराशी, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, श्री. य. गो. मालोदे, श्री. गो. स. देहाडराय श्री. श्री. ग. पांढरीपांडे, कु. ताराबाई प्रधान, श्री. ए. श्री. पटवर्धन, प्रा. पां. कृ. सावळापूरकर आदि मंडळी उपस्थित होती.

नाट्यसमिति – बालनाट्योत्सव: वर्ष २ रे

रविवार दि. १९–२–६१ रोजी वि. सा. संघाच्या नाट्यसमितीच्या वतीने बालनाट्योत्सव बालप्रेक्षकांच्या उपस्थितीत साजरा झाला. या बालनाट्योत्सवात पुढील संस्थांनी भाग घेतला.

१	सी. पी. अँड बेरार हायस्कूल –	'नाटक बसते आहे'
२	कु. नलिनी लोहारकर आणि चमू –	'नारदाची शेंडी'
३	सौ. विशाखा दारव्हेकर आणि चमू –	'दोन आंधळे'
४	सरस्वती कला निकेतन –	'दामू सिनेमात जातो'
५	कलाभारती –	'खरं सांगायचं म्हणजे'
६	सोमलवार हायस्कूल –	'रानफुले'

तसेच नाट्यछटांकरिता पुढील ९ मुलामुलींनी भाग घेतला होता – १ कुमार अरुण सालोडकर, २ कुमार रविंद्र परेतकर, ३ कुमार हरि देवाजी धापोडकर, ४ कु. आशा नवरे, ५ कुमार मुकुंद नवरे, ६ कु. सुमति शेंद्रे, ७ कुमार रंजन दारव्हेकर, ८ कु. उषा लोहारकर, ९ कुमार पद्माकर वैद्य.

हा सर्व कार्यक्रम १ वाजता सुरू होऊन ५ वाजता संपला. परीक्षक मंडळात श्री. शं. बा. शास्त्री, श्री. वसंतराव सबनीस आणि सौ. शकुंतलाबाई खोत हे होते.

नाटकाचे पहिले बक्षिस सोमलवार हायस्कूलच्या बालनटांनी केलेल्या 'रानफुले या नाटिकेस मिळाले. (रु. ५०) दुसरा क्रमांक 'कलाभारती' च्या 'खरं सांगायचं

म्हणजे' या नाटकाला (रु. २०) आणि तिसरे बक्षिस – कु. नलिनी लोहारकर आणि चमूच्या 'नारदाची शेंडी' या नाटिकेस (रु. २०) मिळाले.

दिग्दर्शकाची पारितोषिके १ श्री. पुराणिक (रु. २५) २ श्री. गणेश सोळंकी (रु. १५) आणि ३ कु. नलिनी लोहारकर (रु. १०) यांना देण्यात आली.

अभिनयाची पारितोषिके–

अभिनयासाठी व नाटचछटेसाठीहि प्रत्येकी तीन–तीन पारितोषिके होती. अभिनयात पहिल्या क्रमांकाचे गुण 'नाटक बसते आहे' या नाटकात सहाय्याचे काम करणारा कुमार जयंत पिंगळे (रु. २०) व 'रानफुले' यात वसूचे काम करणारा कुमार सिद्धार्थ शास्त्री (रु. २०) यांना मिळाले. म्हणून या दोघात पहिल्या व दुसऱ्या बक्षिसाची रक्कम एकत्र करून विभागून देण्यात आली. व तिसरे बक्षिस 'नारदाची शेंडी' यात 'पुळह'चे काम करणारा कुमार रंजन दारव्हेकर (रु. १०) याला देण्यात आले.

नाटचछटा स्पर्धेचे पहिले पारितोषिक कु. उषा लोहारकर (रु. १५) इला मिळाले. आणि दुसऱ्या क्रमांकाचे गुण मिळविणारे कु. आशा नवरे व कुमार रंजन दारव्हेकर यांना दुसऱ्या व तिसऱ्या बक्षिसाची एकूण रक्कम रु. १५ विभागून देण्यात आली.

नाटकाचे पहिले बक्षिस आणि अभिनयाचे पहिले बक्षिस म्हणून दोन फिरते करंडक देण्यात आले. नाटकाचा करंडक सोमलवार हायस्कूल आणि अभिनयाचा करंडक कुमार जयंत पिंगळे आणि कुमार सिद्धार्थ शास्त्री यांना देण्यात आला.

या स्पर्धेचा बक्षिससमारंभ नटवर्य श्री. सखारामपंत जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे हे होते.

खोलकुटे ढाल नाटचस्पर्धा–

वि. सा. संघाच्या विद्यमाने विदर्भासाठी दरवर्षी आंतर महाविद्यालयीन खोलकुटे – ढाल नाटचस्पर्धा होत असते. यंदाच्या स्पर्धेत नागपूरच्या मेडिकल कॉलेजने ही ढाल जिंकली. ही ढाल श्री. सखारामपंत जोशी यांचे हस्ते बालनाट्योत्सव प्रसंगी देण्यात आली.

या आंतर महाविद्यालयीन नाटचस्पर्धेत पुरुषपात्राचे अभिनयाचे पहिले बक्षिस यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयाने केलेल्या 'अंमलदार' या नाटकात सर्जेरावाची भूमिका करणारे श्री. ममदानी यांना मिळाले असून स्त्री –

भूमिकेचे पहिले बक्षिस नागपूर महाविद्यालयाने केलेल्या 'खडाष्टक' नाटकात रागिणीची भूमिका करणाऱ्या कु. आशा चाटी यांना मिळाले आहे.

नवीन आजीव सभासद—

प्रा. भा. ल. भांबूरकर	नागपूर	रु. ५१।–
श्री. बा. या. सोलव	नागपूर	रु. ५०।–
सौ. लीलाबाई सोलव	नागपूर	रु. ५०।–

वरील सद्गृहस्थ वि. सा. संघाचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

वर्धापनदिन महोत्सवाचे कार्यक्रम

३८ वर्षांपूर्वी मकरसंक्रांतीचे सुमुहूर्तावर अमरावती येथे कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे यांनी विदर्भ साहित्य संघाची स्थापना केली. तेव्हापासून यंदा प्रथमच हा दिवस वर्धापनदिन म्हणून साजरा करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रस्थानी व निरनिराळ्या शाखांचे ठिकाणी स्थानिक संमेलनाच्या स्वरूपात हा उत्सव करण्यात आला. नागपूर येथे दिनांक १४ व १५ जानेवारी रोजी पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमांसाठी संघसंस्थापक कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे मुद्दाम उपस्थित होते.

सरस्वतीपूजन ग्रंथप्रदर्शन व वृक्षारोपण—

शनिवार दि. १४ जानेवारी सकाळी ८–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या हस्ते सनई वादनाच्या मंजुळ निनादात सरस्वतीपूजन होऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी श्री. शेंडे व प्रा. खापर्डे यांची उद्बोधक भाषणे झाली. त्याचवेळी १९६० साली प्रकाशित झालेल्या ग्रंथांचे प्रदर्शन गडकरी सभागृहात भरविण्यात आले होते. राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाचे कार्यकर्ते श्री. गो. स. देहाडराय, श्री. दि. के. मनोहर, श्री. अ. ल. लिमये, श्री. ह. मा. उपाध्ये, श्री. काळे, श्री. वसंत खेडीकर, श्री. मनोहर पंडे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्रदर्शनात ठेवण्यासाठी वि. सा. संघ, मॉडर्न बुकडेपो, डेनेट कंपनी, नागपूर प्रकाशन, ठाकूर आणि कंपनी, केंद्रीय ग्रंथालय, नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, शासकीय माहिती केंद्र, सेवाविनिमय केंद्र, प्रा. डॉ. चान्सरकर व राजाराम वाचनालय यांचेकडील एकंदर ३७० ग्रंथ या प्रदर्शनात ठेवण्यात आले. गेल्या वर्षातील प्रकाशित ग्रंथांचे दर्शन घडविण्याचा हा उपक्रम अत्यंत अभिनंदनीय होता.

ग्रंथप्रदर्शनानंतर रंगमंदिराच्या प्रवेशद्वारासमोर संस्थापक प्रा. अण्णासाहेब खापर्डे व संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या हस्ते दोन विद्या-वृक्षांचे रोपण करण्यात आले. शेवटी तिळगुळ वितरण होऊन हा कार्यक्रम संपला.

उपकुलगुरु न्या. मू. श्री. ग. ब. बडकस याचे हस्ते उद्‌घाटन—

दि. १४ जानेवारीला रात्री ८-३० वाजता नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु न्या. मू. श्री. ग. ब. बडकस यांचे हस्ते वर्धापनदिन महोत्सवाचे रीतसर उद्‌घाटन झाले. सुरुवातीला श्री. सप्रे यानी "या कुंदेंदु तुषारहारधवला" हा श्लोक गाइल्यावर रंजनकला मंदिराच्या कलावंतांनी सांघिक रीतीने सरस्वतीस्तवन व महाराष्ट्र गीत यांचे गायन केले. श्री. ना. रा. शेंडे यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर कविभूषण श्री. खापर्डे यांनी वि. सा. संघाची निर्मिति कशी झाली याची अत्यंत हृदयंगम शब्दात माहिती दिली. ते म्हणाले, '१९२३ साली विदर्भात साहित्याचे व संस्कृतीचे कार्य करणारी संस्था असावी म्हणून विदर्भातील सर्व साहित्यिकांना पत्रे पाठविली व कै. श्री. कृ कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले अधिवेशन आयोजित करण्यात आले व त्यात वि. सा. संघाच्या स्थापनेच्या निर्णय घेण्यात आला. विदर्भ साहित्य संघाचे नाव देखील विचारपूर्वक ठेवण्यात आले. "विदर्भ' या नांवाचा प्रदेशाशी तसेच साहित्याशी निकटचा संबंध आहे. "साहित्य" या शब्दाने कार्य व्यक्त झाले आहे. आणि "संघ" या शब्दाला बौद्ध कालापासून एकतेचा व पावित्र्याचा अर्थ प्राप्त झाला आहे. त्यामुळे हे शब्द निवडण्यात आले. कित्येक वर्षे मी एकटाच विदर्भ साहित्य संघाचे कार्य सांभाळित होतो. मी बनारसला गेल्यावर संघ जवळजवळ बंद पडला. परंतु पुढे अनेकांनी उर्जितावस्थेत आणला आणि मूळ ठरलेल्या ध्येयधोरणाप्रमाणेच संघ आज अत्यंत व्यापक प्रमाणावर कार्य करीत आहे याचा मला अतिशय आनंद होतो. गूढवाढी साहित्य हे विदर्भाचे वैशिष्ट्य आहे; त्याची जोपासना संघाने करावी. आजचा दिवस संघाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. तर माझ्या आयुष्यात रत्नांनी लिहिण्यासारखा आहे,' अशा भावनापूर्ण शब्दात प्रा. खापर्डे यांनी भाषण संपविले. त्यानंतर उपकुलगुरु श्री. ग. ब. बडकस यांनी भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी विदर्भ साहित्य संघाच्या कार्याची प्रशंसा केली व यावच्चंद्रदिवाकरौ संघाचा उत्कर्ष होत राहो, असा आशीर्वाद देऊन महोत्सवाचे उद्‌घाटन केल्याचे जाहीर केले. याचवेळी श्री. ना. रा. शेंडे लिखित "डोंगरमाथ्यावरील दिवा" या कथासंग्रहाचे न्या. मू. बडकस यांनी प्रकाशन केले. शेवटी प्रा. श्री. गो. काशीकर सरचिटणीस यांनी आभार मानल्यावर उद्‌घाटनाचा कार्यक्रम संपला.

संतवाणी–

उद्‌घाटनानंतर लगेच "संतवाणी" नामक संगीत सभेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला श्री. सु. द. देशपांडे यांनी बसविलेले व कु. मोहनी भगिनी आणि चमू यांनी सादर केलेले संतवाणीचे रोचक समूहगान झाले. त्यानंतर ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, गोराकुंभार, चोखामेळा, सोहिरा, सेना न्हावी, कान्होपात्रा, नरहरी सोनार, भानुदास, एकनाथ, तुकाराम व रामदास या संतांचे प्रसिद्ध अभंग रागदारीच्या पद्धतीने गाइले गेले. संतांचा क्रम जसा त्यांच्या काळानुसार ठरविण्यात आला त्याचप्रमाणे राग देखील कल्याण पासून भैरवीपर्यंत कालक्रमानुसार जुळविण्यात आले होते; हे या कार्यक्रमाचे वैशिष्टच म्हटले पाहिजे. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अ. के. कोकजे यांनी अत्यंत कुशलतापूर्वक केले होते. या कार्यक्रमात श्री. रामभाऊ फाटक, श्रीमती कुसूम चाफळे, सौ. उषा वडोदकर, श्री. वसंत अंधारे, प्रा. अ. के. कोकजे, श्री. गोपाळ कौशिक, श्रीधर कोठेकर व श्री. शरद् सुतवणे या नामवंत कलावतांनी भाग घेतला. वाद्यांची साथ श्री. बबनराव आठल्ये, श्री. शंकरराव पोपटकर, श्री. प्रल्हादराव भजनी, श्री. दत्तोपंत देव, श्री. कमलेश आगरकर व श्री. वडसमुद्रकर यांनी केली. पार्श्वकथन श्री. अनंतराव गोगटे यांनी लिहिले. व श्री. आ. बा. देशपांडे (आकाशानंद) यांनी ते सादर केले. संगीत सभेचा हा कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट झाला. हा कार्यक्रम नागपूर आकाशवाणीने सादर करावा इतका तो बहारदार झाला.

माझ्या साहित्यिक जीवनातील रोचक घटना–

रविवार दि. १५ जानेवारी रोजी सकाळी ८–३० वाजता "माझ्या साहित्यिक जीवनातील रोचक घटना" हा साहित्यगोष्टींचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विदर्भ साहित्य संघाच्या प्रारंभापासून वि. सा. संघाचे कार्यकर्ते असलेले सुप्रसिद्ध संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांनी मंडित केले होते.

या कार्यक्रमात सर्वश्री डॉ. य. खु. देशपांडे, कविभूषण प्रा. खापर्डे, वा. रा. पाठक, वसंतराव सबनीस, वा. कृ. भावे, वसंतराव वरखेडकर, शरद मुठे, ज. रा. जोशी, लक्ष्मणराव नवरे, प्र. दे. कोलते, डॉ. ना. भा. खरे, श्री. गो. काशीकर म. वि. लिमये, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, ल. रा. कुळकर्णी आणि सौ. शांताबाई दांडिगे यांनी भाग घेतला व आपापल्या साहित्यिक जीवनातील रोचक घटनांचे हृदयंगम रीतीने वर्णन केले. डॉ. य. खु. देशपांडे यांनी सांगितले की, ते तरुण असतांना त्यांनी गणपतीसंबंधी एक छोटासा लेख लिहिला. त्यावरून ज्ञानकोष लिहिण्याची कल्पना डॉ. श्री. त्र्यं. केतकर यांना सुचली, असे त्यांनीच एका

अनुक्रमणिका

मुलाखतीत सांगितले. आपल्या साध्या पोषाखामुळे आपण वऱ्हाडचे अशिक्षित पटवारी असू, अशी अनेकांची समजूत होऊन कसे मजेदार प्रसंग उद्भवले, त्याचेहि त्यांनी मजेदार वर्णन केले. कविभूषण प्रा. खापर्डे आपल्या भाषणात म्हणाले की, ते २४ वर्षांचे असतांना त्यांनी गडकऱ्यांच्या एका कवितेला उत्तर देणारी एक तुऱ्याची कविता लिहिली. ती त्यावेळच्या प्रसिद्ध मासिकांनी परत पाठविली. परंतु स्वतः गडकऱ्यांना ती फार आवडली. व त्यातूनच पुढे दिवाकर, ह. ना. आपटे इत्यादि साहित्यिकांच्या ओळखी झाल्या. तसेच बनारसला पर्यवेक्षकाचे कार्य शांतपणे करीत असताना मी कवि असलो पाहिजे अशी एका परीक्षार्थ्याची कल्पना झाली. व ती त्याने प्रसिद्ध हिंदी कथालेखक श्री. वाचस्पति पाठक यांचेजवळ बोलून दाखविली. त्यामुळे मोठमोठ्या हिंदी साहित्यिकांचा परिचय झाला व बनारसच्या हिंदी साहित्य गोष्टीच्या अध्यक्षपदाचा मानहि मिळाला. श्री. वा. रा. पाठक यांनी सांगितले की, आपली विदर्भगीत नावाची कविता कविभूषण खापर्डे यांना आवडली. परंतु त्यात राजकारण नसूनहि त्यात राजकारण आहे असे समजून मासिकांनी ती छापली नाही. श्री. वसंतराव सबनीस यांनी अशी आठवण सांगितली की, ते एका मासिकाचे सहसंपादक असतांना ध्वजदिनानिमित्त त्यांनी ध्वजाच्या चित्राखाली दोन ओळींची कविता छापली. ती न वाचताच अव्यपारेषुव्यापार केल्याबद्दल मासिकाचे मुख्यसंपादक सुरुवातीला रागावले. परंतु त्या ओळींची अनेक वाचकांकडून स्तुति झाल्याबरोबर त्यांनीहि स्तुति केली. श्री. वा. कृ. भावे यांनी सांगितले की, एकदा अमळनेरचे त्याकाळचे एक प्रमुख पुढारी श्री. विष्णु काशिनाथ भागवत यांना मेळ्यातील पद्ये वाचून दाखविली. कारण ती मेळ्यातील पद्ये स्वदेशी, बहिष्कार, स्वातंत्र्याविषयीं कळकळ इ. विषयांवर लिहिली होती. १९०८ साली लो. टिळकांना शिक्षा झाली होती. त्यामुळे फौजदाराने पद्ये वाचावयास मागविली. म्हणून दुसऱ्या एका वहीत श्री. भागवतांच्या सूचनेनुसार लिहून काढली. परंतु आयत्यावेळी देशभक्तिपर कवनांची वही बरोबर नेल्यामुळे वही केवळ समोर ठेवून स्मरणातून सात्विक गीते म्हणून प्रसंग निभवावा लागला. अशा तऱ्हेने त्यातून निभावलो गेलो. श्री. वसंतराव वरखेडकर यांनी सांगितले की, आपल्या जन्माचे वेळी भाद्रपदात खूप ढग, गडगडाट, विजांचा कल्लोळ झाला होता. असा कल्लोळ जेव्हाजेव्हा आकाशात होतो तेव्हातेव्हा आपण बेभान होतो व आपले बहुतेक लिखाणहि अशाचवेळी निर्माण झाले आहे.

श्री. शरद् मुठे यांनी 'नका हो तुडवू ही सुमने' ह्या काव्याबद्दलची आपली रोचक आठवण सांगितली. श्री. ज. रा. जोशी यांनी नटवर्य कोल्हटकरांनी आपल्या पुस्तकाची कशी तारीफ केली व महाराष्ट्र वृत्तपत्रात काम करीत असतांना सकाळी ४–४५ वाजता आलेली जिनाच्या मृत्यूची बातमी लगेच

छापण्याची व्यवस्था करून आपण कशी वाहवा मिळवली याची माहिती सांगितली. श्री. लक्ष्मणराव नवरे यांनी आपल्या दोन कल्पित कथांच्यामधली नावे व प्रसंग हुबेहूब जुळून धुळचाच्या एका स्त्रीने व दुसऱ्या ठिकाणच्या एका श्रीमंताने अब्रु-नुकसानीबद्दल कशा तक्रारी केल्या याची अतिशय रोचक माहिती सांगितली. श्री. प्र. दे. कोलते यांनी आपले लिखाण बहुजन व अल्पजन असा भेद न करता कसे लिहिले जाते याची माहिती दिली. डॉ. ना. भा. खरे यांनी सांगितले की, त्यांच्या आत्मचरित्राच्या हिंदी व मराठी ग्रंथांना प्रकाशक स्वयंस्फूर्तीने मिळाले. परंतु इंग्रजी ग्रंथाकरिता, यात विद्यमान शासनाविरुद्ध वर्णन आहे म्हणून, मोठमोठ्या परदेशीय प्रकाशन संस्था देखील तयार झाल्या नाहीत. त्यामुळे त्याच्या प्रकाशनाचा खर्च आपणासच करावा लागला.

प्रस्तुत साहित्य गोष्टीच्या कार्यक्रमाला अतिशय रंग भरत गेला. सकाळचा वेळ अपुरा पडल्यामुळे दुपारी ४–३० वाजता पुन्हा पुढे चालू झाला. यावेळी प्रा. श्री. गो. काशीकर यांनी माहिती दिली की, १९५० साली पंजाबात व इतरत्र साम्यवादाचा बराच जोर वाढला असतांना आपण साम्यवादावर एक प्रदीर्घ लेख लिहिला. तो न वाचताच फार लांब आहे म्हणून एका वृत्तपत्राने परत पाठविला. पुढे त्यात काटछाट केल्यावर छापतेवेळी संपादकांच्या तो वाचण्यात आला व त्यांनी संपूर्ण मूळ लेख दोन अंकामधून प्रसिद्ध केला. हा लेख पुढे मराठी इंग्रजी व उर्दू भाषांमधून नागपूर, मुंबई, दिल्ली, जालंदर, अंबाला व लखनौ येथील वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केला, व त्याच्या इंग्रजी व हिंदीमध्ये दहा हजार प्रतींच्या पुस्तिका एकूण निघून त्या १–२ महिन्यातच खपल्या. या लिखाणामुळे पंजाबात सर्व प्रमुख गावी महाविद्यालयात त्यांच्या व्याख्यानाचा दौरा आयोजित करण्यात आला. आपल्या लिखाणामुळे आपण वयोवृद्ध गृहस्थ असू अशी कित्येकांची कशी समजूत होते व प्रत्यक्ष भेट झाली म्हणजे कसे मजेदार प्रसंग येतात याचीहि त्यांनी माहिती सांगितली. श्री. स. वि. लिमये यांनी निरनिराळ्या साहित्यिकांच्या सहवासातून आपणांस लेखनाची कशी स्फूर्ति मिळत गेली व त्यागात हिंदुत्व आहे, व 'पं. नेहरूंची अस्मिता' या पुस्तिकांचे लेखन आपले हातून कसे झाले याची माहिती दिली. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी सांगितले की, पुसद येथील विदर्भ साहित्य संमेलनात आपल्या वैदर्भीय रीतीवरील निबंधाचे जे कौतुक झाले त्यामुळेच आपल्या साहित्यिक जीवनाला प्रारंभ झाला. "भारतीय साहित्य-शास्त्रा" संबंधी आपण काही वर्षांपूर्वी एक लहानसा लेख लिहिला होता तो कोणालाच आवडला नाही. व तो सर्व मासिकांनी परत केला. परंतु त्याच विषयाचा विस्तार करून त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाची आज देशभर स्तुति होत आहे, अशी रोचक माहिती त्यांनी दिली. आपण नवीन सांगतो त्यावेळी

त्यात नवीन काही नसतं आणि नवीन काही नाही अशा समजुतीनं लिहितो त्यावेळी त्यातूनच नवीन निघतं; असा आपला अनुभवहि त्यांनी उदाहरणांनी स्पष्ट केला, सौ. शांताबाई दंडिगे यांनी सांगितले की, अपत्यांच्या जन्माबरोरच त्यांच्या कवितांचा जन्म झाला. त्यांच्या साहित्यसेवेला घरात पुष्कळ विरोध झाल्यामुळे त्या विरोधातून त्याचा विकास झाला व सौभाग्यचिन्ह असलेल्या नथेप्रमाणे त्यांनी आपल्या साहित्याची जोपासना केली, अशी माहिती त्यांनी दिली. श्री. ल. रा. कुळकर्णी यांनी सांगितले की, संस्कृत व्याकरणात पाणिनीने भूतकाळाचे सात प्रकार सांगितले, हे प्रकार कसे होतात हे त्यांनी विद्यार्थी असताना शोधून काढले व त्याबद्दल त्यांचे मोठमोठ्या विद्वानांनी कौतुक केले.

शेवटी अध्यक्ष डॉ. य. खु. देशपांडे यांनी समारोप केला. रोचक घटनांचा हा कार्यक्रम खरोखरच इतका रोचक झाला की या आठवणी पुस्तकरूपाने प्रकाशित कराव्यात अशी डॉ. य. खु. देशपांडे यांनी सूचना केली.

प्रीति–भोजन

रविवार दि. १५ रोजी दुपारी १२ वाजता प्रीति–भोजनाचा कार्यक्रम झाला. विदर्भ साहित्य संघाच्या आजवरच्या जीवनात असा कार्यक्रम पहिल्यांदाच घेण्यात आला होता. रंगमंदिरासमोरील भव्य शामियान्यात भोजनाची व्यवस्था उत्कृष्टपणे करण्यात आली होती. या कार्यक्रमात जवळजवळ दोनशे साहित्यिक व साहित्यप्रेमी लोकांनी भाग घेतला. काव्यशास्त्रविनोदात पक्वान्नाचे भोजन अत्यंत रुचकर झाले.

कविसंमेलन व विविध सांस्कृतिक कार्यक्रम

रात्रौ ८–३० वाजता कविसंमेलन व विविधसांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. प्रारंभी श्री. गोपाळ कौशिक आणि चमू यांनी "जयमहाराष्ट्र हा गर्जा जयजयकार" हे समूहगीत सादर केले. त्यानंतर कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली कविसंमेलनास सुरुवात झाली. कविसंमेलनात प्रा. खापर्डे, प्रा. भ. श्री. पंडित, सौ. उषाताई लिमये, श्री. बाबुराव कात्यायन, सौ. प्रमिलाबाई भागवत, श्री. वसंतराव सबनीस व सौ. शांताबाई दंडिगे यांनी भाग घेतला. प्रत्येकाने हास्य व करुण या दोन रसातीलच कविता म्हणून दाखविल्या हे या कविसंमेलनाचे वैशिष्ट्य होय. श्री. वसंतराव सबनीस यांच्या "कवि संमेलन" या कवितेने खूपच बहार केली. यानंतर प्रा. सौ. ताराबाई शास्त्री यांनी दिग्दर्शित केलेल्या 'विदर्भ–नारी–दर्शन' हा मूकनाटयाचा कार्यक्रम झाला. यात लोपामुद्रा, इंदुमति, दमयंति, रुक्मिणी, मालविका, जिजाबाई या विदर्भ कन्यांचे

विलोभनीय दर्शन घडविण्यात आले. त्यानंतर एकनाथी भारुडाचा आकर्षक कार्यक्रम सादर करण्यात आला. नंतर कु. मीरा साठे यांनी भाऊबंदकी नाटकातील आनंदीबाईची भूमिका उत्तम रीतीने सादर केली. श्री. शरद् मुठे आणि चमू यांनी शाहिरी कवनप्रकार नावाचा एक उत्तम संगीत कार्यक्रम सादर केला. मग पोवाडा, फटका, लावणी, गवळण व सवालजबाब इत्यादि शाहिरी कवनांची प्रात्यक्षिके अभिनयासहित दाखविली. कु. शोभा कानडे यांचे भक्तिगीत आणि श्री. गणपतराव आणि साथी या ग्रामीण कलाकारांचा वाघ्यामुरळीचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रा. सौ. ताराबाई शास्त्री यांनी सादर केलेला झिम्मा हा कार्यक्रम होऊन दोन दिवसांच्या वर्धापनदिन महोत्सवाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

संमेलनाच्या स्वरूपात झालेल्या या कार्यक्रमांनी विदर्भ साहित्य संघाच्या वार्षिक कार्यक्रमात एका नवीन कार्यक्रमाची भर घातली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वि. सा. संघाच्या सर्व लहान–थोर कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनत घेतली.

शाखावृत्त

गोंडवण शाखा चंद्रपूर– भेटी व व्याख्याने–

दि. २८ डिसेंबर ६० ला पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. प्र. न. जोशी एम. ए., पीएच्. डी. यांचे "महाराष्ट्रीय संतांचा समतावाद" या विषयावर व्याख्यान झाले.

महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री माननीय श्री. त्र्यं. शि. ऊर्फ बाळासाहेब भारदे यांचे दि. १७–१–६१ ला 'गांधीमार्ग' या विषयावर भाषण आणि दि. १८–१–६१ ला श्री ज्ञानेश्वरांच्या–

'हे समस्तहीं श्रीवासुदेव। ऐसा प्रतीतिरसाचा ओतला भाव।
म्हणोनि भक्तांमाजी राव। आणि ज्ञानिया तोचि॥ (अ. ७)

या ओवीवर रसाळ प्रवचन झाले.

कै. राम गणेश गडकरी यांचा ४२ वा स्मृतिदिन

कै. रा. ग. गडकरी यांचा ४२ वा स्मृतिदिन सुप्रसिद्ध कवि प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली दि. २३–१–६१ रोजी साजरा करण्यात आला. 'गडकऱ्यांचे काव्य' या विषयावर प्रा. पंडित यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

याववेळी सा. भू. तु. ना. काटकर यांच्या 'शब्दसृष्टि' कविता संग्रहाचे प्रकाशन त्यांचेच हस्ते झाले. कवितासंग्रहासंबंधी श्री. बाबूराव चंदावार, श्री. पु. ह. धनकर आणि आचार्य पुल्लीवार यांची परिचयात्मक भाषणे झाली. समारंभासाठी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे आणि सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांचे शुभसंदेश आले होते.

नागपूरच्या जीवनविकास मासिकाचे संपादक स्वामीशिवतत्वानंद यांची दि. ४ व ५ फेब्रुवारी ६१ रोजी अनुक्रमे 'महर्षि वाल्मिकींचे रामायण' व 'श्री ज्ञानेश्वर' या विषयांवर भाषणे झाली.

वर्धा शाखा–

दि. ९–११–६० रोजी सायं. ६–३० वा. श्री. वामनराव घोरपडे यांचे अध्यक्षतेखाली कै. केशवसुत स्मृतिदिनाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. जावडेकर यांचे केशवसुतांच्या जीवनावर आणि काव्यावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

दि. १०–१२–६० ला सायं. ६–३० वा. न्यूइंग्लिश हायस्कूलच्या प्रांगणांत आचार्य अत्रे यांचे 'मराठी साहित्यातील विनोद' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले.

दि. २६–१२–६० रोजी प्रा. डॉ. प्र. न. जोशी पुणे यांचा वर्धा शाखेतर्फे सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. जोशी यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून लहानसे भाषण केले आणि अमेरिकेतील शिक्षण पद्धतीची माहिती निवेदन केली.

वि. सा. संघाच्या वर्धा शाखेतर्फे वर्धापनदिन कार्यक्रम–

वि. सा. संघाच्या वर्धा शाखेतर्फे ३८ वा वर्धापन–दिन साजरा करण्यात आला. दि. १६–१–६१ रोजी सायं. ६–३० वा. गांधी ज्ञानमंदिरात माननीय श्री. बाळासाहेब भारदे, सहकारमंत्री (महाराष्ट्रराज्य) यांचे 'ज्ञानोबा ते विनोबा' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

दि. १७–१–६१ रोजी स्वावलंबी डिप्. टी. कॉलेजमध्ये श्री. वि. ना. समुद्र, सेवानिवृत्त सि. जज्ज यांचे 'थिऑसफी व हिंदुधर्म' या विषयांवर भाषण झाले.

तळोधी शाखा: वर्धापनदिन कार्यक्रम–

तळोधी शाखेच्या वतीने वर्धापनदिनाचा कार्यक्रम रात्री ८–३० वाजता

आमदार श्री. गोविंदरावजी मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी कविसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन त्यात सर्वश्री मो. गो. शेंडे, प्र. ग. तल्हारवार, स. श्रा. खोबरागडे, कृ. स. लाडसे, अ. रज्जाक कुरेशी आणि र. ना गजभे यांनी भाग घेतला होता. प्रत्येकाने आपल्या दोन–दोन कविता म्हणून दाखविल्या.

सुरुवातीस श्री. मेश्राम यांनी वर्धापनदिनाची माहिती निवेदन केली. या कविसंमेनात श्री. लाडसे यांची 'समाजास कीड' या नावाची कविता उत्कृष्ट वाटल्यामुळे श्री. दिवाकर पोशट्टीवार यांनी ५ रु. ची देणगी श्री. लाडसे यांना दिली.

या कार्यक्रमात स्टेज़व्यवस्था श्री. बाबुरावजी पोकमोडे आणि भागवतवार पाटील, इलेक्ट्रिक व्यवस्था श्री. वामनराव पोकमोडे, लाऊडस्पीकरची व्यवस्था श्री. लिखितराव खोबरागडे यांनी केली होती.

दि. २६ जानेवारी रोजी शाखेच्या विद्यमाने प्रजासत्ताक दिनानिमित्त शाखाध्यक्ष श्री. गोविंदरावजी मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली रात्रौ ८–३० वाजता कविसंमेलन झाले. या कविसंमेलनात सर्वश्री चांदमिया, कृ. स. लाडसे, प्र. ग. तल्हारवार, र. ना. गजभे, अ. रज्जाक कुरेशी, स. श्रा. खोबरागडे, पां. सि. बोबिलवार आणि प्र. डो. दहीकर इत्यादि कवींनी भाग घेतला.

यावेळी कवि श्री. कृष्णा लाडसे यांचा सत्कार करण्यात येऊन शाखेतर्फे त्यांना श्रीफळ अर्पण करण्यात आले. तळोधी येथील एक नागरिक श्री. नामदेवराव वानखेडे यांनी त्यांना ५१ रुपयांची थैली अर्पण केली. शेवटी श्री. बोंदरुजी कामडे यांचे हस्ते प्रत्येक कवीला पदक अर्पण करण्यात आहे.

भंडारा शाखा–

भंडारा शाखेने गणेशपूर येथील शेषाश्रमात वि. सा. संघाचा ३८ वा वर्धापनदिन साजरा केला. समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. ना. आ. ऋषी यांनी भूषविले होते. प्रथमतः श्रीशेषाच्या छायाचित्रास पुष्पमाला अर्पण केल्यावर अध्यक्षांचे स्वागतानंतर कु. पूर्णाताई बोरकर यांनी आपल्या भाषणात वि. सा. संघाचे अभीष्ट चिंतिले. सरचिटणीस कु. सुगंधा शेंडे यांनी भंडारा शाखेच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानले. चिटणीस सौ. प्रभावती गजभीये आणि सौ. कमलाबाई जोव यांनी सर्वांना संक्रांतीचा तिळगूळ व अल्पोपहार दिला. पानसुपारी नंतर हा समारंभ आटोपला.

अनुक्रमणिका

दि. ७–२–१९६१ रोजी ह. भ. प. भीमरावशास्त्री पारळकर यांनी श्री शेषाश्रमाला भेट देऊन सुश्राव्य व्याख्यान दिले.

गोंदिया शाखा–

भवभूति – स्मारकाच्या मदतीकरिता दि. ५–११–६० रोजी मुंबईच्या कलाकारांचे 'लग्नाची बेडी' हे नाटक झाले. खर्च वजा जाता ३००० रु. स्मारक-निधीला मिळाले.

श्री. पु. य. ऊर्फ बाबासाहेब देशपांडे यांची दि. १६–१७ आणि १८ डिसेंबर ६० ला टिळकयुग, गांधीयुग आणि नेहरूयुग या विषयावर तीन व्याख्याने झाली. या व्याख्यानांना तिकिटे ठेवण्यात आली होती. या व्याख्यानाचे वेळी श्री. चतुर्भुजभाई जसानी, (भूतपूर्व संसद सदस्य) आणि अॅडव्होकेट श्री. वि. अ. लिमये यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते.

यवतमाळ शाखा–

जानेवारी महिन्यात 'दुःखांतिका' आनंद का देतात' या विषयावर प्राचार्य ना. वा. पराडकर यांचे भाषण झाले.

कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिनानिमित्त परिसंवाद

विषय	वक्ते
१. गडकऱ्यांचे काव्य	प्रा. शरद् कळणावत
२. गडकऱ्यांचे प्रेमसंन्यास	प्रा. कु. माणिक वोधनकर
३. गडकऱ्यांचे यशोवीज	प्रा. काशीकर
४. मराठीची विनोदपरंपरा व गडकरी	प्रा. राम डोके

श्री. अप्रबुद्ध पाळेकर यांची व्याख्यानमाला

दि. २४, २५ आणि २७ जानेवारी ६१ रोजी 'आजचा प्रश्न' या विषयावर श्री. अप्रबुद्ध यांची विद्वताप्रचुर व्याख्याने झाली.

संलग्न संस्थांचे कार्य :–

रंजन कलामंदिर, नागपूर. :–महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे आयोजित प्रथम

नाटचमहोत्सवात संस्थेने यावर्षी भाग घेतला. दि. १२ नोव्हें. ६० रोजी "चंद्र नभीचा ढळला" या नाटकाचा प्रथम प्रयोग विदर्भ प्रादेशिक स्पर्धेत वि. सा. संघ, धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात येऊन या प्रादेशिक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे रु. ५०० चे परितोषिक मिळविले. तसेच श्री. गणेश सोळंकी, कु. नलिनी शर्मा यांनी अभिनयाची रौप्यपदके व कु. आशा दातार यांनी प्रशस्तिपत्रक मिळविले.

या एकाच नाटचप्रयोगाची निवड अंतिम स्पर्धेकरिता होऊन रंगभवन धोबीतलाव, मुंबई येथे "चंद्र नभीचा ढळला." या नाटकाचा प्रयोग दि. २८–१२–६० ला सादर करण्यात आला आणि या अंतिम फेरीतही रु. २००० चे प्रथम परितोषिक मिळवून संस्थेने या वर्षीच्या नाटचमहोत्सवातील सुवर्ण कळस गाठला. याशिवाय या नाटकाचे लेखक व दिग्दर्शक श्री पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी लेखकाचे १५० रु. चे प्रथम परितोषिक व दिग्दर्शनाचे रु. २५० चे द्वितीय पारितोषिक; उत्कृष्ट अभिनयाबद्दल श्री राजा पाठक, श्री गणेश सोळंकी व कु. नलिनी शर्मा यांनी प्रत्येकी रु. १०१ व रौप्यपदक प्राप्त केले.

या वर्षी वि. सा. संघाच्या नाटचसमितीतर्फे आयोजित द्वितीय बालनाटचोत्सवात रंजन कलामंदिरातर्फे "उत्कृष्ट नाटचप्रयोग" व "उत्कृष्ट अभिनय" याकरिता दोन फिरते रौप्यचपक ठेवण्यांत आले. आणि नाटचोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाला यामुळे आगळीच शोभा आली.

★ ★ ★

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पै.
★ १ निबंध परिमल		२–२[illegible]
२ सुमन संचय		१–२५
+ ३ मराठी गद्य		१–५८
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२–००
५ भारती (नाटक) नाना जोग		१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे		०–७५
७ कै. हरीभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २ रा		३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ)	ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
९ ,,	(केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र	—ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	—कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूरकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक—वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन यांचेकडे आहेत.
+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.
बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

Statement about ownership and other particulars about newspaper (Yugwani) to be published in the first issue every year after the last day of February.

FROM IV

(See Rule 8)

1. Place of Publication :	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur–1
2. Periodicity of its Publication	Monthly.
3. Printer's Name	Shri Murlidhar Gandhe,
Nationality	Indian
Address	Manager, Pradeep Mudranalaya Dharampeth Nagpur–1
4. Publisher's Name	Shri Purushottam Diwakar Dhawale
Nationality	Indian
Address	Vice-President, Vidarbha Sahitya Sangh, Nagpur–1
Editor's Name	Shri P. Y. Deshpande
Nationality	Indian
Address	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur–1
Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital.	Vidarbha Sahitya Sangh Nagpur–1

I, **P. D. Dhawale** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dated 25–2–61 **S/d. P. D. Dhawale.**


" युगवाणी " (Yugwani) Regd. No. N 356

सौ. सुशीलाबाई दळवी यांनी म. ज्योतिबा फुले सेवामंडळ नागपूर तर्फे
विदर्भ साहित्य संघास सन्मानपूर्वक भेट दिलेल्या—

म. ज्योतिबा फुले तैलचित्राचे अनावरण

दि. १८ जानेवारी १९६१

हस्ते:- माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण छायाचित्राचे अनावरण
करीत असतांना. संघाध्यक्ष, श्री. ना. रा. शेंडे
आणि चिटणीस, श्री. य. गो. मालोदे

हे मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

★
★ ★

१९५९–६०



श्री. ना. रा. शेंडे, अध्यक्ष,
विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन २२ वे – सावरगावडुकरे

अमेरिकन कलापथकाचे विमानतळावर विदर्भ साहित्य संघातर्फे स्वागत



अमेरिकन डान्स ज्युबिली पथक दिनांक २६-११-५९ रोजी नागपूर विमानतळावर उतरले त्यावेळचे छायाचित्र.
मध्यभागी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व दोन्ही बाजूंना रॉड अलेक्झांडर व जॅमसे डी लापे आणि उजवीकडील टोकास सरचिटणीस प्रा. श्री गो. काशीकर व डावीकडील टोकास चिटणीस श्री. य. गो. मालोदे उभे आहेत.



ब्रिटिश कंपनी आणि वि. सा. संघाच्यावतीने धनवटे रंगमंदिरात झालेल्या "मॅन ऑफ डेस्टिनी" या नाटकातील एक छायाचित्र.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
१९५९-६० चे वार्षिक कार्यवृत्त

प्रास्ताविक–

घटनेप्रमाणे विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९५९ पासून सुरू झाले. १९५९ ते १९६२ या काळाकरिता नवीन निवडून आलेल्या केन्द्रीय कार्यकारी मंडळाचे संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांना पूर्वाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी दि. १ एप्रिल १९५९ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत संघाध्यक्ष पदाचा कार्यभार प्रदान केला.

१९५९ ते ६२ या तीन वर्षांच्या कार्याच्या दृष्टीने निरनिराळया समित्यांची निवड यापूर्वीच म्हणजे दिनांक ८–३–१९५९ रोजी भरलेल्या कार्यकारिणीच्या सभेत करण्यात आली होती.

ह्यावर्षी साधारण सभेच्या दोन आणि केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या सहा सभा झाल्या.

विशेष उल्लेखनीय कार्य–

१९५९–६० मधील विशेष कार्य म्हणून पुढील कार्याचा उल्लेख करता येईल.

"श्री वेंहेरे व्याख्यानमाला" आणि "श्री गणेश व्याख्यानमाला" ह्या दोन व्याख्यानमाला यंदा सुरू करण्यात आल्या. ह्याकरिता अनुक्रमे बेंहेरे कुटुंबियांनी व एका अनामिक भगिनीने प्रत्येकी रु. ६००० ची देणगी देऊन वि. सा. संघास उपकृत केले आहे. तसेच, वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे या संस्थेच्या वतीने "आंतर-महाविद्यालयीन कै. न्या. मू. रानडे वादस्पर्धा" आयोजित करण्यात आली. यु. एस्. आय्. एस् या संस्थेतर्फे "डान्स ज्युबिली" चा कार्यक्रम आणि ब्रिटिश कौन्सिलच्या ("प्ले हाऊस") नाटक कंपनीच्या वतीने पाश्चात्य नाटककाराच्या नाटकांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. नागपुरातील हौशी कलावंतांनी निर्माण केलेली "रंजन कला मंदिर" ही संस्था वि. सा. संघाची संलग्न संस्था झाली. वि. सा. संघाच्या नाट्यसमितीच्या वतीने "बाल नाट्योत्सवाचा" अभिनव कार्यक्रम करण्यात आला. तसेच नाट्य–शिक्षणाचे शिबिरहि चालविण्यात आले. ह्यावर्षी विदर्भ साहित्य संघाच्या इमारतीचे दर्शनी भागाचे प्लास्टरिंगचे काम पूर्ण करण्यात आले.

ह्यावर्षी अकोला, सावरगावडुकरे या गावी वि. सा. संघाच्या नवीन शाखा स्थापन करण्यात आल्या.

सभासद–

चालू वर्षी वि. सा. संघाचे एकूण १०४३ सभासद होते. त्यात एकूण १७५ आजीव सभासद असून त्यापैकी ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक आणि ४ हितचिंतक आहेत.

समित्यांचे कार्य–

विदर्भ साहित्य संघाचें कार्य प्रामुख्याने भिन्नभिन्न समित्यांच्या द्वारे चालते. चालू वर्षी, निरनिराळ्या समित्यांनी पुढीलप्रमाणे अतिशय उत्साहपूर्वक कार्य केले आहे.

१. सांस्कृतिक कार्यक्रम समिति– (आमंत्रक श्री. य. गो. मालोदे)

(अ) दि. ९–५–५९ रोजी कै. रविंद्रनाथ ठाकूर आणि श्रीशिवजयंती समारोह साजरा करण्यात आला.

(आ) कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला– या व्याख्यानमाळेचे उद्घाटन दि. ३–७–५९ रोजी इतिहास संशोधक म. म. द. वा. पोतदार यांचे हस्ते करण्यात आले. या मालेत 'युगपुरुष शिवाजी' ह्या विषयावर तीन व्याख्याने झाली.

(इ) दुसरी व्याख्यानमाला दि. १७, १८, १९ जानेवारी ६० ला झाली. महाराष्ट्रातील श्रेष्ठ साहित्यिक आणि थोर तत्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी "आधुनिक विज्ञान आणि वैदिक दर्शनशास्त्र" ह्या विषयावर व्याख्याने दिली. समारोपाचे दिवशी मुंबई राज्याचे राज्यपाल परमश्रेष्ठ श्री. श्रीप्रकाश यांनी अध्यक्ष-स्थान मंडित केले होते. राज्यपालांनी व्याख्यानमालेचा उत्कृष्टपणे समारोप केला.

(ई) दि. २६–५–५९ ला सुप्रसिद्ध गोवासत्याग्रही सौ. आशाताई फडके यांचे काव्यगायन.

(उ) दि. २८–५–५९ ला कै. बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथि: वक्ते प्रा. या. मु. पाठक.

(ऊ) दि. १९–७–५९ ला व्यासपौर्णिमेनिमित्त "संशोधनशास्त्र" ह्या विषयावर श्री. अप्रबुद्ध पाळेकरांचे व्याख्यान.

(ए) दि. २५–७–५९ ला लो. टिळक जयंतीनिमित्त साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचे व्याख्यान.

शारदोत्सव–

(ऐ) दि. ८–१०–५९ रोजी सरस्वती उत्सवाच्या उद्घाटनानिमित्त "साहित्य सौंदर्य आणि जीवन" या विषयावर साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचे व्याख्यान.

अनुक्रमणिका

दि. १२–१०–५९ ला "भारतीय कुटुंबसंस्थेचे भवितव्य" या विषयावर सामूहिक चर्चा.

दि. १४–१०–५९ ला कविसंमेलन– उद्‌घाटक श्री. आनंदराव टेकाडे; अध्यक्ष, श्री. वसंतराव सबनीस.

पुढील कवींनी या संमेलनात भाग घेतला:–

सर्वश्री. आनंदराव टेकाडे, वसंतराव सबनीस, व. कृ. वऱ्हाडपांडे, कृ. मु. उजळंबकर, मधु कोसारे, श्याम सोनारे, वा. रा. पाठक, सौ. उषाताई लिमये, सौ. शांताबाई दंडिगे, कु. आशा लिमये, व कु. दुर्गा कानगो.

(ओ) म. ज्योतिबा फुले पुण्यतिथि– दि. २८–११–५९ रोजी सुप्रसिद्ध कादंबरीकार, टीकाकार आणि पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान.

(औ) डान्स ज्युबिली– अमेरिकेचे अध्यक्ष श्री. आयसेनहॉवर यांच्या सांस्कृतिक कार्यक्रम योजनेखाली भारतात आलेल्या रॉड अलेक्झांडर यांच्या जगप्रसिद्ध डान्स ज्युबिली कलापथकाचे दोन कार्यक्रम दि. २८ व २९ नोव्हेंबर ५९ रोजी रात्री ९ वाजता वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिरात करण्यात आले.

दि. २९–११–५९ ला दुपारी ३–३० वाजता डान्स ज्युबिली कलापथकातील सर्व कलावंतांचा वि. सा. संघातर्फे सन्मान करण्यात आला. सुरुवातीला भारतीय नृत्य व संगीत यांचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्यात पुढील कलाकारांनी भाग घेतला.

भावगीत– कु. कुमुद मोघे; शास्त्रीय संगीत– प्रा. अ. के. कोकजे.

मणिपुरीनृत्य– कु. उषा जगन्नाथन, कु. सुजाता सरमन, कु. जोस कोतवाल.

वाद्यवृंद– कलाकुंज, नागपूर.

कोरकुनृत्य– लेडी अमृताबाई डागा कॉलेजमधील विद्यार्थिनींनी सादर केले.

महाभारत व्याख्यानमाला– तिसरी

(अं) साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांनी "श्रीकृष्णाचे शाश्वत तत्वज्ञान" या विषयावर दि. १ ते १० फेब्रुवारी ६० पर्यंत "महाभारत व्याख्यान-मालेतील तिसरी व्याख्यानमाला गुंफली.

ब्रिटिश कौन्सिलची नाटके––

(अ:) ऑक्स्फर्ड प्लेहाऊस कंपनीच्या वतीने दि. २७ डिसेंबर, २८ डिसेंबर आणि २९ डिसेंबर ५९ रोजी "ट्वेल्थ नाईट" "मॅन ऑफ–डेस्टिनी" "डॉन जॉन इन हेल" ह्या नाटकांचे प्रयोग वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात

२ रंगमंदिर समिति– (आमंत्रक १ डिसेंबर १९५९ पर्यंत श्री. श्री. गु अण्णिगेरी: ९–१२–५९ पासून श्री. पु. दि. ढवळे.)

कै. चंद्रभागाबाई पारधी सभागृहाचे उद्घाटन— डॉ. का. मो. पारधी सेवानिवृत्त सिव्हिल सर्जन, ब्रह्मदेश यांनी दिलेल्या ५००० रु. च्या देणगीतून धनवटे रंग मंदिरात बांधल्या गेलेल्या एका दालनाला " कै. चंद्रभागाबाई पारधी सभागृह " असे नाव देण्यात आले. या सभागृहाचे उद्घाटन दि. ४–११–५९ रोजी सकाळी ८–३० वाजता डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. का. मो. पारधी, त्यांचे वडील कै. मो. ग. पारधी, मातोश्री कै. चंद्रभागाबाई पारधी व पत्नी सौ. सुशीलाबाई पारधी या सर्वांच्या तैलचित्रांचे अनावरण करण्यात आले. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी भाषणे केली.

३ पुस्तकालय समिति- (आमंत्रक श्री. गो. स. देहाडराय)

ग्रंथालयाला यावर्षी खालील प्रमाणे देणग्या मिळाल्या.

(अ) न्या. मू. के. तु. ऊर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति, कार्यकारी विश्वस्त वि. सा. संघ यांनी ग्रंथालयाला २३० पुस्तकांची देणगी दिली.

(आ) महाराष्ट्र कार्यालयाकडून सत्यकथा, मनोहर, गॅझेट आदि मासिकांचे अदमासे २०० दुर्मिळ अंक.

(इ) श्री. दि. प्र. ओगले, नागपूर यांचेकडून 'लाईफ' चे काही सुटे व काही बाईंड केलेले अंक.

(ई) प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचेकडून 'महानुभाव तत्वज्ञान' या ग्रंथाचे हस्तलिखित आणि स्त्री व किर्लोस्कर मासिकांचे बांधणी केलेले २४ अंक.

(उ) श्री. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे अमरावती यांचेकडून "अस्तोदय" "नवा बंगला" आणि "सत्याग्रह" या तीन नाटकांची मूळ हस्तलिखिते.

या वर्षी पुस्तकालय समितीने ग्रंथालयातील पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग व्हावा याकरिता ग्रंथालयाला योग्य स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. लवकरच संदर्भ ग्रंथ म्हणून सर्वांना त्या पुस्तकांचा फायदा घेता येईल अशी आशा आहे.

४. गडकरी स्मारक समिति– (आमंत्रक श्री. र. वि. कुळकर्णी)

कै. राम गणेश गडकरी यांचा ४१ वा स्मृतिदिन समारंभ दि. २१ ते २३ जानेवारी १९६० पर्यंत आयोजित करण्यात आला. यावेळी दि. २१ ते २३ जानेवारी ६० पर्यंत "गडकऱ्यांच्या नाटकातील प्रणयसृष्टि," "गडकऱ्यांच्या

नाटकातील वाक्‌सृष्टि " आणि "गडकरी काल आणि कर्तृत्व " या विषयांवर सुप्रसिद्ध ग्रंथकार प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांची व्याख्याने झाली.

दि. २५–१–६० रोजी सावनेर मुक्कामी कै. राम गणेश गडकरी यांचा ज्या घरात मृत्यु झाला त्या ठिकाणी एक सभा घेण्यात आली. यावेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे व्याख्यान झाले. कै. राम गणेश गडकरी यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमासाठी नागपूरहून श्री. ना. रा. शेंडे, श्री. र. वि. कुळकर्णी, आमंत्रक, ग. स्मा. समिति; श्री, पां, वा. गडकरी, आणि श्री. प्रभाकर गडकरी ही मंडळी गेली होती.

५. नाट्यसमिति — (आमंत्रक श्री. बाबुराव चिमोटे)

(अ) दि. १–६–५९ रोजी कै. श्री. कृ. कोल्हटकर यांची पुण्यतिथि प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. यावेळी श्री. द. रा. गोमकाळे, सि. जज्ज वाशीम यांचे व्याख्यान झाले.

(आ) दि. २६–८–१९५९ रोजी नाट्याचार्य श्री. कृ. प्र. खाडीलकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी नाटककार श्री. वा. वा. भोळे यांचे "खाडिलकर आणि मराठी नाट्यकला " या विषयावर भाषण झाले.

(इ) दि. १३–१–६० रोजी सुप्रसिद्ध नाटककार व खासदार श्री. भा. वि. वरेरकर यांचे 'भारतीय रंगभूमि' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

बालनाट्योत्सव कार्यक्रम––

(इ) लहान लहान मुलांना चांगले वळण लागावे, अभिनय कलेची माहिती व्हावी, सभाधीटपणा यावा, अभिरुचि वाढावी, नाट्यकलेची माहिती व्हावी इत्यादि गोष्टी लक्षात घेऊन हा बालनाट्योत्सवाचा उपक्रम वि. सा. संघाच्या नाट्यसमितीने यंदा नव्याने सुरू केला.

या बालनाट्योत्सवाचे उद्‌घाटन दि. ३१. १. ६० रोजी मुंबई राज्याचे समाजकल्याणमंत्री श्री. ना. खं. तिरपुडे यांचे हस्ते करण्यात आले. हा उत्सव दि. ३१–१–६० दि. १. २. ६० या दोन दिवशी घेण्यात आला. या नाट्योत्सवात रंजन कला मंदिर, कलाभारती, सोमलवार हायस्कूल, सी. पी. अँड बेरार हायस्कूल, लोकांची शाळा, या संस्थांनी आपले चमू पाठवून उत्साहाने भाग घेतला. दि. ३–११–६० ला चार नाटके व दि. १–२–६० ला तीन नाटके आणि पाच नाट्यछटा सादर करण्यात आल्या होत्या.

दि. १–२–६० रोजी कार्यक्रमानंतर निकाल जाहीर करण्यात आला. नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते बक्षिस समारंभ झाला. पुढील उमेदवारांना बक्षिसे देण्यात आली.

नाटक— पहिले बक्षिस– " नवे नाटक जुना गोंधळ "

सादरकर्ते– कलाभारती नागपूर

दुसरे बक्षिस– " नाटकाचे नाटक " सादरकर्ते– लीला जोशी व चमू, नागपूर.

तिसरे बक्षिस– " चिडीचा गुलाम " सादरकर्ते– रंजनकला मंदिर, नागपूर.

सर्वोत्तम नाटचप्रयोगासाठी रंजनकला मंदिरातर्फे ठेवण्यात आलेला फिरता करंडक " कलाभारती " या संस्थेला देण्यात आला.

दिग्दर्शन—

पहिले बक्षिस– श्री. गणेश सोळंकी (नवे नाटक जुना गोंधळ)
दुसरे बक्षिस– कु. लीला जोशी (नाटकाचे नाटक)
तिसरे बक्षिस– कु. नलिनी लोहारकर (चिडीचा गुलाम)

अभिनय—

पहिले बक्षिस– श्री. रंजन दारव्हेकर,
दुसरे बक्षिस– श्री. अशोक तांबे व श्री. जगदीश सुकळीकर
तिसरे बक्षिस– कु. ज्योति मोघे

नाटचछटा—

पहिले बक्षिस– कु. उषा लोहारकर
दुसरे बक्षिस– श्री. अशोक मावकर
तिसरे बक्षिस– श्री अशोक झाडे

खोलकुटे ढाल नाटचस्पर्धा–

यावर्षी दरवर्षीप्रमाणे वि. सा. संघातर्फे "खोलकुटे ढाल" नाटचस्पर्धा घेण्यात आली. यंदा नागपूर महाविद्यालयाने " खोलकुटे ढाल " मिळविली. दि. ३१–१–६० रोजी रात्रौ बालनाटचोत्सव उद्घाटनप्रसंगी माननीय श्री. ना. खं. तिरपुडे, समाजकल्याणमंत्री यांचे हस्ते " ढाल " देण्याचा समारंभ झाला

शासकीय नाटचकला प्रशिक्षण वर्ग—

मुंबई राज्याच्या विदर्भ विभागीय शिक्षणखात्याचे वतीने प्राथमिक शिक्षकांना नाटचकलेचे शिक्षण देण्यासाठी एक नाटचशिबिर आयोजित करण्याची जबाबदारी वि. सा. संघाच्या नाटचसमितीकडे सोपविण्यात आली. त्यानुसार दि. २०-१-६० ते दि. ३–२–६० पर्यंत वि. सा. संघाचे कै. गडकरी स्मारक सभागृहात वर्ग घेण्यात आले. या वर्गाचे उद्घाटन दि. २०–१–६० रोजी संघाध्यक्ष

श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते करण्यात आले. या नाटचकलेच्या वर्गाला नागपुरातील नाटचक्षेत्रातील तज्ञ सर्वश्री वा. वा. भोळे, श्री. ना. बनहट्टी, शं. वा. शास्त्री. सखारामपंत जोशी, बाळासाहेब भावे, वसंतराव सवनीस, मनोहरपंत परांजपे, मनोहर कुंडले, गोविंद रत्नपारखी, दि. व. पंडित, पु. व्यं. दारव्हेकर, शंकरराव कुळकर्णी आणि राजा पाठक यांनी शिकविण्याचे कार्य केले. वर्गाचे संचालन श्री. बाबुराव चिमोटे यांनी अत्यंत उत्साहाने व परिश्रमपूर्वक केले.

दि. २५–१–६० रोजी शिक्षणखात्याचे संचालक डॉ. आ. ग. पवार यांनी प्रशिक्षण वर्गाला भेट देऊन रात्री ८–३० वाजता वि. सा. संघ. धनवटे रंग–मंदिरात विद्यार्थ्यांसमोर नाटचकलावर्गाच्या आयोजनाविषयी उद्बोधक व्याख्यान दिले.

दि. २६–१–६० रोजी सकाळी वर्गातील विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग यांचे डॉ. आ. ग. पवार यांचे समवेत छायाचित्र काढण्यात आले.

दि. ३–२–६० रोजी हडस हायस्कूलच्या 'खरे सभागृहा' त नाटचवर्गाचा समारोप श्री. मो. अ. वंबावाले, उपसंचालक, शिक्षणविभाग (विदर्भ) नागपूर यांचे अध्यक्षतेखाली झाला.

६. युगवाणी समिति (संपादक–एप्रिल ते आक्टोबर–प्रा. या. मु. पाठक; नंतर–श्री. पु. य. देशपांडे)

या वर्षी युगवाणीचे एकूण आठ अंक व त्यात तीन जोड अंक काढण्यात आले. वि. सा. संघाच्या वार्षिक संमेलनप्रसंगी फेब्रुवारी ६० मध्ये संमेलनविशेषांक प्रसिद्ध करण्यात आला.

७. सामाजिक शास्त्रसमिति– (आमंत्रक प्रा. ग. प्र. पिंपरकर)

शारदोत्सव प्रसंगी "भारतीय कुटुंबसंस्थेचे भवितव्य" या विषयावर सौ. विमलाबाई देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली सामूहिक चर्चेचा कार्यक्रम झाला. या चर्चेत सर्वश्री प्रा. प्र. ज. जागीरदार, शरच्चंद्र धर्माधिकारी; वसंतराव साठे, प्रा. ग. रा. पेंढरकर, प्रा. श्री. गो. काशीकर, दे. गो. लांडगे, प्रभु ठोंबरे, व प्रा. ग. प्र. पिंपरकर यांनी भाग घेतला. ही चर्चा उद्बोधक ठरली.

८. परीक्षा समिति– (संचालक–प्रा. तु. वि. गेडाम)

अ–मराठी भाषिकांना मराठीची ओळख करून देण्यापासून एम्. ए. समकक्ष साहित्य पारंगत परीक्षेपर्यंत विविध परीक्षा दरवर्षी दोनदा घेण्यात येतात. प्रस्तुत वर्षी निरनिराळचा परीक्षांना पुढीलप्रमाणे विद्यार्थी बसले.

सप्टेंबर १९५९ सत्र परीक्षा केंद्रे–२७		फेब्रुवारी सत्र १९६० परीक्षा केंद्रे–२५	
परीक्षा	विद्यार्थी	परीक्षा	विद्यार्थी
प्रवेश –	७६	प्रवेश–	३२
प्रारंभ–	१२१	प्रारंभ–	१७०
विनीत–	१८८	विनीत–	१३५
परिचित–	५३	परिचित–	३०
स्नातक–	२६	स्नातक–	१०
पारंगत–	५		

सा. विनीत परीक्षेत सप्टेंबर १९५९ च्या सत्रात प्रथम क्रमांक आल्याबद्दल श्री. मनोहर माकोडे, कोंढाळी केंद्र यांना कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक मिळाले.

सत्कार––

(अ) संगीत चूडामणि श्री. विनायकबुवा पटवर्धन यांचा दि. ३–४–५९ ला सत्कार. यावेळी त्यांचे सुश्राव्य गायन झाले.

(आ) दि. १३–१२–५९ ला संघाचे पूर्वाध्यक्ष आणि थोर साहित्यिक व तत्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त वि. सा. संघातर्फे न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति का. विश्वस्त यांचे अध्यक्षतेखाली सत्कार. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. गोपाळराव पाठक, श्री. ना. रा. शेंडे श्री. श्री. गो. काशीकर आदींची भाषणे झाली.

(इ) पंजाबचे राज्यपाल व सुप्रसिद्ध साहित्यिक माननीय श्री. न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांची दि. २०–१–६० रोजी भेट.

(ई) मुंबई राज्याच्या शिक्षण खात्याचे संचालक डॉ. आ. ग. पवार यांची दि. २०–२–६० रोजी भेट.

(उ) नागपूर विद्यापीठाची डी. लिट्. पदवी आणि साहित्य अकादमीचे मराठीचे पारितोषिक हे दोन्हीही बहुमान प्राप्त केल्याबद्दल विदर्भातील साहित्यिक आणि संस्कृतज्ञ प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचा दि. ३–३–६० रोजी सत्कार. त्यावेळी प्रा. काशीकर, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे, डॉ. य. खु. देशपांडे यांची भाषणें झाली.

(ऊ) नागपुरातील थोर तपस्वी, विद्वान व साक्षात्कारी पंडित श्री. अप्रबुद्ध तथा अण्णासाहेब पाळेकर यांचा दि. १०–३–६० रोजी सत्कार. याप्रसंगी श्री. मालोदे, श्री. भवानानंकर नियोगी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. वर्णेकर साहित्याचार्य बळशास्त्री हरदास यांची भाषणे झाली.

माननीयांच्या भेटी—

(अ) दि. १३–४–५९ रोजी म. म. द. वा. पोतदार यांची भेट.

(आ) दि. १५–५–५९ रोजी श्री. पु. भा. भावे आणि सौ. वसुंधराबाई पटवर्धन यांची भेट.

(इ) दि. ८–८–५९ रोजी माजी शिक्षणमंत्री श्री. गोपाळराव एकबोटे (हैद्राबाद) आणि मराठवाडा विद्यापीठाचे मराठीचे प्रमुख प्रा. रा. ब. माडेकर यांची भेट.

(ई) दि. २०–८–५९ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. न. र. फाटक आणि तर्कतीर्थ श्री. रघुनाथशास्त्री कोकजे यांची भेट.

(उ) दि. १–९–५९ रोजी सावंतवाडीचे महाराज श्री. शिवरामराजे भोसले व अ. भा. गांधर्व महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रा. बा. र. देवघर यांची भेट.

(ऊ) दि. १९–१२–५९ रोजी 'दाज़ी'चे सुप्रसिद्ध लेखक श्री. ना. धों. ताम्हणकर यांची भेट.

(ए) दि. ३–१–६० रोजी तुळजापुर येथील उस्मानाबाद जिल्हा साहित्य–संमेलनाचे अध्यक्ष श्री. प्रा. भगवंतराव देशमुख यांची भेट.

(ऐ) दि. १०–१–६० रोजी श्रीमती वकुळाबाई अभ्यंकर पुणे यांची भेट.

(ओ) दि. २४–२–६० रोजी वि. सा. संघाच्या बावीसाव्या साहित्य-संमेलनाचे स्वागताध्यक्ष व एक थोर सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोषराव पाटील, (सावरगाव डुकरे) आणि सुप्रसिद्ध साहित्यिक व कवि श्री. वि. द. घाटे यांची भेट.

(औ) दि. २६–२–६० रोजी खासदार म. म. पां. वा. काणे व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति श्री. पटवर्धन यांची भेट.

(अं) मध्यप्रदेशाचे राज्यपाल माननीय श्री. ह. वि. पाटसकर यांनी दि. ८–३–६० रोजी भेट दिली. यावेळी अल्पोपहाराचा कार्यक्रम आयोजित केला होता.

(अः) सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. गो. नी. दांडेकर यांची दि. २२–३–६० रोजी भेट.

निरोप समारंभ— रंगमंदिर समितीचें चिटणीस श्री. श्री. गु. तथा बाळासाहेब अण्णिगेरी हे व्यवसायानिमित्त नागपूर सोडून जाणार असल्यामुळे त्यांना वि. सा. संघातर्फे थाटाने निरोप देण्यात आला. यावेळी श्री. ना. रा. शेंडे संघाध्यक्ष, यांनी श्री. अण्णिगेरी आणि सौ. शांताबाई अण्णिगेरी यांना पुष्पहार घालून सत्कार केला. अल्पोपहारानंतर श्री. अण्णिगेरी यांनी भाषण केले.

विदर्भ पूरग्रस्त सहाय्यक निधीला मदत—

विदर्भीय जनतेला ओल्या दुष्काळामुळे ओढवलेल्या दुर्धर आपत्तीला तोंड देता यावे म्हणून सरकारने निरनिराळे मनोरंजक कार्यक्रम ठेवून निधि जमविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्या निधीला मदत म्हणून वि. सा. संघाने आजपर्यंत ५७५ रुपयांची मदत दिली.

दुखवट्याच्या सभा—

दि. ५–१२–५९ रोजी वि. सा. संघ आणि विदर्भ संशोधन मंडळ यांचे-वतीने कै. डॉ. गो. स. सरदेसाई आणि डॉ. अनंत सदाशिव अळतेकर यांच्या दुःखद निधनाबद्दल दुखवटयाची सभा झाली. यावेळी श्री. ना. रा. शेंडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वा. वि. मिराशी, व श्री. दे. गो. लांडगे यांनी भाषणे करून श्रद्धांजलि अर्पण केली

दि. ९–१२–५९ रोजी वि. सा. संघाचे दाते डॉ. का. मो. पारधी यांच्या निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी श्रद्धांजलि अर्पण केली.

दि. ११–१२–६० रोजी वि. सा. संघाच्या नाटयसमितितर्फे नटवर्य श्री. चिंतामणराव कोल्हटकर आणि रेजिसॉर श्री. पार्श्वनाथ अळतेकर यांच्या निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी सर्वश्री ना. रा. शेंडे, वा. वा. भोळे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व बाबुराव चिमोटे यांनी श्रद्धांजलि अर्पण केली.

शाखांचे कार्य—

खामगाव शाखा–

खामगांव शाखेची वार्षिक निवडणूक दि. ४–८–५९ रोजी होऊन त्यात नवीन वर्षाकरिता पदाधिकारी निवडण्यात आले.

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या स्मारकासाठी निरनिराळे कार्यक्रम करून निधि जमविण्याचा प्रयत्न खामगाव शाखेने सुरू केला.

मेहकर शाखा—

मेहकर (जि. बुलडाणा) येथे विदर्भ साहित्य संघाची दि. १३–९–५९ रोजी शाखा स्थापन करण्यात आली. यावेळी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

वणी शाखा--

दि. १३-१०-५९ रोजी श्रीमंत धोंडो दिनकर उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे हस्ते वार्षिक कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी श्री के. ना. काटपाताळ यांनी प्रास्ताविक भाषण करून शाखेच्या कार्याची माहिती दिली. त्या दिवशी रात्री नागपूरच्या सौ. ताराबाई देशपांडे यांचा शास्त्रोक्त व भावगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

वर्धा शाखा--

दि. २५-९-५९ रोजी वार्षिक सभा होऊन नवीन वर्षाकरिता पदाधिकारी निवडण्यात आले.

दि. १-१०-५९ ते ९-१०-५९ पर्यंत इतर संस्थांच्या सहकार्याने एक नवरात्र व्याख्यानमाला आयोजित केली. या व्याख्यानमालेत पुढील वक्त्यांची भाषणे झाली.

श्री. शं. ग. सुरडकर, वर्धा	– "संस्कृतीचे जीवनात स्थान" दि.१-१०-५९
प्रा. कुसुम नांदे, अकोला	"समर्थ रामदास व त्यांचे सावधपण" दि. २-१०-५९
न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, नागपूर	"आपले आजचे शिक्षणात चुकते काय व कुठे ?" दि. ३-१०-५९
प्रा. शांताराम करकरे, नागपूर	"फ्रॉइडचे मानसशास्त्र"– दि. ४-१०-५९
प्रा. एस. के. लिमये, नागपूर	"संस्कृत साहित्यातील काही व्यक्तिरेखा" दि. ५-१०-५९
प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे, नागपूर	"ज्ञानेश्वरी" दि. ६-१०-५९
श्री. दि. ब. पंडित, नागपूर	"शब्दशक्ति व शब्दसौंदर्य" दि.७-१०-५९
प्रा. अकोलकर, चांदा	"शालेय स्वराज्य–मंत्र आणि तंत्र" दि. ८-१०-५९
श्री. मु. ना. कागलकर, अमरावती	"शिक्षणात धर्माचे स्थान" दि. ९-१०-५९

दि. १८-११-५९ ला वि. सा. संघ व कलाविकास मंडळ यांचे वतीने प्रा. ना. सी. फडके यांचे "ललित साहित्याचा हेतु व प्रतिज्ञा" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी जिल्हाधीश श्री. सुरडकर हे होते. याप्रसंगी प्रा. वनमाली व श्री. मशानकर यांचीहि भाषणे झाली.

गोंदिया शाखा--

गोंदिया शाखेचे भरीव कार्य-- वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या विद्यमाने मंगळवार दि. १५-३-६० रोजी सायंकाळी ५-१५ वाजता सागरचे

उद्योगपति श्रीमान चिंतामणराव पिंपळापुरे यांचे हस्ते भवभूति–स्मारकांतर्गत रंगमंदिराचा कोनशिला समारंभ अत्यंत थाटाने करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन गोंदिया येथील उद्योगपति श्री. मनोहरभाई पटेल यांनी देणगी म्हणून दिलेल्या वि. सा. संघाच्या जागेत भव्य शामियाना उभारून करण्यात आले होते.

ह्या प्रसंगी श्रीमान् चिंतामणराव पिंपळापुरे, वि. सा. संघाचे संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे व युगवाणीचे संपादक श्री. पु. य. देशपांडे, व श्री. ना. ह. तेलंग यांची भाषणे झाली. ह्या कार्यासाठी मुंबई शासनाने पंचवीस हजार रुपयांचे अनुदान देण्याचे आश्वासन दिले असून व त्या अनुदानापैकी पहिला हप्ता कार्यक्रमाचे दिवशीच मिळाल्याचे जाहीर करण्यात आले.

ह्या समारंभाचे निमित्ताने गोंदिया शाखेचे अध्यक्ष श्रीमान छोटुसाभाई क्षत्रिय यांनी सन्माननीय पाहुणे व इतर गोंदिया निवासी कार्यकर्ते यांना उत्कृष्ट मेजवानी दिली.

अकोला शाखा– अकोला येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेच्या वतीने दि. १५–११–१९५९ रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे शाखा पदाधिकारी संमेलन भरविण्यात आले. या संमेलनाकरिता सर्व शाखांचे मिळून १९ प्रतिनिधि उपस्थित होते.

सकाळी ८–३० वाजता संमेलनाला सुरुवात होऊन सर्व शाखांच्या प्रतिनिधींनी आपापल्या शाखेचा वार्षिक अहवाल सादर केला. परस्पर विचार विनिमय झाल्यावर पहिली सभा संपली

शाखा पदाधिकारी संमेलनाच्या प्रतिनिधींची दुसरी सभा दुपारी ४-३० वा. आमदार श्री. मधुसूदन वैराळे यांचे निवासस्थानी भरली. यावेळी अनौपचारिकपणे विचार विनिमय होऊन केंद्रीय कार्यालय आणि इतर शाखा यांच्या कार्यवृद्धीच्या दृष्टीने विचार करण्यात आला.

रात्रौ ९–३० वाजता नाट्यकला मंदिर, अकोला या संस्थेने "पैसे झाडाला लागतात" ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला. संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. अनिल मराठे, श्री. शांताराम जैन, आमदार मधुसूदन वैराळे, श्री. प्र. ना. खोडे आणि इतर सदस्य यांनी फार परिश्रम घेतले.

२२ वे विदर्भ साहित्य सम्मेलन (सावरगावं डुकरे)

शनिवार दि. १३ व १४ फेब्रुवारी १९६० रोजी वि. सा. संघाचे २२ वे साहित्य संमेलन सावरगाव डुकरे या आदर्श गावी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली अत्यंत यशस्वीपणे पार पडले. सुरुवातीला दि. १३–२–६० ला दुपारी ३ वा. ऐतिहासिक, साहित्यिक व कलात्मक प्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री. शं. गो. डवीर यांनी केले. हे प्रदर्शन भरविण्यासाठी राजाराम वाचनालय, चित्रकार श्री. मनोहर, छायाचित्रकार श्री. मधु पारळकर, श्री. अ. ल. लिमये, श्री. म. वि. पंडे, श्री. श्री. स. काळे, श्री. वसंत खेडीकर व सेन्ट्रल लायब्ररी नागपूर यांचे बहुमोल साहाय्य झाले. संमेलनाचे उद्‌घाटन दि. १३–२–६० रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले. यानंतर रीतसर अध्यक्षांची निवड झाल्यावर संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आपले अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले. वंदेमातरम् झाल्यावर पहिल्या दिवशीचा महत्वाचा कार्यक्रम संपला.

रात्री ९–१५ वाजता अधिवेशनाच्या मंडपात श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली कवि संमेलन झाले. यात पुढील कवींनी भाग घेतला–संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, श्री. पद्माकर डावरे, श्री. बाबा मोहोड, श्री. मधु पारळकर, कु. दुर्गा कानगो, श्री. व्यं. व. पुराणिक, श्री. कृ. मु. उजळंवकर, श्री. वि. वा. जोशी, श्री. रा. ना. पांडे, श्री. प्रभाकर उघडे, श्री. वा. के. अत्रे, कु. सुगंधा शेंडे, श्री. भी. रा. जहागिरदार, श्री. भाऊ मांडवकर, श्री. शे. मु. जैन, श्री. न. रा. निमजे, श्री. द. ज. बर्गी, श्री. भालेराव, श्री. दा. ल. अडोणी, श्री. जा. गो. खडसे, श्री. ग. श. मोरे, व श्री. रा. रा. सीतांफळे.

पुस्तक प्रकाशन––

रविवार दि. १४–२–६० रोजी सकाळी ९ वाजता प्रा. पद्माकर डावरे लिखित "नाना फडणवीस ! दादा ! भाई ! नवरोजी !!" ह्या एकांकिका संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

बोलीभाषांवर परिसंवाद––

सकाळी ९–३० वाजता "मराठी व तिच्या वैदर्भीय बोलभाषा" ह्या विषयावर परिसंवाद झाला. वऱ्हाडी, गोंडी, कोरकू, हळबी, इ. उपेक्षित बोलभाषांच्या अध्ययनाला चालना देण्याचे दृष्टीने फार मोठे कार्य ह्या परिसंवादाने घडवून आणले. यात श्री. सोमण वकील बुलढाणा, यांचे वऱ्हाडीबद्दल; प्रा. सुरेश डोळके

नागपूर, यांचे नागपुरी व हळबी भाषांबद्दल; श्री. वि. वा. जोशी चांदा, यांचे गोंडी भाषेबद्दल; श्री. द. बा. प्रधान शिक्षणाधिकारी अमरावती यांचे कोरकू भाषेवर; प्रा. दा. ल. अडोणी सागर, यांचे बुंदेलखंडीवर व प्रा. जहागीरदार खामगाव, यांचे अहिराणी भाषेवर अशी विद्वत्तापूर्ण भाषणे झाली. ह्याशिवाय प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी 'भाषा व बोली' ह्या विषयावर व पुलगावचे डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनी 'बोलभाषांचे व्युत्पत्तिशास्त्र' यावर उद्बोधक भाषणे केली. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीहि ह्या परिसंवादात भाग घेतलं व वैदर्भीय व कोकणी बोली यातील काही साम्ये दर्शविणारे व्यासंगपूण भाषण केले.

विषय नियामक सभा--

दुपारी १ वाजता विषय नियामक समितीची सभा भरली. यात खुल्या अधिवेशनात मांडावयाचे ठराव व त्यावर बोलणाऱ्या वक्त्यांची नावे निश्चित करण्यात आली.

साधारण सभा--

दुपारी २ वाजता साधारण सभा भरली. यात मागील सभेचा अहवाल वाचून दाखविण्यात आला व अनुपूरक अंदाज पत्रकाला मान्यता देण्यात आली.

माननीय ज्येष्ठांचा सत्कार---

सायंकाळी विदर्भातील काही वयोवृद्ध, ध्येयनिष्ठ व त्यागी कार्यकर्त्यांचा सत्कार अत्यंत रोचक व भावपूर्ण असा झाला. प्रा. श्री. गो. काशीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून सत्काराचा हेतु व स्वरूप स्पष्ट केले. या सत्कारात श्री. पन्नालालजी व्यास खामगाव, श्री. पंढरीनाथ पाटील, चिखली, श्री. शं. गो. डबीर वाशीम, श्री. मा. ज. कानेटकर नागपूर श्री. म. सी. मुंडले, मोर्शी यांना श्रीफल व शाल संमेलनाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते देण्यात आली.

खुले अधिवेशन--

या खुल्या अधिवेशनात एकूण ११ महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

ठरावाचे विषय---

ठराव-- (१) दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजलि (२) मराठी शुद्धलेखनाबाबत. (३) गावांची नावे बदलणे. (४) सांस्कृतिक व्यासपीठाची कल्पना.

(५) महाकवि भवभूति, मराठीचे आद्यकवि मुकुंदराज यांचे स्मारक उभारण्याबाबत (६) मुंबई सरकारने शासन साहित्य परिषद सुरू करण्याबाबत (७) पुराणवस्तुखात्याचें कार्यालय विदर्भ प्रदेशात सुरू करण्याबाबत विनंती. (८) ग्रंथालयविषयक कायदा. (९) राज्यपुनर्रचनेचेवेळी मराठीभाषी विभाग मुंबई राज्यात एकत्रित न केले गेलेले कांही प्रदेश समाविष्ट करण्याबाबत सरकारला विनंती. (१०) विदर्भाकरिता लोकसाहित्य समिति स्थापन करणे. (११) कै. राम गणेश गडकरी यांचे स्मारक सावनेर येथे करण्याबाबत व त्यांचे घर ताब्यात घेण्याबाबत मुंबई शासनास विनंती. ह्या ठरावावर प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. द. ह. अग्निहोत्री, श्री. य. गो. माल्लोदे, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. वा. पू. मोहरीर, प्रा. भा. ल. भांबूरकर, श्री. अ. ल. लिमये, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. संतोषराव पाटील, श्री. यादवराव उपाध्ये, व श्री. गो. स. देहाडराय यांनी भाषणे केली.

नाट्यप्रयोग--

रात्री ९–३० वाजता चिखली येथे नगरपालिका विद्यालयाचे प्रांगणात वि. सा. संघाच्या खामगाव शाखेच्या वतीने श्री. पु. ल. देशपांडे लिखित "भाग्यवान" नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

अनुदान व देणग्या–

१. मुंबई शासन–वार्षिक अनुदान रु. ७५००–००

२. मुंबई शासनाकडून यंदा नाट्यसमितिकरिता रु. ३०००–०० चे अनुदान मिळाले.

३. सावरगावडुकरे संमेलनाकरिता शिक्षणविभागाकडून ५०० रु. चे अनुदान मिळाले.

४. श्री. कार्यवाह, महाराष्ट्र हितकारी मंडळ, जमशेटपूर यांनी कै. मानाजोग स्मारक निधीसाठी १५१–०० रु. ची देणगी दिली.

५. श्री. बाबुराव चिमोटे, नागपूर यांनी वि. सा. संघाच्या नाट्यसमितीला १३०–०० रु. ची देणगी दिली.

वि. सा. संघ वरील सर्व देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

धनवटे रंगमंदिर-विदर्भ साहित्य संघ
१९५९-६०

रंगमंदिरात १९५९ ते ६० (एप्रिल ते मार्च) या दरम्यान खालील प्रमाणे कार्यक्रम झालेत.

संगीत-नृत्य	–	४९	कार्यक्रम
मराठी नाटके	–	६९	
हिंदी	–	१२	
गुजराती	–	२	
इतर भाषांचे कार्यक्रम नाटके व संगीत		१०	
सभा सम्मेलन व व्याख्याने इ.		४२	

भाड्यापोटी रंगमंदिरास चालूवर्षी एकूण उत्पन्न ३५६५९ रु. झाले. अहवालाचे साली रंगमंदिर समितीच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. रंग मंदिराचे हिशेब १९५९-६० चे तपासले गेले असून जमाखर्चाचे तक्ते तयार आहेत.

आभार--या वर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास अनेक कार्यकर्त्यांचे, दात्यांचे, सभासदांचे व संस्थांचे साहाय्य झाले आहे. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे. वि. सा. संघाला यापुढेहि सर्वांचे साहाय्य लाभावे ही प्रार्थना आहे.

ना. रा. शेंडें,
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस,
थ. गो. मालोदे,
भा. ल. भांबूरकर,
चिटणीस,
वि. सा. संघ.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९५९–६०

तपशील आय	रुपये न.पै.	तपशील व्यय	रुपये न. पै.
आरंभीची शिल्लक:–			
शिल्लक जवळ	१०९–१५	वेतन खर्च	४,२९१–२२
,, चेक	१००–००	पोस्टेज	२८८–९९
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	६३६–१४	मुद्रण व स्टेशनरी	९३१–४२
,, (बिल्डिंगफंड)	२,३६६–२८	युगवाणी मुद्रण	४,४५९–६३
विदर्भ प्री-को-ऑ-हा. सोसायटी	३,११४–४०	किरकोळ खर्च	२६३–०१
नाट्य समिति	२००–००	सांस्कृतिक कार्यक्रम समिति	९,००२–६१
परीक्षा समिति (श्री सगदेव)	५४२–६८	गडकरी स्मारक समिति	३७९–०५
मुदती ठेव	७०००–००	नाट्य समिति	१,०१४–६२
सरकारी अनुदान	७५००–००	आतिथ्य	२५४–१३
	२१,५६८–६५	वीज खर्च	५४३–०३
साधारण सभासद वर्गणी	२,४८२–००	परीक्षा समिति	४,१९१–१८
आजीव सभासद वर्गणी	८५६–००	कार्यालयीन व्यवस्था व शाखासाहाय्य	१,२०८–९३
पुस्तक विक्री	११५–५१	वस्तु खरेदी	२८८–६५
पुढे चालू	२५०२२–१६	पुढे चालू	२७,११६–४७

मागील पानावरून	२५,०२२–१६	मागील पानावरून	२७,११६–४७
ज	४५९–३८	ग्रंथ संपादन व संशोधन	२०९–६०
क्षा शुल्क	२,७०८–७२	अंशदान	२७९–१०
ृतिक कार्यक्रम समिति	१३,०९६–२५	गडकरी ग्रंथालय	३२०–४८
कारी अनुदान	७,५००–००	ऑडिट फी	५०–००
रकोळ उत्पन्न	१,०१३–६९	बँक कमिशन	१५–२०
ग्च समिति	१,१७६–५०	ॲडव्हान्स टू स्टाफ	२४–८०
ग्च स्पर्धा	३७–१९	साहित्य मंदिर बांधकाम	९८८–००
करी स्मारक समिति	१३६–५०	संमेलन	४९५–४२
पेन्स आकौंट	७८७–५०	मंदिर रचना–तात्पुरते कर्ज	१४,०००–००
वाणी वर्गणी	१०५–००	(जुने४९००।-नवे१४०००।-)	
बेहरे व्याख्यान माला	६,०००–००		
गणेश व्याख्यान माला	६,०००–००	फोन खर्च	६१२–४०
दिर रचना–तात्पुरते कर्ज	८,९००–००	टेलिफोन डिपॉझिट	१००–००
जुने ४९००।-नवे ४०००।-)		वाहन व प्रवास खर्च	७६८–४७
रानडे वाद स्पर्धा	९०–०१	फिक्सड् डिपॉझिट परत	२०,५००–००

रंगमंदिर

शिल्लक जवळ	४४–९५	मंदिर रचना	३४,३७९–६८	
देणग्या, भाडे, व्याज इत्यादि	५२,७८४–४९	,, चालू सालातील देणे असलेली देयके	३८,१४३–६५	
सरकारी अनुदान	३६,६४०–००			७२,५२३–३३
तात्पुरते कर्ज	१६,८६९–५०	,, मागील वर्षाच्या देण्यापोटी		२१,२८१–९६
चालू सालातील देणे असलेली देयके	३८,१४३–६५	,, अॅडव्हान्स		२,०००–००
ओव्हर ड्रॉन चेक्स	५५१–५८	दिलेले व्याज	३५८–४३	
		देखरेख	७,९४७–५०	
		तात्पुरते कर्ज परत	९,०१०–००	
		वीज	४,७०९–९४	
		किरकोळ खर्च	२४४–९७	
		कारपोरेशन टॅक्सेस	५५६–००	
		प्रिमियम	९६२–२४	
		नाट्यमहोत्सव	८०–००	
		पोस्टेज	२६–४३	
पुढे चालू	२,१८,०६७–०७	पुढे चालू	२३,८९५–५१	१,६१,२८५–२३

अनुक्रमणिका

मागील पानावरून	२,१८,०६७–०७	मागील पानावरून	२३८९५–५१	१,६१,२८५–२३
		टेलिफोन	२६०–७५	
		स्टेशनरी	४३–५९	
		छपाई	१३३–७७	
		क्ष परत	६,५००–००	३०,८३३–६२
		शिल्लक जवळ	१११–८९	
		सरकारी अनुदान रोख	७,०००–००	
		नाटयसमिति	२००–००	
		परीक्षासमिति (श्री सगदेव)	५४२–६८	
		,, (प्रा-गेडाम)	३११–४५	
		दि वॅक ऑफ महाराष्ट्र (करंट)	२७५–६२	
		विदर्भ प्री-को-ऑ-हा-सो.	४,२४५–०४	
		मुदती ठेव	१,३,०००–००	
		रंगमंदिर शिल्लक	२६१–५४	२५,९४८–२२
	२,१८,०६७–०७			२,१८,०६७–०७

तपासले, बरोबर आहे

महेश्वर जनार्दन गद्रे

चार्टर्ड अकाऊंटंटस्

नागपूर दि. २३ एप्रिल १९६०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर. ३१ मार्च १९६० रोजी असलेला आढावा (बॅलन्सशीट)

फंड व लायबिलीटीज

	रुपये न.पै.	रुपये न.पै.
मंदिर निधी		
मागील बाकी	१,६१,५८९–११	
अधिक मागील वर्षांपैकी राहिलेले	२४,१९७–१३	
	१८५,७८६–२४	
अधिक यंदाचे	१७००१–००	२,०२,७८७–२४
सरकारी अनुदान		
मागील बाकी	२,०५,३३३–००	
अधिक यंदाचे	३६,६४०–००	२,४१,९७३–००
फिक्सड् डिपॉझिट		
मागील बाकी	४२,५००–००	
वजा मागील वर्षाचे राहिलेले	५,०००–००	
	३७५००–००	
वजा चालू साली परत केले	२०,५००–००	१७,०००–००
आजीव सभासद		
मागील बाकी	६,५७२–००	
अधिक यंदाचे	८५६–००	७,४२८–००
कै. बेहरे व्याख्यानमाला		६०००–००
श्री गणेश-व्याख्यान माला		६०००–००
कै. नेने स्मारक फंड मागील बाकी		७५–००
पुढे चालू		४,८१,२६३–२४

ॲसेटस् व प्रॉपर्टी

	रुपये न.पै.	रुपये न.पै.
मंदिर रचना		
मागील बाकी	४,२२,८५१–७५	
अधिक मागील वर्षांपैकी राहिलेले	३६,१३८–०४	
	४,५८,९८९–७९	
अधिक यंदाचे	७२,१५०–३७	
		५,३१,१४०–१६
फर्निचर व इतर सामान		
मागील बाकी	८,७३६–१०	
अधिक यंदाचे	२८८–६५	९०२४–७५
टिनशेड व विहीर		
मागील बाकी		५३४१–८६
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)		
मागील बाकी	१,२३०–३९	
अधिक यंदाचे	३२०–४८	१,५५०–८७
इलेट्रिक डिपॉझिट		
मागील बाकी	३३१–००	
टेलिफोन डिपॉझिट यंदाचे	१००–००	४३१–००
पुढे चालू		५,४७,४८८–६४

अनुक्रमणिका

मागील पानावरून		४,८१,२६३–२४
तात्पुरते कर्ज–		
चालू सालचे		२,७५९–५०
व्यापारी देणे (इमारतीच्या कामानिमित्त)		
१९५८–१९६० चें देणे	३२,०४५–७३	
वजा १९५९–१९६०मध्ये दिले	२१,२८१–९६	
	१०७६३–७७	
अधिक चालू सालचे देणे	३८,१४३–६५	४८,९०७–४२
अनामत मागील	६,५००–००	
चालू साली परत	६,५००–००	०–००
सस्पेन्स अकौंट		
मागील बाकी	१८३–६६	
अधिक यंदाचे	७८७–५०	
		९७१–१६
बँक ओव्हर ड्राफ्ट		
(दि बँक ऑफ महाराष्ट्र बिल्डिंग फंड)		५५१–५८
जनरल फंड		
मागील बाकी	४५,०८२–१८	
वजा उत्पन्नापेक्षा खर्च अधिक	३३७–२६	
		४४,७४४–९२
		५,७९,१९७–८२

मागील पानावरून			५,४७,४८८–६४
ॲडव्हान्स टू स्टाफ			
मागील बाकी		७५–२०	
अधिक यंदाचे		२४–८०	१००–००
ॲडव्हास इमारतीच्या कामानिमित्त			५,३६०–९६
गडकरी तैल चित्र			
मागील बाकी			३००–००
मुदती ठेव			
मागील बाकी		७,०००–००	
अधिक यंदाचे		६,०००–००	१३,०००–००
शिल्लक			
शिल्लक जवळ		१११–८९	
सरकारी अनुदान रोख		७,०००–००	
नाट्य समिति		२००–००	
परीक्षा समिति	५४२–६८ ३११–४५	८५४–१३	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)		२७५–६२	
विदर्भ प्री. को-ऑ- हाऊसिंग सोसायटी		४,२४५–०४	
रंगमंदिर शिल्लक		२६१–५४	१२,९४८–२२
			५,७९,१९७–८२

प्रमाण पत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६० रोजी तयार असलेल्या बॅलन्स-शीटमध्ये वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे प्रमाणपत्र आम्ही देतो. रंगमंदिरासंबंधीचे हिशेब १९५८–५९ व १९५९–६० चे तयार झालेले चालू साली हाती आल्यावरून वरील तक्ता आता सुधारून घेतला आहे.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकाऊंटंटस्

(१-४-१९५९ ते ३१-३-१९६०) ३१ मार्च १९६० ला संपणाऱ्या वर्षाच्या आय-व्ययाचा तक्ता

आय	रुपये न. पै.	व्यय	रुपये न. पै.
धारण सभासद वर्गणी	२,४८२-००	वेतन खर्च	४,२९१-२२
क्षा शुल्क	२,७०८-७२	पोस्टेज	२८८-९९
रकोळ जमा	१,०१३-६९	फोन	६१२-४०
स्कृतिक कार्यक्रम समिति	१३,०९६-२५	मुद्रण व स्टेशनरी	९३१-४२
च समिति	१,१७६-५०	युगवाणी मुद्रण	४,४५९-६३
य स्पर्धा	३७-१९	वाहन व प्रवास खर्च	७६८-४७
क विक्री	११५-५१	किरकोळ खर्च	२६३-०१
वरील व्याज	४५९-३८	सांस्कृतिक कार्यक्रम समिति	९००२-६१
णी वर्गणी	१०५-००	गडकरी स्मारक समिति	३७९-०५
पुढे चालू	२१,१९४-२४	पुढे चालू	२०,९९४-८०

मागील पानावरून	२१,१९४–२४	मागील पानावरून	२०,९९४–८०
सरकारी अनुदान	७५,००–००	नाटच समिति	१०१४–६२
गडकरी स्मारक समिति	१३६–५०	आतिथ्य	२५४–१३
कै. रानडे वाद स्पर्धा	९०–०१	परीक्षा समिति	४,१९१–१८
उत्पन्नापेक्षा जास्त खर्च	३३७–२६	कार्यालयीन व्यवस्था व शाखासाहाय्य	१,२०८–९३
		संमेलन	४९५–४२
		वीज खर्च	५४३–०३
		ग्रंथ संपादन व संशोधन	२०९–६०
		बँक कमिशन	१५–२०
		अंशदान	२७९–१०
		ऑडिट फी	५०–००
	२९,२५८–०१		२९,२५८–०१

तपासले व ते बरोबर आहेत
------महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकाऊंटंटस्

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
★ १ निबंध परिमल		२–२५
२ सुमन संचय		१–२५
+ ३ मराठी गद्य		१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२–००
५ भारती (नाटक) नाना जोग		१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे		०–७५
७ कै. हरीभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २ रा		३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ)ले. कै. डॉ. तु. ज. केदार		३–००
	(केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र	—ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	—कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूरकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक—वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन यांचेकडे आहेत.

\+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला
प्रथम सत्र दि. ३ ते ५ जुलै १९५९



म. म. द. वा. पोतदार भाषण करीत असताना.
सोबत अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व चिटणीस श्री. य. गो. मालोदे

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामुल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**-- पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**-- एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**-- पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**-- अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**-- पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**-- वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका